**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय पंढरीनाथ गोगावले
मु. पो. गोगलेवाडी, अपीलकर्ता
ता. हवेली, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती हवेली, जि. पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
बांधकाम उपविभाग हवेली, पुणे जिल्हा परिषद,
पुणे - ४११ ००१.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२१/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. दत्तात्रय पंढरीनाथ गोगावले
मु. पो. गोगलेवाडी, ता. हवेली, जि. पुणे

**विद्यमान अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती हवेली, जि. पुणे श्री. चंद्रकांत निवृत्ती वाघमारे

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** श्री. विकांत वसंत बगाडे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,<br>बांधकाम उपविभाग हवेली, पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री. सुरेश विठ्ठल अभंग |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

शाळेतील मुलांसाठी रस्ता करण्याची मागणी आपण वारंवार करुनही शासकीय अधिकारी व कर्मचारी दाद देत नाहीत, हे निदर्शनास आणावे यासाठी आपण अपील केले आहे. रस्त्याचा प्रश्न सुटला असला तरी अधिकारी/कर्मचारी यांच्या या वर्तनाची दखल घ्यावी व माहिती देण्यास विलंब झाला असल्यामुळे माहिती नि:शुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. दत्तात्रय पंढरीनाथ गोगावले यानी केली.

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय पंढरीनाथ गोगावले यानी कार्यकारी अभियंता यांच्याकडे केलेला अर्ज आपल्याला प्राप्त झाला तेव्हा एक महिना आपण व अन्य कर्मचारी निवडणुकीच्या यंत्रणेत होतो. त्यानंतर माहितीसाठीचे शुल्क कळविले. ते त्यानी भरले नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणी दरम्यान सांगूनही त्यानी शुल्क न भरल्यामुळे माहिती एका तक्त्यात तयार करुन दिली. रस्त्यासाठी संबंधित सर्व शेतक-यांची संमती आवश्यक असल्याचे व अन्य स्पष्टीकरणही अपीलकर्त्यास दिले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, बांधकाम उपविभाग हवेली, पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री. सुरेश विठ्ठल अभंग व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती हवेली, जि. पुणे श्री. चंद्रकांत निवृत्ती वाघमारे यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, बांधकाम उपविभाग हवेली, पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री. सुरेश विठ्ठल अभंग व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती हवेली, जि. पुणे श्री. चंद्रकांत निवृत्ती वाघमारे यांनी माहिती बाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. 'माहितीच्या अधिकारात माहितीच्या ११०० प्रती' अशा स्वरुपाची मागणी करता येणार नाही. अपीलकर्त्यांनी आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन नेमक्या कागदपत्रांच्या एक-एक प्रतीची मागणी लेखी नोंदवावी व ती जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, बांधकाम उपविभाग हवेली, पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री. सुरेश विठ्ठल अभंग यानी नि:शुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

रस्त्याबाबतची अपीलकर्त्यांची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शहाजी शंकर लाडे
मु.पो.चांदापुरी, ता.माळशिरस, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस,
ता.माळशिरस, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माळशिरस,
ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४१६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर तत्कालीन श्री.गजानन बबनराव भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर विद्यमान-श्री.डी.बी.यरवळकर, तत्कालीन-श्री.एम.डी.नकाते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सेवापुस्तकाची छायांकित प्रत व काही शासन निर्णयांची माहिती आपण मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी योग्य दखल घेऊन माहितीची पूर्तता केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शहाजी शंकर लाडे यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मधील प्रपत्रात केली आहे.

श्री.लाडे यांच्या दि.४.९.२००८ च्या अर्जानुसार दि.२९.९.२००८ रोजी शुल्क कळविले. दि.१.१०.२००८ रोजी त्यानी शुल्क भरले व दि.१०.१०.२००८ रोजी कार्यालयाकडील माहिती दिली. शासन निर्णयाच्या प्रती आपल्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मागवून घेऊन दिल्या. तसेच सेवापुस्तकाच्या प्रतीही पाठविल्या, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.डी.बी.यरवळकर व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर तत्कालीन श्री.गजानन बबनराव भोसले यानी केले. ते लक्षात घेता माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अब्दुल्लाह म.शकुर कुरेशी
२८७, बेगमपेठ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (स),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७२६ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अब्दुल्लाह म.शकुर कुरेशी
२८७, बेगमपेठ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (स),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.अनिल स. विपत

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.सुभाष ब.सावस्कर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

कत्तलखान्याच्या बांधकामाबाबत बांधा वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावरील निविदा रद्द करण्याचे आदेश नगरविकास मंत्र्यांकडे झालेल्या सुनावणीत महानगरपालिका आयुक्तांना देण्यात आले होते. त्याच्या कार्यवाहीची योग्य माहिती दिली नाही. तसेच शासनाच्या आदेशानुसार अधिकारी कार्यवाही करीत नाहीत त्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.अब्दुल्लाह म.शकुर कुरेशी यानी केली..

अपीलकर्त्याच्या अर्जाला विहित मुदतीत उत्तर देऊन माहिती दिली. संबंधित विषयातील महानगरपालिकेच्या ठरावाची प्रतही त्याना पुरविली. अन्य तक्रारीबाबत आवश्यक असल्यास त्यानी संबंधित मंत्री वा महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे दाद मागावी असेही स्पष्ट केले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.सुभाष ब.सावस्कर व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.अनिल स. विपत यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. शासनाच्या आदेशानुसार अंमलबजावणी न झ ाल्याची अपीलकर्त्यांची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शांताराम पंढरीनाथ करंजावणे
मु. पो. भुकूम, ता. मुळशी, जि. पुणे                    अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख पुणे यांचे कार्यालय,
जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालय आवार, पुणे - १.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अधीक्षक,
भूमि अभिलेख मुळशी (मु. पौड), यांचे कार्यालय,
ता. मुळशी, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३९३/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. शांताराम पंढरीनाथ करंजावणे
मु. पो. भुकूम, ता. मुळशी, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उप अधीक्षक,
भूमि अभिलेख मुळशी (मु. पौड), यांचे कार्यालय,
ता. मुळशी, जि. पुणे श्री. सुनिल राऊत

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

जमीन एकत्रिकरण योजनेतील नकाशा दुरुस्तीप्रकरणी वारंवार मागणी करुनही पूर्तता केली जात नाही, व ४ वर्षांहून अधिक काळ हे प्रकरण प्रलंबित का राहिले, याचा लेखी खुलासाही दिला जात नाही. विषय नेमका कोठल्या कार्यालयाकडे आहे हे कळत नाही, असे निवेदन अपीलकर्ता श्री. शांताराम पंढरीनाथ करंजावणे यानी केले.

अपीलकर्ता श्री. शांताराम पंढरीनाथ करंजावणे यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून त्याबाबतची माहिती दिली आहे. मूळ प्रकरण उपसंचालक, भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांच्याकडे दि.३.१२.२०१० रोजी आले आहे. याच मागणीसाठी अपीलकर्त्यांनी केलेले अपील क्र. १५६६/२००९ यापूर्वी आयोगाने फेटाळले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, भूमि अभिलेख मुळशी (मु. पौड), यांचे कार्यालय, ता. मुळशी, जि. पुणे श्री. सुनिल राऊत यानी नमूद केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अमीन जैनुद्दीन शेख
३/ए, रचेता हौसिंग सोसायटी, अपीलकर्ता
अमृता माता मठाजवळ, यमुनानगर,
निगडी, पुणे ४११ ०४४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
जिल्हा परिषद सोलापूर, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ लेखाअधिकारी,
जिल्हा परिषद सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७७/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अमीन जैनुद्दीन शेख
३/ए, रचेता हौसिंग सोसायटी, अमृता माता मठाजवळ,
यमुनानगर, निगडी, पुणे ४११ ०४४

**जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ लेखाअधिकारी,
जिल्हा परिषद सोलापूर, जि. सोलापूर श्रीमती के. बी. तावडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पदवीधर वेतननिश्चिती योग्य त्या नियमानुसार केली आहे की नाही, याबाबतची माहिती व सेवापुस्तकाच्या छायांकित प्रती मिळाल्या नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. अमीन जैनुद्दीन शेख यानी केली.

अभिप्राय, स्पष्टीकरण अशा स्वरुपाची विचारणा अपीलकर्ता यानी केली आहे. सेवापुस्तकाच्या प्रतींची मागणी मूळ अर्जात केलेली नाही. त्यांच्या दि. २.१.२००९ च्या मूळ अर्जाला दि. १३.१.२००९ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर दिले. अन्य व्यक्तींच्या सेवापुस्तकातील पदवीधर वेतनश्रेणीच्या संदर्भातील माहिती प्रथम अपिलात त्यानी मागितली होती, ती त्याना पुरविण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखाअधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर, जि. सोलापूर श्रीमती के. बी. तावडे यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. मूळ अर्जातील मागणीव्यतिरिक्त माहिती अपिलात मागता येणार नाही. तथापि पदवीधर वेतननिश्चितीविषयक नियमावलीबाबतची माहिती अपीलकर्त्यास हवी असल्यास गटशिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विजय रामचंद्र मस्के
मु. पो. करकंब, ता. पंढरपूर, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, पंढरपूर, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत भोसे (क), ता. पंढरपूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४१७/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, पंढरपूर, जि. सोलापूर श्री. बी. टी. रेपाळ

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत भोसे (क), जाधववाडी, ता. पंढरपूर,
जि. सोलापूर श्री. एम. व्ही. ढवळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. विजय रामचंद्र मस्के यांचा अर्ज आपल्याला मिळाला नव्हता. अर्ज म्हणून कोरे पाकीट त्यांच्याकडून मिळाले होते. परंतु अपील क्र. १४१६/२००९/सोलापूर मध्ये हीच माहिती त्यानी मागितली होती व आयोगाच्या निर्णयानंतर दोन दिवसांत ती दिली. माहिती मिळाल्याची त्यांची पोहोच आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत भोसे (क), जाधववाडी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर श्री. एम. व्ही. ढवळे यानी केले.

अपीलकर्ता आज सुनावणीसाठी आले होते. आपली त्यांची भेट झाली. आपल्याला माहिती मिळाली असल्याचे सांगून ते परत गेले. माहितीची पोहोच त्यानी दिली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, पंढरपूर, जि. सोलापूर श्री. बी. टी. रेपाळ यानी केले.

दि. ३०.१०.२०१० रोजी माहिती मिळाल्याची अपीलकर्त्याच्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत भोसे (क), जाधववाडी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर श्री. एम. व्ही. ढवळे व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, पंढरपूर, जि. सोलापूर श्री. बी. टी. रेपाळ यांनी आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर रामचंद्र नाकील
मु.पो.नाटोली, ता.शिराळा, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिराळा,
ता.शिराळा, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, नाटोली सर्व सेवा सहकारी सोसायटी लि.,
नाटोली, ता.शिराळा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५०९ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शंकर रामचंद्र पाटील
मु.पो.नाटोली, ता.शिराळा, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिराळा,
ता.शिराळा, जि.सांगली श्री.शंकर शिवाजी कुंभार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

नाटोली सर्व सेवा सहकारी सोसायटी लि., शिराळा, ता.शिराळा, जि.सांगली या सहकारी संस्थेने काही खातेदारांविरूध्द केलेल्या कायदेशीर कारवाईवरील खर्चाचे विवरण व अन्य माहिती संस्थेच्या सचिवांनी नाकारली. अपिलीय प्राधिकारी यानी आदेश देऊनही माहिती मिळाली नाही. संस्थेचे सभासदत्व आपल्याला दिले जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शंकर रामचंद्र नाकील यानी केली.

नाटोली सर्व सेवा सहकारी सोसायटी लि., शिराळा, ता.शिराळा, जि.सांगली या संस्थेला कोणतेही शासकीय भागभांडवल वा अनुदान दिले जात नाही. त्यामुळे खर्चाची विवरणपत्रे आदि स्वरूपाची संस्था स्तरावरील माहिती आपल्या कार्यालयाकडे नसते. संस्थेचा लेखापरीक्षण अहवाल नियमानुसार आपल्या कार्यालयाला सादर करावा लागतो. मात्र श्री.नाकील यांचा अर्ज आला तेव्हा ताळेबंद झालेला नव्हता, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिराळा, ता.शिराळा, जि.सांगली श्री.शंकर शिवाजी कुंभार यानी नमूद केले. त्यांचे निवेदन लक्षात घेता उपरोक्त संस्था माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(एच) मधील तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही. त्यामुळे संस्थेला हा अधिनियम लागू होणार नाही. तथापि जन माहिती अधिकारी/अपिलीय प्राधिकारी यांच्या कार्यालयांच्या कक्षेतील लेखा परीक्षण अहवालाची प्रत/अनुषंगिक माहिती अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार माहिती प्राप्त करून घेण्यास दि.२४.२.२०११ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास कळविल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिराळा, ता.शिराळा, जि.सांगली श्री.शंकर शिवाजी कुंभार यानी आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महेश भिमराव जाधव
१९, सहयोगनगर, जलशुध्दीकरण केंद्राजवळ, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३१ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर प्रतिनिधी श्री.जे.टी.खंडागळे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री.जे.टी.खंडागळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अर्ज केल्याला ७९० दिवस उलटल्यानंतरही आपल्याला कोणतीही माहिती मिळालेली नाही. संस्थाचालक व अधिकारी यांचा गैरकारभार उघड होऊ नये म्हणून माहिती दडपण्याचे प्रयत्न होत आहेत, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.महेश भिमराव जाधव यानी राज्य माहिती आयोगाला सादर केलेल्या निवेदनात केले आहे.

शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे सन १९८८ ते २००८ या काळात सादर झालेले मान्यता प्रस्ताव व त्या संदर्भातील निर्णय याबाबतची सर्व कागदपत्रे निरीक्षणाला मिळावीत व हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती मिळाव्यात, अशी मागणी अपीलकर्ता श्री.महेश भिमराव जाधव यानी केली होती. कळवूनही ते अभिलेख अवलोकनासाठी व प्रथम अपिलाच्या सुनावणीला उपस्थित राहिले नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.जे.टी.खंडागळे यानी केले.

अपीलकर्ता यानी सरसकट व विस्तृत स्वरुपात माहिती मागितली आहे. आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरून ते प्राप्त करून घेऊ शकतात. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यानी त्यानुसार अभिलेख अवलोकनासाठी सशुल्क प्रती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर (संजय)दत्तात्रय टिळेकर
नेताजी चौक, म्हेत्रे आळी, मु.पो.सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे-३७ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सासवड आगार, ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६४ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे श्री.ए.जी.जाधव | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

वाहतूक नियंत्रकाच्या कामाच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती विलंबाने, चुकीची व दिशाभूल करणारी दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही, अशी तक्रार

अपीलकर्ता श्री.प्रभाकर (संजय) दत्तात्रय टिळेकर यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री. टिळेकर यांच्या दि. १२.६.२००९ च्या अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सासवड आगार, ता.पुरंदर, जि.पुणे यानी दि. १०.७.२००९ च्या पत्रान्वये उत्तर दिले. मात्र प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्यास स्पष्टीकरणात्मक माहिती दिली. श्री.सदाशिव वामन घुगे, कनिष्ठ सहाय्यक, सासवड आगार कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सासवड आगार, ता.पुरंदर, जि.पुणे यानी माहिती देण्याबाबत अधिक सकारात्मक दृष्टीने कार्यवाही करणे आवश्यक होते. अशाच कारणांमुळे त्याना निलंबित करण्यात आले असून यापुढे माहिती देण्याबाबत अधिक सकारात्मकता व तत्परता बाळगली जाईल असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे श्री.अे.जी.जाधव यानी केले. ते मान्य करण्यात येत असून आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.एकनाथ काशिनाथ तावरे
१६/१०५, म्युनिसिपल कॉलनी, गोखलेनगर, पुणे-४११ ०१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी, माध्यमिक/तांत्रिक शिक्षण विभाग,
शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, श्री छत्रपती शिवाजी औद्योगिक
प्रशिक्षण केंद्र, ६२६, शुक्रवार पेठ, पुणे-४११००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७० / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.एकनाथ काशिनाथ तावरे
१६/१०५, म्युनिसिपल कॉलनी, गोखलेनगर, पुणे-४११ ०१६

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी, माध्यमिक/तांत्रिक शिक्षण विभाग, शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे महानगरपालिका, पुणे तत्कालीन-श्री.सुधाकर तांबे

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, श्री छत्रपती शिवाजी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, ६२६, शुक्रवार पेठ, पुणे श्री.चंद्रकांत कमरशिंग डिंबर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी यानी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : पुणे महानगरपालिकेने बेकायदेशीरपणे मला सेवेतून कमी केले. त्या अनुषंगाने मागितलेली सेवापुस्तक, पगारपत्रक आदि माहिती दिली जात नाही. ही माहिती न मिळाल्यामुळे न्यायालयात माझ्र याविरूध्द निकाल लागला. सेवापुस्तक गहाळ केले आहे.

जन माहिती अधिकारी : श्री.तावरे याना जानेवारी १९८६ मध्ये बडतर्फ करण्यात आले. पगारपत्रक शोधण्याबाबत शाळेला कळविले. परंतु हे अभिलेख पाच वर्ष जतनाचे आहेत. शाळेने फरकाचे बिल दिले.

तत्कालीन अपिलीय प्राधिकारी : श्री.तावरे यांचे सेवापुस्तक उपलब्ध होत नाही. तसेच पगाराबाबतचा अभिलेखानुसार असलेला तपशील त्याना कळविला. न्यायालयाने त्यांचा दावा फेटाळला असून स्पष्टीकरणात्मक उत्तर देता येणार नाही.

अपीलकर्त्याच्या तक्रारी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही. संबंधित प्रकरणातील कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास जन माहिती अधिकारी यानी त्याना अभिलेखाचे अवलोकन निःशुल्क करू द्यावे व कागदपत्रांच्या प्रती मागितल्यास योग्य ते शुल्क आकारून द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक मानसिंग पवार
श्रीनगरी कोयना सहकारी गृहनिर्माण संस्था,
साडेसतरा नळी, बी-१०, हडपसर, पुणे ४११०२८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(४),
शिवाजीनगर, पुणे-४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०९० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक मानसिंग पवार
श्रीनगरी कोयना सहकारी गृहनिर्माण संस्था, साडेसतरा नळी, बी-१०, हडपसर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे प्रतिनिधी श्री.आनंद कटके

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(४),
शिवाजीनगर, पुणे श्री.कैलास प्रभाकर जेबले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यानी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : दि.१३.५.२०१० च्या अर्जान्वये मागितलेली माहिती दि.२९.१.२०११ रोजी मिळाली. कोयना सहकारी गृहनिर्माण संस्था, साडेसतरा नळी, हडपसर, पुणे स्थापन करताना आवश्यक असलेल्या उपविधीची प्रत त्वरित देणे आवश्यक होते.

जन माहिती अधिकारी : श्री.पवार यांचा अर्ज दि.१७.५.२०१० रोजी प्राप्त झाला. आमच्या कार्यालयाच्या स्तरावरील माहिती दि.८.६.२०१० च्या पत्रान्वये दिली. त्याची पोहोच आहे. संस्थेच्या अ धारिकेत अन्य माहिती नसल्यामुळे सहकार कायद्याच्या कलम ८९-ए अन्वये तपासणी घेण्यासाठी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. परंतु संस्थेचे पदाधिकारी त्या पत्त्यावर रहात नसल्याचे आढळल्याने, विद्यमान संचालक मंडळाला आपल्या कार्यालयाच्या परवानगीशिवाय आर्थिक व्यवहार करू देऊ नयेत असे संस्थेचे खाते असलेल्या बँकांना कळविले. या प्रकारे प्रशासकीय कार्यवाही करून संस्थेकडून दि.१७.१.२०११ रोजी प्राप्त झालेली माहिती दि.२४.१.२०११ रोजी श्री.पवार याना दिली.

जन माहिती अधिकारी यानी माहिती देण्याबाबत केलेली कार्यवाही उल्लेखनीय आहे. आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मकसूद बशीर शेख
रा. महिबूबनगर, मोहोळ, ता. मोहोळ अपीलकर्ता
जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२६/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मकसूद बशीर शेख
रा. महिबूबनगर, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. व्ही. बी. माने

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर श्री. बी. एस. कटकदौंड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मोहोळ तालुका व्यापारी ग्रा.बि.शेती सहकारी पतसंस्था, मोहोळ या पतसंस्थेने आपल्याला कर्ज नसल्याबाबतचा दाखला न दिल्यामुळे संस्थेकडून मागवून असा दाखला द्यावा, अशी मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. त्यानुसार माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. मकसूद बशीर शेख यानी केले.

थकबाकीचा दाखला संस्थेकडे असतो म्हणून श्री. शेख यांचा अर्ज संस्थेकडे वर्ग केला. परंतु संस्थेला शासकीय भागभांडवल वा अनुदान मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असे संस्थेने कळविले ते योग्य आहे. तसेच कर्ज नसल्याचा दाखला देण्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर श्री. बी. एस. कटकदौंड यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि : ३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दुर्गादास परशराम शहापूरकर
ईश्वगंगा कॉम्प्लेक्स, नेहरू चौक, गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३/२०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.एस.डी.अडगोडर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर विद्यमान श्री.रविंद्र नारायण पिसे, तत्कालीन-नितीन मारुती साळुंखे | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

वारस नोंद प्रकरणातील सन २००६ मधील कागदपत्रांच्या नकला अपीलकर्ता श्री.दुर्गादास परशराम शहापूरकर यानी मागितल्या होत्या. उपलब्ध माहिती घेण्याबाबत विहित मुदतीत कळवूनही ते आले नाहीत.

त्यानंतर ते आले असता समक्ष माहिती दिली. त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१मधील धारिका उपलब्ध होत नव्हती. त्यामुळे ती माहिती देता आली नव्हती. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर सदर स्वयंसूची धारिका शोधून नकला तयार करून घरपोच पाठविल्या असता त्यानी घेण्यास नकार दिला. त्यामुळे रजिस्टर्ड टपालाने नकला पाठविल्या. परंतु त्या त्यानी न स्वीकारल्यामुळे लखोटा परत आला, असे जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर विद्यमान श्री.रविंद्र नारायण पिसे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.एस.डी.अडगोडर यांनी लेखी व तोंडी नमूद केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. देऊ केलेली माहिती नाकारण्याची अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही. त्याना आवश्यक असल्यास संबंधित नकला निःशुल्क प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.निलेश अशोक यादव
स.नं.१८, मालिनी अपार्टमेंट, सुखसागरनगर, भाग नं.२, कात्रज, पुणे-४११०४६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सरचिटणीस, महाराष्ट्रीय मंडळ,
१५३९, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे-४११०३० उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, सेठ दगडूराम कटारिया हायस्कूल,
गुलटेकडी, पुणे ४११०३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३१ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.निलेश अशोक यादव प्रतिनिधी श्री.अशोक शिवाजी यादव
स.नं.१८, मालिनी अपार्टमेंट, सुखसागरनगर, भाग नं.२, कात्रज, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सरचिटणीस, महाराष्ट्रीय मंडळ, १५३९, सदाशिव पेठ,
टिळक रोड, पुणे-प्रतिनिधी ॲड.राहुल एम,नागरे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, सेठ दगडूराम कटारिया हायस्कूल(इंग्रजी माध्यम),
गुलटेकडी, पुणे श्रीमती दिप्ती दत्तात्रय चिवटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी : माझ्या मुलाला सेठ दगडूराम कटारिया हायस्कूल(इंग्रजी माध्यम), पुणे या शाळेत कायमस्वरूपी नेमणूक देतो असे सांगितले व प्रत्यक्षात काढून टाकले. त्यामुळे जानेवारी २००५ ते मे २००९ या कालावधीत शाळेत असलेल्या कनिष्ठ व वरिष्ठ लेखनिकांबाबतची तपशीलवार माहिती मागितली होती. परंतु शाळा न्यायाधिकरणात मुलाचे अपील प्रलंबित असल्यामुळे माहिती देता येत नसल्याचे मुख्याध्यापिका, सेठ दगडूराम कटारिया हायस्कूल (इंग्रजी माध्यम), पुणे यानी कळविले. अपिलीय प्राधिकारी यानी तसाच निर्णय दिला.

जन माहिती अधिकारी : विहित मुदतीत उत्तर दिले. शाळा न्यायाधिकरण, पुणे येथे अपीलकर्त्यांच्या प्रलंबित असलेल्या अपिलाचा निकाल दि.३०.१२.२००९ रोजी झाला. त्यानंतर दि.२३.१.२०१० रोजी शाळेकडील माहिती व मुद्देनिहाय उत्तर रजिस्टर्ड टपालाने पाठविले.

न्यायालयात व अन्य यंत्रणेकडे प्रकरण दाखल / प्रलंबित असल्याच्या कारणावरून, तसेच 'शाळेची अंतर्गत बाब'म्हणूनही अनुदानित शाळेकडील माहिती नाकारता येणार नाही, याची समज जन माहिती अधिकारी श्रीमती दिप्ती दत्तात्रय चिवटे व अपिलीय प्राधिकारी श्री.रमेश शिवरामपंत दामले याना देण्यात येत आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून योग्य ते शुल्क भरून कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि :- ३ मार्च २०११

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती सिंधू अशोक डफळ
श्री संत ज्ञानेश्वरनगर, पसायदान कॉलनी,
आळंदी रोड, भोसरी, पुणे-४११०३९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, कर संकलन,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, कर संकलन, भोसरी विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६७/२०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्त्या** श्रीमती सिंधू अशोक डफळ
श्री संत ज्ञानेश्वरनगर, पसायदान कॉलनी, आळंदी रोड, भोसरी, पुणे-४११०३९

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, कर संकलन,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.शहाजी राजाराम पवार

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, कर संकलन, भोसरी विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.विठ्ठल गोपीचंद निकम

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या क्षेत्रालगतच्या मिळकतधारकाने केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबतची माहिती विलंबाने व चुकीची दिली. मूळ दस्तामध्ये काही पाने उपलब्ध नसल्याचेही आढळले. दरम्यानच्या काळात बांधकाम पूर्ण झाले, असे निवेदन अपीलकर्त्या श्रीमती सिंधू अशोक डफळ यानी केले.

श्रीमती डफळ यानी मागितलेल्या कागदपत्रांची संचिका उपलब्ध न झाल्यामुळे माहिती मुदतीत देता आली नाही. उपलब्ध कागदपत्रे अवलोकनासाठी देऊ केली असता व नंतर शोध घेतल्यावर प्राप्त झालेल्या कागदपत्रांच्या प्रती देऊ केल्या असता त्यानी नकार दिला. त्यामुळे यूपीसीने माहिती पाठविली. संबंधित कागदपत्र सन १९८१-१९८३ मधील असून मूळ खरेदीदस्ताच्या संदर्भातील पावती, कच्चे हस्तलिखित संबंधित व्यक्तींकडून प्राप्त करून घेऊन प्रती दिल्या. शेवटचे पान उपलब्ध नसल्यामुळे नोंदणी-पावतीवरून दस्तऐवज मिळण्याबाबत अलाहिदा कारवाई करण्यात येणार असल्याचे दुय्यम निबंधक कार्यालय, पुणे, हवेली-२ यानी कळविले. प्रयत्नपूर्वक माहिती मिळवून दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, कर संकलन, भोसरी विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.विठ्ठल गोपीचंद निकम व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, कर संकलन, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.शहाजी राजाराम पवार यांनी केले. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधाकर महादेव घारे
बी-४/१०२, स्वप्ननगरी, पिंपरी, पुणे-४११०१८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती कराड,
ता.कराड, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत घारेवाडी,
ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३० / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती कराड,
ता.कराड, जि.सातारा श्री.टी.टी.थोरात

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत घारेवाडी,
ता.कराड, जि.सातारा श्री.डी.व्ही.कदम

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

पाच मिळकतधारकांची माहिती अपीलकर्ता श्री.सुधाकर महादेव घारे यानी दि.५.२.२००९च्या अर्जाद्वारे मागितली होती. दि.२७.२.२००९ च्या पत्राद्वारे उत्तर व उपलब्ध माहिती दिली. आधीच्या

ग्रामसेवकांशी संपर्क झाल्यानंतर त्यांच्या काळातील माहिती उपलब्ध झाल्यावर देण्यात येईल, असे कळविले. तीच माहिती सोबत आजही आणली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत घारेवाडी, ता.कराड, जि.सातारा श्री.डी.व्ही.कदम यानी केले. माहितीच्या प्रती त्यानी सादर केल्या. अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा श्री.टी.टी.थोरात यानी त्यांच्या प्रतिपादनास दुजोरा दिला. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नारायण शेषाद्री कुलकर्णी
विश्वकमल, फ्लॅट नं.३, पहिला मजला, आबासाहेब रायकरनगरच्या
समोरील गारमाळ, धायरी, पुणे-४११०४१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तुळजापूर,
तुळजापूर तहसील कार्यालय ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तुळजापूर,
तुळजापूर तहसील कार्यालय ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७४ /२००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तुळजापूर, तुळजापूर तहसील कार्यालय ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद<br>विद्यमान - श्री.भरत श्रीमंतराव सूर्यवंशी, तत्कालीन-श्री.एस.सी.येवलीकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

गायरान जमिनीतील गौण खनिजांची उचल, त्याबाबतची शासनाला मिळालेली रॉयल्टीची रक्कम याची सन १९९०-९१ ते २००६-२००७ या काळातील माहिती अपीलकर्ता श्री.नारायण शेषाद्री कुलकर्णी

यानी मागितली होती. त्यानी मूळ अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केला होता. तो आपल्याला प्राप्त झ ााल्यानंतर माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तुळजापूर, तुळजापूर तहसील कार्यालय, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद श्री.भरत श्रीमंतराव सूर्यवंशी यानी केले. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता ते रास्त असल्याचे दिसून येते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हेमंत निवृत्ती निकाळजे
एस.बी.पार्क, फ्लॅट नं. ६, स.नं.३४/२, प्लॉट नं.४३,
हिमगिरी शाळेजवळ, विद्यानगर, पुणे-३२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-४११ ०१७ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता 'ड'प्रभाग(स्थापत्य),
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११ ०१७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०० / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हेमंत निवृत्ती निकाळजे
एस.बी.पार्क, फ्लॅट नं. ६, स.नं.३४/२, प्लॉट नं.४३,
हिमगिरी शाळेजवळ, विद्यानगर, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता 'ड'प्रभाग(स्थापत्य),
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.बळवंत तुकाराम बनकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : सांगवी येथील सिटी सर्व्हे क्र.८७४ व ८७५ मधील अनधिकृत बांधकाम पाडण्याबाबत महानगरपालिकेने नोटीस दिल्याला दोन वर्षे होऊनही बांधकाम पाडले नाही. कोणत्या कायद्याच्या आधारे प्रकरण विनाकार्यवाही ठेवले, याची माहिती मिळाली नाही. सर्व्हे नं.८७४ बद्दल जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली. परंतु सर्व्हे क्र.८७५ बद्दल माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी : विहित मुदतीत शुल्क कळवून महानगरपालिकेकडील उपलब्ध माहिती दिली. सर्व्हे क्र.८७५ वरील बांधकाम ग्रामपंचायतीच्या काळातील असून त्याबाबतची कागदपत्रे अभिलेखात उपलब्ध नाहीत. उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती देता येतील. परंतु अपीलकर्त्यांची मागणी स्पष्टीकरण विचारणारी व प्रशासकीय कार्यवाहीची आहे. सर्व्हे क्र.८७५बद्दलच्या उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यानी दिले होते. त्यानुसार माहिती दिली.

वरील बाबी लक्षात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. तथापि अनधिकृत बांधकामांबाबत महानगरपालिकेने संबंधितांना दिलेल्या नोटिशीवरील कार्यवाहीच्या सद्यस्थितीची माहिती अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे. सबब, आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पंढरीनाथ दुलाजी तिटकारे
मु.पो.नायफड, ता.खेड (राजगुरूनगर), जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती,
खेड(राजगुरूनगर), जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत नायफड,
ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३४८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, खेड(राजगुरूनगर), जि.पुणे
विद्यमान-श्री.दिनकर बाबुराव खरात, तत्कालीन-प्रतिनिधी-श्री.शिरीष रामचंद्र मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत नायफड,
ता.खेड, जि.पुणे श्री.सुनिल चिमाजी पारधी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

ग्रामसेवक व सरपंच यानी हेतुपुरस्सर घर आपल्या नावे केले नाही. त्याबाबत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली जात नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.पंढरीनाथ दुलाजी तिटकारे यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.तिटकारे यांच्या मागणीनुसार घर त्यांच्या नावे करण्यात आले असूनही याच विषयासंबंधात ते सातत्याने विविध स्वरूपाचे अर्ज करीत असतात. सन १९९५ पासूनची माहिती ते मागत असून वेळोवेळी त्याना उत्तर देण्यात आले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील माहितीच्या संज्ञेत न येणारे अशा स्वरूपाचे प्रश्न, खुलासे, स्पष्टीकरण, अभिप्राय याची मागणी ते करीत असतात. याच संदर्भात यापूर्वी आयोगाने त्यांची अपील क्र.५७/५९५/६६३/पुणे ही अपिले निकाली काढली आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत नायफड, ता.खेड, जि.पुणे श्री.सुनिल चिमाजी पारधी यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत न येणाऱ्या मागणीसाठी पुनः पुन्हा अर्ज व अपिले करून सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम वाया घालवू नये अशी समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रमेश मोहनराव ठिगळे
पांडुरंग गृहनिर्माण सोसायटी,
लिंकरोड, पंढरपूर, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
पंढरपूर नगरपरिषद, ता.पंढरपूर,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक,**
न्यायालयीन कामकाज,
पंढरपूर नगरपरिषद, ता.पंढरपूर,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक,**<br>न्यायालयीन कामकाज,<br>पंढरपूर नगरपरिषद, ता.पंढरपूर, जि.सोलापूर<br>तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अरुण रमाकांत जवळे | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** उच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राचे पुनर्विलोकन करण्यासंदर्भात दि.१६.१०.२००८ रोजीच्या अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.रमेश मोहनराव ठिगळे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२३.२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केलेली माहिती मला मिळाली असून त्याबाबत मी समाधानी आहे. माझी कुठलीही तक्रार राहिलेली नाही. माझा अर्ज निकाली काढण्यात यावा', असे अपीलकर्ता श्री.ठिगळे यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, न्यायालयीन कामकाज, पंढरपूर नगरपरिषद, ता.पंढरपूर,जि.सोलापूर श्री.सुनिल भिमराव वाळुजकर व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपरिषद, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.रविंद्र शे.जाधव यांच्या दि.२२.२.२०११ च्या पत्रासोबत सुनावणीच्या वेळी सादर करण्यात आले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 4 MAR 2011

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.चंद्रकांत आप्पासाहेब खेडे
मु.पो.आनूर, ता.कागल, **अपीलकर्ता**
जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद कोल्हापूर,

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६२/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.२.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दि.३१.५.२००५ रोजी घेतलेल्या सुनावणीचे इतिवृत्त, सुनावणीचे उपस्थिती पत्रक, सादर केलेली लेखी निवेदने, कार्यालयीन टिपण्या व सुनावणीतील आदेश | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.चंद्रकांत आप्पासाहेब खेडे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२२.२.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. घ्मला जन माहिती अधिकारी उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कोल्हापूर, व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्याकडून आवश्यक असणारी माहिती प्राप्त झालेली आहे.

माहितीबाबत माझी कोणतीही तक्रार नाही. सुनावणी रद्द करण्यात यावीङ, असे अपीलकर्ता श्री.खेडे यांचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यानी दि.७.२.२०११ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ४ मार्च २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नंदकुमार गोविंदराव मालखरे
९/१ बेन्नूरनगर, विजापूर रोड, नवीन आर टी ऑफीसजवळ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी,
कॉमनेवल्थ इमारत, लक्ष्मी रोड, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा महाव्यवस्थापक,
शासकीय दूध योजना,पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१५/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. नंदकुमार गोविंदराव मालखरे
९/१ बेन्नूरनगर, विजापूर रोड, नवीन आर टी
ऑफीसजवळ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी,
कॉमनेवल्थ इमारत, लक्ष्मी रोड, पुणे श्री. एम. ए. मुक्तदीर

**जन माहिती अधिकारी** तथा महाव्यवस्थापक,
शासकीय दूध योजना,पुणे यांचे प्रतिनिधी श्री. पांडुरंग तुकाराम जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अतिकालीन भत्ता व पगारी सुट्टयांचे ना देय प्रमाणपत्र मिळण्याची मागणी आपण केली होती. ही बाब प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तसेच या मागणीबाबत प्रशासकीय कार्यवाही चालू आहे,

असे जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक, शासकीय दूध योजना, पुणे श्री. हेमंत गुलाबराव गडवे व अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, कॉमनेवल्थ इमारत, लक्ष्मी रोड, पुणे श्री. एम. ए. मुक्तदीर यांनी आपल्याला स्पष्ट केले. माहिती मिळालेली आहे व सद्यस्थितीत ना देय प्रमाणपत्र मागण्याची आवश्यकता राहिलेली नाही, असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री. नंदकुमार गोविंदराव मालखरे यानी सादर केले. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ४ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.दिलीप माधवदास शहा
२३४/१, तेली गल्ली, **अपीलकर्ता**
गणपती मंदिर मागे, इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
इंदापूर नगरपरिषद, ता.इंदापूर,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा बांधकाम पर्यवेक्षक,**
बांधकाम विभाग, इंदापूर महानगरपालिका,
ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९३३/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.११.२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br><br>श्री.दिलीप माधवदास शहा<br>२३४/१, तेली गल्ली,<br>गणपती मंदिर मागे, इंदापूर,<br>ता.इंदापूर, जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**<br>इंदापूर नगरपरिषद, ता.इंदापूर, जि.पुणे<br>श्री.बी.जे.गोरे (प्रभारी मुख्याधिकारी) | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** नगरपरिषदेने १.४.२००२ ते ३१.३.२००९ या कालावधीत दिलेल्या बांधकाम परवानगी संदर्भातील माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.दिलीप माधवदास शहा यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.११.११.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. 'अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती अवलोकनास उपलब्ध करुन द्यावी व आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अपीलकर्त्यास द्याव्या, असे मौखिक आदेश सुनावणीच्या वेळी देण्यात आले. त्यानुसार अवलोकनास व लेखी स्वरुपात मला माहिती मिळाली असून त्याबाबत माझी काही तक्रार नाही', असे अपीलकर्ता श्री.शहा यांचे निवेदन दि.३.३.२०११ च्या पत्रान्वये अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, इंदापूर नगरपरिषद, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.बी.जे.गोरे यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ७ मार्च २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय ऊर्फ वसंत मधुसूदन फडके
बिल्वा प्लॉट नं. ३८, राव कॉलनी, अपीलकर्ता
तळेगाव दाभाडे- ४१० ५०६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य अभियंता,
पुणे परिमंडल,रास्तापेठ, पुणे - ११

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, रास्ता पेठ, पुणे- ११

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५४/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. दत्तात्रय ऊर्फ वसंत मधुसूदन फडके
बिल्वा प्लॉट नं. ३८, राव कॉलनी, तळेगाव दाभाडे- ४१० ५०६

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, रास्ता पेठ, पुणे विभाग
श्री. आत्माराम बाबूराव खांडेकर

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, रास्ता पेठ, पुणे विभाग
सौ. मनिषा ज. प्रयाग

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, राजगुरुनगर विभाग, तळेगाव<br>श्री. राजेश गणपती लोंढे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढील प्रमाणे निवेदन केले :

**अपीलकर्ता** - तळेगाव मध्ये विजबिले भरण्याची सोय पुरेशी नाही. ग्राहकांच्या सोयीच्या दृष्टीने योग्य सोय करण्याबाबत केलेल्या सूचनांचा विचार व माहितीची पूर्तता केली नाही.

**जन माहिती अधिकारी** - श्री. फडके यानी अत्यंत विस्तृत स्वरुपाचे मुद्दे नमूद करुन अनेक सूचना केल्या होत्या. तसेच अनेक मुद्दयांबाबतचे स्पष्टीकरण, कारण मीमांसा अशा स्वरुपाची विचारणा केली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या संज्ञेत याबाबी येत नाहीत. कळविलेले शुल्क भरण्यास त्यानी नकार दिल्यामुळे माहिती निःशुल्क दिली.

**अपिलीय प्राधिकारी** - तक्रारी, सूचना, मागण्या व माहिती अशा स्वरुपाची गुंतागुंत अपीकर्त्यांच्या अर्जात असल्यामुळे त्याना नेमकी कोणती माहिती हवी आहे, हे स्पष्ट होत नाही. त्यानी नेमकेपणाने माहिती मागितल्यास दिली जाईल. नियमावलीसारख्या सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेल्या माहितीच्या प्रती पुरविणे शक्य नाही.

अपीलकर्त्यांच्या सूचना, मागण्या व तक्रारी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणारा विषय नाही. सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली नियमावलीसारखी माहिती देणे जन माहिती अधिका-यांच्याच कक्षेतील असल्याचे म्हणता येणार नाही व त्यामुळे ती देणे जन माहिती अधिका-यांवर बंधनकारक नाही. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ नुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, राजगुरुनगर विभाग, तळेगाव श्री. राजेश गणपती लोंढे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता,पुणे परिमंडल,रास्तापेठ, पुणे श्री. सिध्दार्थ पु.नागटिळक यांना देण्यात येत आहे. अपीलकर्त्यांनी

मांडलेले प्रश्न सार्वजनिक स्वरुपाचे आहेत. हे लक्षात घेता त्याना आवश्यक असल्यास नियमावलीची प्रत अपवादात्मक भाग म्हणून निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ७ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विनोद प्रकाश कोकरे
मु. पो. होटगी स्टेशन, ता. द. सोलापूर — अपीलकर्ता
जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
पंचायत समिती, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८८/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. विनोद प्रकाश कोकरे
मु. पो. होटगी स्टेशन, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर श्री. पी. एल. कोळी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
पंचायत समिती, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर श्री. शंकर माणिकराव पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढील प्रमाणे निवेदन केले:

**अपीलकर्ता** - ग्रामपंचायत हिशेब निधीच्या संदर्भातील सन २००० ते २००६ या कालावधीतील विस्तृत माहिती मागितली होती. ती अद्याप मिळाली नाही. माहिती मिळावी व संबंधितांवर कारवाई व्हावी.

**जन माहिती अधिकारी** - श्री. कोकरे यांच्या दि. १६.८.२००७ च्या अर्जाला दि. १५.९.२००७ च्या पत्रान्वये उत्तर दिले. सरसकट स्वरुपात विस्तृत माहिती मागितली असून आधीचे ग्रामसेवक श्री. टी. एस. कांबळे व श्री. एन. बी. फुलारी यांच्याकडून त्यावेळच्या दप्तराचा पदभार मिळाला नसल्यामुळे माहिती देता येत नसल्याचे कळविले. मी सन २००९ मध्ये कार्यभार स्वीकारला असून उपलब्ध माहिती दिली. तसेच अपीलकर्त्यास अभिलेख समक्ष दाखविले .

**अपिलीय प्राधिकारी** - श्री. कांबळे सेवानिवृत्त झाले असून श्री. फुलारी निलंबित आहेत. त्यांच्याकडून पदभार घेण्याची कार्यवाही नियमानुसार चालू आहे. ते दप्तर प्राप्त झाल्याशिवाय अपीलकर्त्यास हवी असलेली सर्व माहिती देता येणार नाही, हे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, पंचायत समिती, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर श्री. शंकर माणिकराव पाटील यांचे म्हणणे रास्त आहे.

वरील बाबी लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, पंचायत समिती, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर श्री. शंकर माणिकराव पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर श्री. पी. एल. कोळी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. मात्र सन २००० ते २००६ या कालावधीतील कागदपत्रे सन २०११ उजाडले तरी संबंधितांकडून प्राप्त करुन घेतली जात नाहीत, ही बाब कागदपत्रांची उपलब्धता व जतन याबाबतची अनास्था दर्शविणारी आहे. ग्रामसेवकांकडून त्या त्या वेळी कागदपत्रे हस्तांतरित होत नाहीत व पर्यायाने ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबतची माहिती नागरिकांसाठी उपलब्ध रहात नाही, ही बाब गंभीर आहे. वस्तुतः माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ अन्वये ही सर्व कागदपत्रे त्या त्या वेळी नागरिकांसाठी जाहीर स्वरुपात उपलब्ध करुन दिली जाणे बंधनकारक आहे. परंतु नियमानुसार ठेवणे आवश्यक असलेली माहितीही ठेवण्याबाबत अनास्था असल्याचे अनेक ग्रामपंचायतींकडील माहितीबाबतच्या अपिलांमध्ये

दिसून येते. ही बाब  माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या मूलभूत तत्वालाच हारताळ फासणारी आहे. म्हणून शासनाने याबाबत गंभीर दखल घेऊन योग्य ती पावले उचलणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. ग्रामपंचायतींकडील माहिती/कागदपत्रांबाबत वर नमूद केलेली परिस्थिती लक्षात घेता सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यानी याबाबत त्वरित लक्ष घालून ठोस उपाययोजना करावी व त्याबाबतचा अहवाल १५.४.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ७ मार्च २०११**

**प्रत,** सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. आनंदकुमार चंद्रशेखर उटगे
३/१६ भवानी पेठ, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
उस्मानाबाद

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय उमरगा, जि. उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,<br>तहसीलदार कार्यालय उमरगा, जि. उस्मानाबाद श्रीमती शोभा जाधव | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जमिनीच्या अकृषीकरण प्रकरणातील कागदपत्रांच्या नकला अपीलकर्ता श्री. आनंदकुमार चंद्रशेखर उटगे यानी मागितल्या होत्या. परंतु तशी संचिका उपलब्ध होत नसल्याचे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद डॉ. विकास नाईक यांच्या आदेशनंतरही शोध घेतला व कागदपत्र जतनाची जबाबदारी असणा-या संबंधित कर्मचा-यांचे खुलासे प्राप्त करुन घेतले. परंतु कोणतीही कागदपत्रे मिळाली नाहीत. अकृषी परवाना निर्गमित करण्याचे अधिकार

नायब तहसीलदारांना नसताना, कोणतीही कागदपत्रे न घेता व संचिका तयार न करता तत्कालीन नायब तहसीलदार (महसूल) श्री. आर डी. सूर्यवंशी यानी अशा प्रकारचे अकृषी परवाने अवैध मार्गाने निर्गमित केले असण्याची शक्यता आहे. त्यांचे निधन झाले असल्यामुळे त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविण्याची कारवाई करता येत नाही. अशा प्रकारचे सुमारे २५०० ते ३००० आदेश त्यांच्या काळात झाल्याचे पूर्ण चौकशी केली असता आढळून येत असून या आदेशांबाबतच्या कायदेशीर कारवाई- विषयीचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडे सादर करीत आहोत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसीलदार कार्यालय उमरगा, जि. उस्मानाबाद श्रीमती शोभा जाधव यानी लेखी व तोंडी केले.

अधिकार नसताना एखादा अधिकारी बेकायदेशीर कागदपत्रे सर्रास करतो व नागरिकांकडून तक्रार/माहितीची मागणी आल्याशिवाय त्याबाबत कोणतीही कारवाई केली जात नाही, ही बाब गंभीर आहे. एका प्रकारे माहितीचा मूळ स्त्रोत असलेल्या कागदपत्रांचे-पर्यायाने माहितीचे विकृतीकरण करण्याचा हा प्रकार आहे. परिणामी दिलेली माहिती अभिलेखानुसार असली तरी नियमबाहय व म्हणून खोटी दिली जाणार व ते नागरिकांची दिशाभूल करणारे ठरते. शासनाने, तसेच जागरुक नाकरिकांनीही याबाबत दक्ष राहणे गरजेचे असल्याचे त्यातून अधिक प्रकर्षाने पुढे येते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ७ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. राजेंद्रकुमार रघुवेल समुद्रे
मु. पो. कोडोली (भोसलकी नजीक), अपीलकर्ता
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर - ४१६ ११४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
आर्यविन ख्रिश्चन हायस्कूल, गवत मंडई, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. राजेंद्रकुमार रघुवेल समुद्रे
मु. पो. कोडोली (भोसलकी नजीक),
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर - ४१६ ११४

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. दत्तात्रय शंकर पोवार

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
आर्यविन ख्रिश्चन हायस्कूल, गवत मंडई, कोल्हापूर श्री. दिलीप कृष्णाजी चोपडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढील प्रमाणे निवेदन केले :

**अपीलकर्ता -** सेवापुस्तक व परिविक्षाधीन कालावधीची मान्यता याबाबतची माहिती शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. संक्षिप्त माहिती मिळाली. मात्र पूर्वपदावरील नेमणूक सन १९९७ पासून मिळावी व तशी नोंद सेवापुस्तकात व्हावी, याबाबत झालेल्या तडजोडीनुसार एक वर्षात निर्णय होणे आवश्यक होते. तो झाला नाही.

**जन माहिती अधिकारी -** शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून कळविल्यानुसार रजिस्टर्ड टपालाने माहिती दोनदा पाठविली. थेट शाळेकडे अपीलकर्त्यांनी आजपर्यंत एकही अर्ज केलेला नाही. त्यांची मागणी हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग आहे, माहितीचा नाही.

**अपिलीय प्राधिकारी -** अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. सेवाविषयक मागण्या हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही. नियमानुसार सेवापुस्तकात नोंदी घेणे हा मुख्याध्यापकांच्या कामाचा भाग आहे.

अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही. माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ७ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. महावीर रघुनाथ काकडे
काकडे वस्ती, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८३६/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३/२/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. महावीर रघुनाथ काकडे<br>काकडे वस्ती, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर<br><br>**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर<br>**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. के. एच. नवले | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, विद्यमान जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

**अपीलकर्ता** - मोहोळ ग्रामपंचायतीने डिसेंबर २००७ पासून आजपर्यंतच्या केलेल्या काही कामांची माहिती मागितली होती. परंतु ती चुकीची दिली. 'कामांच्या एम.बी' म्हणजे काय ते मला माहीत नाही, परंतु त्याच्या प्रती मिळणे आवश्यक होते. भाडेतत्त्वावरील जागेसाठी मी पाठविलेली मनीऑर्डर ग्रामसेवकाने नाकारली.

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** - अपीलकर्त्यांनी हीच माहिती आतापर्यंत ३ वेळा मागितली. त्या त्या वेळी दिली. ग्रामपंचायतीचे टपाल ते स्वीकारत नाहीत व स्वीकारले तर लखोटयात कोरे कागद पाठविल्याची खोटी तक्रार करतात. असाच त्यानी नाकारलेला लिफाफा आयोगाच्या कार्यालयात अपील क्र. १४७९/सोलापूरच्या सुनावणीच्या वेळी अधिका-यांसमक्ष फोडून १७८ पृष्ठांच्या प्रती दिल्या. दि. १८ जुलै २००८ पासून मी पदभार स्वीकारला. त्यापूर्वीच्या दप्तराचा पदभार मिळालेला नाही. गटविकास अधिका-याना त्याच वेळी तसे लेखी कळविले आहे. अपीलकर्त्यांनी पाठविलेली मनीऑर्डरची रक्कम मी स्वीकारावी व भुईभाडयाची पावती होऊन ग्रामपंचायतीची जागा २५ लाख रुपयाना विकण्याचा अपीलकर्त्याचा डाव होता. तो यशस्वी होऊ दिला नाही, म्हणून त्रास देण्यासाठी ते अर्ज व तक्रारी करीत आहेत. या जागेच्या प्रकरणी मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून मोहोळच्या न्यायालयात जागेबाबतची सुनावणी चालू आहे.

**विद्यमान जन माहिती अधिकारी** : तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. के. एच. नवले यांच्याकडून त्यांच्या काळातील पदभार मला मिळाला असून त्या आधीचे ग्रामसेवक श्री. रामभाऊ खराडे यांच्या काळातील दप्तर मिळालेले नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या उद्दिष्टाशी सुसंगत असा वापर अपीलकर्ता करीत असल्याचे या प्रकरणी दिसून येत नाही. तसेच ग्रामपंचायतीच्या दप्तराबाबतची अनास्थाही दिसून येते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ८ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. धोंडीराम शंकर कांबळे (सहाय्यक शिक्षक),
मु कुरणी, पो. मळगे बुद्रुक, ता. कागल, अपीलकर्ता
जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्रीराम हायस्कूल व ज्युनि.कॉलेज, कुडित्रे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०५/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. धोंडीराम शंकर कांबळे (सहाय्यक शिक्षक),
मु कुरणी, पो. मळगे बुद्रुक, ता. कागल, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि. कोल्हापूर श्री. दत्तात्रय शंकर पोवार

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्रीराम हायस्कूल व ज्युनि.कॉलेज, कुडित्रे श्री. महादेव केशव आळवेकर

श्री. विलास लहु सुतार, प्रतिनिधी सांगरुळ शिक्षण संस्था, सांगरुळ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सांगरुळ शिक्षण संस्थेच्या दोन शाळांच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती अपुरी व अनधिकृत स्वरुपाची दिली. संस्थेने सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, पुणे यांच्याकडून रोस्टर व सेवाज्येष्ठता तपासून व मंजूर करुन आणलेली नाही. आयुक्तांचा त्यावर सही-शिक्का नाही. मुख्याध्यापक-उपमुख्याध्यापक यांची सेवाज्येष्ठता प्रस्तावासोबत जोडलेली नाही. एका प्रस्तावात जातपडताळणी प्रमाणपत्र जोडलेले नाही. अनुसूचित जमातीतील एका सेवकाला सेवाज्येष्ठ असताना पदापासून वंचित का केले याची कागदपत्रे जोडलेली नाहीत. त्यामुळे संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. धोंडीराम शंकर कांबळे यानी केली.

अपीलकर्ता संस्थेत सहाय्यक शिक्षक असून वेळोवेळी त्यानी केलेल्या अर्जांना उत्तरे देण्यात आली आहेत. शाळेची माहिती वेळेत दिली. अन्य माहिती शिक्षणाधिकारी कार्यालयाकडील असून कोणतीही माहिती नाकारलेली नाही. मागणी केलेली कागदपत्रे शाळा व संस्थेकडून मिळाल्याचे श्री. कांबळे यानी दि. १०.२.२०१० रोजी लेखी दिले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीराम हायस्कूल व ज्युनि.कॉलेज, कुडित्रे श्री. महादेव केशव आळवेकर यानी केले.

सन २००७ पासूनची माहिती अपीलकर्ता यानी मागितली होती. उपलब्ध माहिती दिली व उपलब्ध होत नसलेल्या माहितीबाबत तसे कळविले. संस्थेकडील माहितीबाबत संस्था व मुख्याध्यापक याना कळवून माहिती देण्याची व्यवस्था केली. श्री. कांबळे यांचे प्रथम अपील मुदतबाहय असूनही सुनावणी घेऊन माहिती देण्याबाबत आदेश केले, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि. कोल्हापूर श्री. दत्तात्रय शंकर पोवार यानी केले.

माहिती देण्याबाबतच्या कार्यवाहीबाबतचा खुलासा अपिलीय प्राधिकारी यानी करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री. दत्तात्रय शंकर पोवार यानी दि. १०.१.२०११ च्या पत्रान्वये सादर केलेला खुलासा, उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आल्याचे दिसते. अधिक माहिती आवश्यक असल्यास अभिलेख अवलोकन करुन प्रती प्राप्त करुन घेण्याचा मार्ग अपीलकर्त्यास उपलब्ध आहे. मात्र मान्यताप्रस्ताव आदि कागदपत्रे

जतनाच्या कालावधीसह उपलब्ध होणे व तशी ती उपलब्ध होत नसल्यास संबंधितांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये कारवाई केली जाणे आवश्यक आहे, याची समज अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि. कोल्हापूर याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ८ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संजय पांडुरंग गोरे
श्रीनाथ चौक, विनोद हार्डवेअर शेजारी, — अपीलकर्ता
माळशिरस, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी (भूसंपादन)
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूसंपादन अधिकारी क्र. १,
सोलापूर, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५०६/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूसंपादन अधिकारी क्र. १,
सोलापूर, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
श्रीमती शकुंतला विश्वनाथ गायकवाड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

K/5/M

## विवेचन

रस्त्यासाठीच्या जमीन संपादनाबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. संजय पांडुरंग गोरे यानी मागितली होती. ती कागदपत्रे आढळून न आल्यामुळे अधिक तपशीलाची मागणी अपीलकर्त्यांकडे केली. परंतु तसा तपशिल त्यानी सादर केला नाही. जमीन संपादन झाली नसल्याचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज व पंढरपूर यानी कळविले आहे. त्यामुळे जमीन संपादित झाल्याचे पुरावे अपीलकर्त्यांनी उपलब्ध करुन दिल्यास शोध घेऊन माहिती देता येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी क्र. १, सोलापूर, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्रीमती शकुंतला विश्वनाथ गायकवाड यानी पूरक कागदपत्रांसह केले. माहितीबाबत त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

पुणे
8 MAR 2011

K/5/M

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नितीन शहाजी कदम
मु. पो. वेळापूर (शेरी नं. २), ता. माळशिरस, अपीलकर्ता
जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
विद्या प्रतिष्ठानचे वसंतराव पवार विधी महाविद्यालय,
विद्यानगरी बारामती, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
विद्या प्रतिष्ठानचे वसंतराव पवार विधी महाविद्यालय,
विद्यानगरी बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७८/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,<br>विद्या प्रतिष्ठानचे वसंतराव पवार विधी महाविद्यालय,<br>विद्यानगरी बारामती, जि. पुणे डॉ. आर. के. पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,<br>विद्या प्रतिष्ठानचे वसंतराव पवार विधी महाविद्यालय,<br>विद्यानगरी बारामती, जि. पुणे श्री. संजय लक्ष्मण जाधव | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. नितीन शहाजी कदम यांच्या दि. २३.१२.२००८ च्या अर्जानुसार दि. १६.१.२००९ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली. पुनःपुन्हा तीच माहिती मागून दिल्यावरही ती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता करीत असतात. विद्यापीठ परीक्षेत कॉपी करताना त्याना पकडण्यात आले होते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, विद्या प्रतिष्ठानचे वसंतराव पवार विधी महाविद्यालय, विद्यानगरी बारामती, जि. पुणे श्री. संजय लक्ष्मण जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, विद्या प्रतिष्ठानचे वसंतराव पवार विधी महाविद्यालय, विद्यानगरी बारामती, जि. पुणे डॉ. आर. के. पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ८ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सिकंदर अहमद शेख
द्वारा शेख चाळ, मु.पो.लोणी काळभोर, पाषाणकर बाग, ता.हवेली, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर(४), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर(४), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१४४+३१८८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सिकंदर अहमद शेख
द्वारा शेख चाळ, मु.पो.लोणी काळभोर, पाषाणकर बाग, ता.हवेली, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(४),
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे प्रतिनिधी श्री.आनंद कटके

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(४),
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.कैलास प्रभाकर जेबले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यानी पुढीलप्रमाणे निवेदन केले.

अपीलकर्ता : नवरंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, पुणे(विसर्जित) या संस्थेचे अवसायक व अध्यक्ष यांच्याबाबत मयत खातेदाराच्या मुलांनी केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती मिळाली नाही. संस्थेची जमीन अवसायक श्री.अरूण रामचंद्र आरेकर विकत असून भ्रष्टाचार उघड होऊ नये म्हणून माहिती दिली जात नाही. संस्थेने दि महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स कॉर्पोरेशनच्या कर्जाची परतफेड केल्या संदर्भातील माहिती मिळाली पाहिजे.

जन माहिती अधिकारी : श्री.शेख यांच्या दि.११.२.२०१० च्या अर्जाला दि.१८.२.२०१० रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले व मागणीनुसार कागदपत्रांच्या छायांकित प्रती पाठविल्या. संबंधित संस्था अवसायनात असून लिलावाची प्रक्रिया चालू आहे. काही मुद्दयांमध्ये श्री.शेख यानी स्पष्टीकरण, अभिप्राय अशा स्वरूपाची माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत न येणारी विचारणा केली आहे. कर्जफेडीबाबतचा तपशील आदि माहितीची तपासणी करावी व अपीलकर्त्यास त्याची माहिती द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले. त्यानुसार तपासणी करून पुन्हा माहिती दिली. जागेच्या गैरव्यवहाराबाबतच्या तक्रारीवरील चाचणी लेखापरीक्षणाची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून तेही श्री.शेख याना कळविले आहे. महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स यांच्याकडून कर्जाबाबतचा ताळेबंद प्राप्त झाला असून त्याची प्रत अपीलकर्त्यास देत आहोत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ८ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.निमराज पंढरीनाथ विसपुते
आर/१५-बी, स्वामी समर्थ सहकारी गृहरचना संस्था
मर्यादित(अ), पाषाण, पुणे-२१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग
यांचे कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे-४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग
यांचे कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०१ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग यांचे कार्यालय,
ढोले पाटील रोड, पुणे- श्री.एम.टी.असिम

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग
यांचे कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे श्री.चं.आ.पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पाठराखीण भगिनी सहाय्य समिती, घोले रोड, पुणे या संस्थेकडील माहिती न मिळाल्यामुळे अपीलकर्ता श्री.निमराज पंढरीनाथ विसपुते यानी धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे संस्थेची माहिती मागितली. संस्थेला कोणतेही सरकारी अनुदान वा अर्थसहाय्य नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(एच) मधील तरतुदीनुसार संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही. त्यामुळे संस्थेला हा अधिनियम लागू नाही, असे संस्थेने स्पष्ट केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग यांचे कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे श्री.चं.आ.पाटील यानी केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ८ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवशंकर विश्वनाथ घोलप
मु.महागांव, पो.बावी, ता.बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पुणे, पी.एम.टी.बिल्डिंग, स्वारगेट, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे,
पी.एम.टी.बिल्डिंग, स्वारगेट, पुणे प्रतिनिधी श्री.एम.एम.गायकवाड

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पुणे, पी.एम.टी.बिल्डिंग, स्वारगेट, पुणे प्रतिनिधी श्री.एस.एस.कलशेट्टी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.२.२०११ रोजी घेण्यात आली.

मूळ अर्जानुसार माहिती मिळाली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी याना शास्ती व्हावी व आपल्याला आर्थिक व मानसिक तोशिस पडल्यामुळे नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शिवशंकर विश्वनाथ घोलप यानी लेखी निवेदनात केली आहे.

ज्ञानदिप माध्यमिक आश्रमशाळा, तांबेवाडी, ता.बार्शी, जि.सोलापूर या आश्रमशाळेचे मुख्याध्यापक व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांच्याकडे बव्हंशी एकाच संदर्भातील माहिती श्री.घोलप सातत्याने मागत असतात. दहा ते पंधरा वर्षापूर्वीची ही माहिती असल्यामुळे शोधण्यास विलंब होतो. शाळेकडील व संस्थेकडील माहिती असल्यामुळे कार्यालयाच्या स्तरावरील माहिती देऊन त्यांचे अर्ज संबंधितांकडे वर्ग करण्यात येतात. शाळेने माहिती दिली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे, पी.एम.टी.बिल्डिंग, स्वारगेट, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.एम.एम.गायकवाड यानी पूरक कागदपत्रांसह केले.

श्री.घोलप यानी विविध अर्ज व अपिलांद्वारे (१)उस्मानाबाद जिल्हा वसंतराव नाईक मागास समाजसेवा मंडळ, ता.जि.उस्मानाबाद, (२)नाईक चॅरिटेबल ट्रस्ट, जुना बस डेपो, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद व (३)मुख्याध्यापक, ज्ञानदिप माध्यमिक आश्रमशाळा, तांबेवाडी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांच्याकडील माहिती सातत्याने मागितल्याचे दिसते. या यंत्रणांचा वेळ व परिश्रम याचा विचार करता या तीन कार्यालयांकडील अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यानी प्राप्त करून घेणे व त्या संबंधित जन माहिती अधिकारी यानी उपलब्ध करून देणे अधिक योग्य ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) (१)उस्मानाबाद जिल्हा वसंतराव नाईक मागास समाजसेवा मंडळ, ता.जि.उस्मानाबाद, (२)नाईक चॅरिटेबल ट्रस्ट, जुना बस डेपो, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद व

(३)मुख्याध्यापक, ज्ञानदिप माध्यमिक आश्रमशाळा, तांबेवाडी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांच्याकडील अभिलेखांचे अवलोकन मुख्याध्यापक / सचिव यानी अपीलकर्ता याना करू द्यावे व त्यांच्या लेखी मागणीनुसार कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारून पुरवाव्यात. यानुसार कार्यवाही पार पाडली जाण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे, पी.एम.टी.बिल्डिंग, स्वारगेट, पुणे व अपिलीय प्राधिकारी अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे, पी.एम.टी.बिल्डिंग, स्वारगेट, पुणे यांची राहील. त्यानुसार पूर्तता करून दि.३०.३.२०११ पर्यंत सर्व संबंधितांनी आयोगाला अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.भिमराव (दादा) कडाळे पाटील व — अपीलकर्ता
(२)श्री.गोकुळ आण्णा कडाळे
मु.पो.पिंपरी खुर्द, ता.इंदापूर, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक
बांधकाम विभाग, मिरज, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक
बांधकाम विभाग, मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५५ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जि.सांगली श्री.धोंडिराम नारायण पाटील | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मिरज विभागा अंतर्गत उपविभागाने केलेल्या सर्व कामांची सन २००६ ते २००९ या काळातील विस्तृत माहिती अपीलकर्ता (१)श्री.भिमराव (दादा) कडाळे पाटील व (२)श्री.गोकुळ आण्णा कडाळे यानी दि.१५.३.२०१० च्या अर्जाद्वारे (प्राप्त दि.२२.३.२०१०) मागितली होती. अपीलकर्त्यांनी दारिद्र्यरेषेखालील दाखला जोडला होता व एवढी विस्तृत माहिती निःशुल्क देणे शक्य नव्हते. त्यामुळे अभिलेख अवलोकनास येण्याबाबत त्याना कळविले. परंतु त्यानी अपिलीय प्राधिकारी

यांच्याकडे अपील केले. अपीलकर्ता उपस्थित असलेल्या तारखेला-दि.१३.८.२०१० रोजी सर्व कागदपत्रे त्याना दाखविली. त्यातील त्यानी मागणी केलेली माहिती दि.३०.८.२०१० रोजी रजिस्टर्ड टपालाने पाठविली, असे जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जि.सांगली श्री.धोंडिराम नारायण पाटील यानी पोहोचपावतीच्या प्रतीसह नमूद केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. प्रथम अपील करण्यापूर्वीच जन माहिती अधिकारी यानी कळविल्यानुसार अपीलकर्त्यांनी अभिलेख अवलोकन करून आवश्यक माहिती प्राप्त करून घ्यावयास हवी होती. त्यामुळे सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम यांचा अपव्यय टळला असता.

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मुकुंद श्रीनिवास बागल
७, दिग्विजय कॉलनी, वडगाव (मावळ), पुणे-४१२१०६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय सहसचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२९५ /२००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मुकुंद श्रीनिवास बागल
७, दिग्विजय कॉलनी, वडगाव (मावळ), पुणे-४१२१०६

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे श्री.एम.व्ही.गोसावी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय सहसचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे श्री.एस.बी.कुलकर्णी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या काही विषयांच्या उत्तरपत्रिका व अन्य माहिती मी मागितली होती. जन माहिती अधिकारी यानी उत्तरपत्रिकांच्या प्रती गोपनीय असल्याच्या कारणावरून नाकारल्या व अर्धवट माहिती दिली.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : श्री.बागल यांच्या अर्जानुसार उत्तरपत्रिकांच्या प्रती वगळता माहिती दिली. उत्तरपत्रिकांच्या प्रती देण्याबाबत राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाने अपील क्र.३६८ / २००९ / पुणेमध्ये दिलेल्या निर्णयाला रिट याचिका क्र.८८६८/२००९ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने दि.१५.१०.२००९ रोजी स्थगिती दिली आहे.

उत्तरपत्रिकांच्या प्रती देण्याच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती लक्षात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.बी.भडके
द्वारा कोकाटे, योगेश्वर बंगला, यशसंकुल अपार्टमेंटसमोर, केशवनगर,
कानिफनाथ सुपर मार्केटसमोर, पिंपळे सौदागर, पुणे-१७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (करसंकलन),
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी (कर), पिंपरी वाघेरे
विभागीय कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२३८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी (कर), पिंपरी वाघेरे विभागीय कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्रीमती आशादेवी मारूती दुरगुडे | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्त्या सौ.बी.भडके यानी दि.२६.४.२०१० च्या अर्जान्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यानी दि.१८.५.२०१० च्या पत्रान्वये यूपीसी टपालाने पाठविली. जी माहिती आपल्या

कार्यालयाकडील नाही त्याबाबत तसे कळविले. त्यानंतर त्यानी मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती मागितली. अभिलेखाचे अवलोकन करू देऊन त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रतीही दिल्या. तरीही त्यांचे समाधान न झाल्याने त्याना हव्या असलेल्या आणखी कागदपत्रांबाबत संचिकांचा शोध घेऊन उपलब्ध झाल्यास देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले. त्यानुसार शोध मोहिम घेऊन माहिती दिली. याची नोंद घेऊन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (करसंकलन), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यानी अपील फेटाळले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी (कर), पिंपरी वाघेरे विभागीय कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्रीमती आशादेवी मारूती दुरगुडे यानी पूरक कागदपत्रांसह केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शशिकांत सदाशिव भोसले
मु.पो.स्वामी चिंचोली, ता.दौंड, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक, प्रादेशिक दुग्ध व्यवसाय
विकास अधिकारी, कॉमनवेल्थ इमारत, लक्ष्मी रोड, पुणे-३०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२६६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२६६ / २०१० / पुणे |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी श्रीमती पल्लवी प्रशांत घाटगे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक, प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी,
कॉमनवेल्थ इमारत, लक्ष्मी रोड, पुणे
विद्यमान-श्री.सतेश विठ्ठल गायकवाड, तत्कालीन-श्री.मारूती सिद्राम माळगे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

पुणे प्रादेशिक दुय्यम निवड मंडळातर्फे सन १९९५ मध्ये दुग्धव्यवसाय विकास विभागातील मंडल निरीक्षक पदासाठी घेतलेल्या परीक्षेची गुणपत्रकाची प्रत अपीलकर्ता श्री.शशिकांत

सदाशिव भोसले यानी मागितली होती. परंतु सन १९९५ मध्ये अथवा त्यानंतर प्रादेशिक दुय्यम निवड मंडळातर्फे परीक्षा घेऊन निवडीने नियुक्ती केलेली नाही. त्यामुळे गुणपत्रकाच्या प्रती देता येत नाहीत, असे अपीलकर्त्यास कळविले व विभागातील मंडल निरीक्षक पदावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या ज्येष्ठतासूचीची प्रतही दिली. उपरोक्त निवड मंडळ आता बंद झाले असून त्याकडील सर्व संचिका विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयाकडे आहेत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, कॉमनवेल्थ इमारत, लक्ष्मी रोड, पुणे श्री.सतेश विठ्ठल गायकवाड व अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी श्रीमती पल्लवी प्रशांत घाटगे यांनी केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.लक्ष्मीबाई भिमदेव कदम
मु.पो.मुरूम, ता.बारामती, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक प्राध्यापक, महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था,
ससून सर्वोपचार रूग्णालय परिसर, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था,
ससून सर्वोपचार रूग्णालय परिसर, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६०६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.लक्ष्मीबाई भिमदेव कदम
मु.पो.मुरूम, ता.बारामती, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था,
ससून सर्वोपचार रूग्णालय परिसर, पुणे श्री.संजीव सरमुकद्दम

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता / प्रतिनिधी श्री.भिमदेव पांडुरंग कदम : श्रीमती लक्ष्मीबाई भिमदेव कदम यांच्या भावाच्या मुलांनी फसवणूक केली असून त्याबाबत न्यायालयात दावा दाखल केला आहे. श्रीमती कदम यानी सन १९९९/२००० मध्ये मानसिक परिणाम झाल्यामुळे मानसोपचार घेतल्याचा दाखला मागितला होता, तो दिला जात नाही.

जन माहिती अधिकारी : श्रीमती कदम यांच्या स्वतःच्या मागणीनुसार त्यांच्यावरील औषधोपचाराचा सर्व तपशील दिला आहे. मात्र अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार विशिष्ट स्वरूपाचे दाखले महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था देत नाही. त्यामुळे तसा दाखला देणे शक्य नाही.

जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, ससून सर्वोपचार रूग्णालय परिसर, पुणे यानी सादर केलेली सर्व कागदपत्रे लक्षात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. विशिष्ट प्रकारचा दाखला देण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संभाजी लक्ष्मण हरगुडे
मु.पो.केसनंद, ता.हवेली, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक सचिव (विकसन), पुणे जिल्हा कृषी
उत्पन्न बाजार समिती, श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०८६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संभाजी लक्ष्मण हरगुडे
मु.पो.केसनंद, ता.हवेली, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे प्रतिनिधी श्री.आनंद कटके

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : सन २००८ मध्ये शासनाने कांदा अनुदान मंजूर केले. पुणे जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समिती व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यानी त्याची दखल घेऊन कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु तीन वर्षे होऊनही शेतकऱ्यांना अनुदान दिलेले नाही. सर्व कागदपत्रे जिल्हा उपनिबंधकांना सादर करुनही त्यांनी अनुदान वाटप केलेले नाही.

अपिलीय प्राधिकारी : पुणे जिल्ह्यातील सुमारे २००० शेतकऱ्यांचा हा प्रश्न असून त्यानी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीकडे कांदा घातला. त्यामुळे त्या बाजार समितीने छाननी करून अनुदानाबाबतचा तपशील दिला पाहिजे, असे आमचे म्हणणे आहे. याबाबत पुणे व मुंबई या दोन्हीही कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून आवश्यक सहकार्य न झाल्याने अनुदान तसेच राहिले. त्यामुळे आता जाहिरात देऊन शेतकऱ्यांकडून तपशील मागवून अनुदान देण्याची कार्यवाही केली जात आहे.

उभय बाजूंची निवेदने लक्षात घेता अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही.

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.सुनिता कांताराम फुलसुंदर
इंद्रायणी विहार, फ्लॅट नं.२०२, प्लॉट नं.१७, सर्व्हे नं.६७/१बी,
विद्यानगर, पुणे-३२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाजकल्याण अधिकारी गट-अ,
समाजकल्याण विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वैद्यकिय सामाजिक कार्यकर्ता, समाजकल्याण विभाग,
पुणे जिल्हा परिषद, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२८२ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ.सुनिता कांताराम फुलसुंदर
इंद्रायणी विहार, फ्लॅट नं.२०२, प्लॉट नं.१७,
सर्व्हे नं.६७/१बी, विद्यानगर, पुणे-३२

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाजकल्याण अधिकारी गट-अ, समाजकल्याण विभाग,
पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.पी.एस.कवटे

**जन माहिती अधिकारी** तथा वैद्यकिय सामाजिक कार्यकर्ता, समाजकल्याण विभाग,
पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.नंदकुमार फुले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : मला दिलेली वेतनवाढ ज्या शासन निर्णयाच्या/आदेशांच्या आधारे काढून घेतली त्याच्या प्रती मागितल्या असता महाराष्ट्र नागरी सेवा नियमांची माहिती दिली. अपंग शाळांना ती लागू आहे की नाही, हे मला स्पष्ट झालेले नाही. माहिती विहित मुदतीत, परंतु अपुरी दिली.

जन माहिती अधिकारी : श्रीमती फुलसुंदर याना मुद्देनिहाय उत्तर विहित मुदतीत दिले. महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ ची लागूपुरती प्रत दिली. त्यानी केलेल्या प्रथम अपिलाच्या वेळी त्यांच्या मागणी संदर्भातील सर्व बाबी समजावून सांगितल्या व अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार १९९७ च्या अपंग शाळा संहितेच्या संबंधित दोन पृष्ठांची छायांकित प्रतही दिली. याच विषयासंदर्भात त्यानी ११ अपिले केली असून त्यापेक्षा त्यानी कार्यालयात येऊन आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे पाहून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती घ्याव्यात. तसेच शंकांचे निरसनही करून घ्यावे, असेही स्पष्ट केले आहे.

अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यानी सर्व माहिती दिली असून आणखी माहिती हवी असल्यास देण्याची तयारी दर्शविली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा नियम(वेतन) अपंगानाही लागू होतात, हेही श्रीमती फुलसुंदर याना स्पष्ट केले आहे.

अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यानी माहितीबाबबत केलेली कार्यवाही योग्य आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत खुलासा, स्पष्टीकरण अशा स्वरूपाची विचारणा करता

येत नाही. तरीही  एकाच मुद्दयासाठी पुनः पुन्हा अर्ज व अपिले करून सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम वाया न घालविण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी आनंदा कापसे
मु.पो.रेठरे धरण, ता.वाळवा, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती वाळवा, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३२ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.७.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी आनंदा कापसे
मु.पो.रेठरे धरण, ता.वाळवा, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली प्रतिनिधी श्री.ए.के.नानगुरे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती वाळवा, इस्लामपूर,
ता.वाळवा, जि.सांगली डॉ.ए.एम.सुतार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : चार प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील अनुदान आदिविषयीची माहिती जन माहिती अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती वाळवा, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली यांच्याकडे दि.५.४.२००८ च्या अर्जान्वये मागितली होती. तसेच काही संचिका पाहता येतील का, अशी विचारणाही केली होती. परंतु माहिती मिळाली नाही. माहिती जाणूनबुजून दिली जात नाही. दिलेली माहितीही चार महिने विलंबाने दिलेली आहे. आयोगाने अशा अधिकाऱ्यांना पाठीशी न घालता जास्तीत जास्त २५००० रूपये दंड करून धडा शिकवावा व मागितलेली माहिती मिळावी.

याच स्वरूपाचे लेखी निवेदनही अपीलकर्ता यानी सादर केले.

जन माहिती अधिकारी : श्री.कापसे यांच्या दि.५.४.२००८ च्या अर्जाला दि.२३.४.२००८ च्या पत्रान्वये उत्तर दिले व काही माहिती दिली. चार प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील मागितलेली सविस्तर माहिती अनेक संस्थांच्या संदर्भातील असून ती संकलित करून देणे आवश्यक होते. या केंद्रांकडून अंदाजे शुल्काची माहिती घेऊन देऊ केलेले पत्र समक्ष स्वीकारण्यास श्री.कापसे यानी नकार दिल्यामुळे टपालाने कळविले. त्यानी शुल्क भरले नाही, तरीही केंद्रांकडून माहिती संकलित झाल्यावर दि.३१.७.२००८ व दि.२५.८.२००८ रोजी दिली.

अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी : माहिती संकलित केली जात असल्याचे व मुदतवाढीबद्दलही श्री.कापसे याना कळविले होते.

माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबतचा अहवाल, संबंधितांचे खुलासे घेऊन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यानी दि.२४.११.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा, शास्तीबाबतचा निर्णय या अहवालानंतर घेण्यात येईल, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाच्या मौखिक आदेशानुसार जन माहिती अधिकारी डॉ.ए.एम.सुतार व अपिलीय प्राधिकारी डॉ.ए.पी.वाघमारे यानी दि.२२.७.२०१० च्या पत्रान्वये अहवाल सादर केला. श्री.कापसे यांच्या दि.५.४.२००८ च्या अर्जानुसार माहितीसाठी किती शुल्क भरावे लागेल, अशी विचारणा करणारे पत्र

दि.८.४.२००८ रोजी चारही प्राथमिक आरोग्य केंद्रांना पाठविले. एकूण ७१४२ रूपये शुल्क होईल, असे या चार केंद्रांच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कळविले. श्री.कापसे तालुका आरोग्य अधिकारी, वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर येथे दि.२१.४.२००८ रोजी आले असता शुल्काबाबतचे देऊ केलेले पत्र स्वीकारण्यास त्यानी नकार दिला. त्यामुळे दि.२२.४.२००८ रोजी साध्या टपालाने ते पाठविले. जावक बारनिशीत त्याची नोंद आहे. दि.२३.४.२००८ रोजी ते पुन्हा या कार्यालयात आले असता कागदपत्रे पाहण्याची मागणी त्यानी केली. त्यानुसार दि.२३.४.२००८च्या पत्रान्वये संबंधितांना सूचना दिल्या व श्री.कापसे याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारून देण्याबाबत कळविले. तसेच काही माहिती त्याच दिवशी समक्ष दिली. श्री.कापसे यांची तशी पोहोच आहे. अन्य केंद्रांनी कळविल्याप्रमाणे शुल्क श्री.कापसे यानी भरले नाही. तसेच कागदपत्रे पाहण्यासही ते गेले नाहीत व माहिती न मिळाल्याच्या कारणावरून त्यानी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांच्याकडे अपील केले. दि.७.७.२००८ रोजी अपिलाचा निर्णय होऊन ऊर्वरित तीन प्राथमिक आरोग्य केंद्रांना माहिती सादर करण्याबाबत कळविले. या केंद्रांकडून प्राप्त झालेली माहिती श्री.कापसे याना दि.३१.७.२००८ व दि.२५.८.२००८ रोजी मोफत देण्यात आली. श्री.कापसे यानी आधी कळविलेले शुल्क न भरताही त्यांच्या अपिलातील मागणीनुसार त्याना माहिती मोफत दिली, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी संबंधित पत्रव्यवहाराच्या प्रतींसह अहवालात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केलेला सविस्तर अहवाल लक्षात घेता श्री.कापसे यांची शास्तीची मागणी रास्त ठरत नाही. तसेच त्यानी मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असून चार केंद्रांकडील आहे. त्या त्या प्रत्येक केंद्राकडे स्वतंत्रपणे ते माहिती मागू शकले असते. तसेच 'काही फाईल पाहू शकतो का (मुद्दा क्र.५),' 'कोणती कार्यवाही केली जाणार?(मुद्दा क्र.४),' 'शासनाच्या नियमाप्रमाणे किती टक्के सेवा जनतेला मिळते याची सविस्तर माहिती मिळावी (मुद्दा क्र.६)'अशा स्वरूपाची विचारणा श्री.कापसे यानी केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या संज्ञेत ती येत नाही. नेमकेपणाने माहितीची मागणी करणे व ती प्राप्त होण्या- न होण्याबाबतचा वस्तुनिष्ठ तपशील अपीलकर्त्यांनी देणे आवश्यक आहे. त्याबरोबरच जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानीही तोंडी स्वरूपात उत्तर वा प्रतिसाद न देता लेखी स्वरूपात देणे व त्याबाबतच्या योग्य त्या

पुराव्यानिशी सुनावणीच्या वेळीच तपशील सादर करणे आवश्यक आहे, अशी समज उभय बाजूंना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. आर.एस.गांधी
७१०/अ/११ शालीमार बिल्डिंग, अपीलकर्ता
गुरुनानग नगर, शंकरशेठ रोड, पुणे ४११ ०४२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, ३ रा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत, पुणे - १

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक,
जिल्हाधिकारी पुणे शहर, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय,
५ फायनान्स रोड, प्रशासकीय छायाचित्रण नोंदणी कार्यालय इमारत,
२ रा मजला, पुणे - १.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३११९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, ३ रा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. सुनिल नारखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक,
जिल्हाधिकारी पुणे शहर, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय,
५ फायनान्स रोड, प्रशासकीय छायाचित्रण नोंदणी कार्यालय इमारत,
२ रा मजला, पुणे श्री. संजीव देशमुख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत जन माहिती अधिकारी यानी पुढील प्रमाणे निवेदन केले :

**जन माहिती अधिकारी -** माफी योजना सन १९९४-९५ मध्ये मुळ दस्तांची मागणी अपीलकर्ता श्री.आर.एस.गांधी यानी केली असून त्याचा शोध घेण्यात येत असल्याचे त्याना कळविले. तसेच पैसे भरल्याचा पुरावा दिल्यास कोषागार कार्यालयाकडून चलन तपासून दस्तऐवज प्रमाणित करता येईल असेही त्याना कळविले. पैसे रोखीने भरल्याचा पुरावा अपीलकर्त्यांने दिला आहे. परंतु सुमारे ५४ हजार दस्त असून त्यांच्या वर्गीकरणाचे काम सध्या सुरु आहे. त्यामुळे शोधायला विलंब लागत आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी यानी केले.

मूळ दस्त परत देण्याची मागणी काटेकोरपणे पाहता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तथापि मूळ कागदपत्रे मिळत नसल्यामुळे दस्त प्रमाणित करुन देण्याबाबत अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे झालेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यांस दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

१. अपील अंशत मान्य

२. दस्त प्रमाणित करुन देण्याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, ३ रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे श्री. चिंतामणी जोशी यांच्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक, जिल्हाधिकारी पुणे शहर, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. संजीव देशमुख यानी दि. २५.३.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश दिनकर पुंडे
३ धनदा अपार्टमेंट, भक्ती मार्ग, लॉ कॉलेज रोड, अपीलकर्ता
एरंडवणा, पुणे ४११ ००४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
पुणे विभाग, ३ रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे - १
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह जिल्हा उपनिबंधक वर्ग-२,
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
पुणे विभाग, ३ रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे - १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२०२/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रमेश दिनकर पुंडे
३ धनदा अपार्टमेंट, भक्ती मार्ग, लॉ कॉलेज रोड,एरंडवणा, पुणे ४११ ००४

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
पुणे विभाग, ३ रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे श्री. चिंतामणी जोशी

**जन माहिती अधिकारी** तथा सह जिल्हा उपनिबंधक वर्ग-२,
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
पुणे विभाग, ३ रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे श्री. एस.ओ.तारखेडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

**<u>अपीलकर्ता</u> -** नोंदणी उपमहानिरिक्षक व मुद्रांक उपनियंत्रक पुणे विभाग, पुणे यांच्याकडील पाच जिल्हयांच्या कार्यालयातील तपासणी अहवालांच्या छायांकित प्रती मागितल्या होत्या. कार्यालयाकडे तयार असलेली माहिती मागितल्यामुळे ती ३० दिवसांत देणे शक्य व आवश्यक होते. माहितीची एकूण १६९५ पाने असून त्यासाठी रु. ३३९०/- एवढे शुल्क भरण्यास जन माहिती अधिकारी यानी १८.६.२००८ च्या पत्रान्वये कळविले. शुल्क भरल्यावर ४ दिवसांनी प्रती दिल्या जातील, असे त्यानी पत्रात म्हटले होते. दि. २०.६.२००८ रोजी शुल्क भरले. दि. २६.६.२००८ रोजी प्रती घ्यावयास गेलो असता पूर्ण माहिती उपलब्ध नव्हती. त्यामुळे माहिती निःशुल्क मिळावी व भरलेले शुल्क परत मिळावे, अशी मागणी केली. जन माहिती अधिकारी यानी व नंतर अपिलात अपिलीय प्राधिकारी यानी ती अमान्य केली. दरम्यान याबाबत आयोगाकडे दि. २९.६.२००८ रोजी तक्रार केली. त्यानंतर माहिती तयार असल्याचे जन माहिती अधिकारी यानी दि. २.७.२००८ च्या पत्रान्वये (प्राप्त दि. ५.७.२००८) कळविले. दरम्यानच्या काळात प्रथम अपील दाखल केले असल्यामुळे व आयोगाकडे तक्रार केली असल्यामुळे जन माहिती अधिका-यांशी संपर्क साधला नाही. मुख्यालयातील झेरॉक्स मशीन बंद असल्यामुळे सर्व छायाप्रती विहित मुदतीत देता आल्या नसल्याचे प्रथम अपिलाच्या निर्णयात म्हटले आहे. परंतु शुल्क भरल्यापासून ४ दिवसात माहिती देणे असल्यामुळे दि.२५ पर्यंतच माहिती तयार असणे आवश्यक होते. दि. २५.६.२००८ रोजी दुपारी मशिन बिघडल्याचे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती मिळाली नसल्यामुळे माहिती निःशुल्क मिळावी. शुल्काची रक्कम व्याजासह परत मिळावी व जन माहिती अधिकारी याना शास्ती करावी .

**<u>जन माहिती अधिकारी</u> -** तत्कालीन जन माहिती अधिकारी सौ.एस.आर.पाटील यानी विहित मुदतीत शुल्क कळविले होते. व माहितीही तयार ठेवली होती.

तत्कालीन जन माहिती अधिकारी सौ.एस.आर.पाटील यानी सादर केलेल्या निवेदनात तारीखवार तपशील नमूद केला असून श्री. पुंडे यानी दि. २०.६.२००८ रोजी शुल्क भरल्यानंतर दि.२१.६.२००८ पासून छायाप्रती काढण्याचे काम सुरु केले. परंतु मुख्यालयातील मोठया प्रमाणावरील कामातून झेरॉकस मशीन उपलब्धतेनुसार प्रती काढाव्या लागतात. दि. २५.६.२००८ रोजी दुपारपासून दि. ३०.६.२००८ पर्यंत मशीन ना दुरुस्त होते. दि. २५.६.२००८ रोजी सकाळपर्यंत १३१२ पानांच्या छायाप्रती तयार होत्या परंतु त्या घेण्यास वस्तुस्थिती विषद केल्यानंतरही श्री. पुंडे यानी नकार दिला. मशीन दुरुस्त झाल्यावर दि. २.७.२००८ रोजी प्रती तयार असल्याचे श्री. पुंडे याना कळविले. त्यानी त्या न नेल्यामळे दि. २५.७.२००८ रोजी पुन्हा कळविले. माहिती नाकारलेली नाही. केवळ तांत्रिक कारणास्तव वेळेत संपूर्ण माहिती पुरविता आलेली नाही, असे सौ. पाटील यानी निवेदनात नमूद केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी सौ.एस.आर.पाटील यानी विहित मुदतीत शुल्क कळविले आहे. तथापि त्यावेळी कळविलेल्या मुदतीत माहितीची पुर्तता केलेली नाही. झेरॉक्स मशिन मर्यादित वेळ उपलब्ध असणे/ नादुरुस्त असणे हे विलंबाचे समर्थन ठरु शकत नाही. मात्र दि. २.७.२००८ रोजी माहिती तयार असल्याचे कळविले असतांना अपीलकर्ता यानी ती न स्वीकारणे योग्य नाही. शुल्क परताव्यासह अन्य मागण्या अबाधित ठेवून ते माहिती स्वीकारु शकले असते. यास्थितीत तत्कालीन जन माहिती अधिकारी सौ.एस.आर.पाटील याना शास्ती करण्याची त्यांची मागणी मान्य करता येणार नाही. मात्र त्याना माहिती निःशुल्क दिली गेली पाहिजे व त्यानी भरलेल्या शुल्काची रक्कम तत्कालीन जन माहिती अधिकारी सौ.एस.आर.पाटील यानी व्याजासह परत केली पाहिजे. तत्कालीन जन माहिती अधिकारी सौ.एस.आर.पाटील यानी एक आठवडयात शुल्क भरल्यापासून अपिलाच्या आयोगापुढील सुनावणीच्या दिनांकापर्यंतच्या मुदतीचे बँक दराने होणारे व्याज व मूळ शुल्काची रक्कम असा परतावा अपीलकर्त्यास द्यावा. विद्यमान जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाच्या सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, ३ रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे श्री. चिंतामणी जोशी यानी दि. २५.३.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. समीर रमणलाल गांधी
८, फुले कॉर्नर, हॉटेल पंचमवीर, अपीलकर्ता
सातारा रोड, पर्वती, पुणे- ४११ ००९

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग,
पुणे मनपा उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र. ३,
टिळक रोड, पुणे - ४११ ०३०

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग,
पुणे मनपा उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र. ३,
टिळक रोड, पुणे - ४११ ०३०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२६/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. समीर रमणलाल गांधी
८, फुले कॉर्नर, हॉटेल पंचमवीर,
सातारा रोड, पर्वती, पुणे- ४११ ००९

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे मनपा उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र. ३,
टिळक रोड, पुणे श्री. सतीश श्रीपाद भोसरेकर

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,

| | |
|---|---|
| | बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे मनपा उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र. ३,<br>टिळक रोड, पुणे श्री. रमेश रोहिदास वाघमारे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

**अपीलकर्ता -** एप्रिल १९९० मध्ये मंजूर झालेला एका इमारतीचा प्लॅन व अनुषंगिक कागदपत्रे यांच्या प्रती मागितल्या होत्या. संबंधित संचिका कायम स्वरुपी जतनाची असूनही आढळत नसल्याचे उत्तर अभिलेख विभागाने व जन माहिती अधिका-यांनी दिले आहे. संबंधितांना शास्ती व्हावी अशी मागणी नाही, परंतु माहिती मात्र संपूर्ण मिळावी.

**जन माहिती अधिकारी -** सन १९९४ मधील ही संचिका असून तीचा शोध घेण्यात येत असल्याचे विहित मुदतीत कळविले. मात्र संचिका गहाळ झाली आहे. तीची प्रत उपलबध झाल्यास प्रमाणित करुन देता येईल.

**अपिलीय प्राधिकारी -** जतनाच्या वर्गवारीनुसार कायम स्वरुपी जतनाची कागदपत्रे आहेत. माहिती वेळेत न पुरविल्याबद्दल अभिलेख विभागाकडील संबंधित अधिका-यांवर नियमानुसार शास्ती लादण्यासाठी योग्य ती कार्यवाही प्रस्तावित करण्याचे आदेश तत्कालीन अपिलीय प्राधिकारी, उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र. ३, पुणे श्री. सुरेश जगताप यानी दिले होते. त्यानुसार कार्यवाही झाल्याचे दिसत नाही. संचिका गहाळ झ ााल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत कोणतेही आदेश नसल्याचे विधी सल्लागार खात्याने कळविले आहे.

कायम स्वरुपी जतनाचे अभिलेख उपलब्ध न होणे म्हणजे सार्वजनिकरित्या नेहमी उपलब्ध असणे आवश्यक असलेली माहिती नागरिकांना नाकारली जाणे आहे. तसेच माहितीचा मूळ स्त्रोत नष्ट करण्याचा हा प्रकार आहे. त्याबद्दल संबंधितांविरुध्द कारवाई केली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता श्री. समीर रमणलाल गांधी यानी मागणी केलेली बांधकाम प्रकरणातील संचिका कायम स्वरुपी जतनाची असून दि. २५.३.२०११ पर्यंत ती उपलब्ध न झाल्यास सन १९९४ पासून जतनाची जबाबदारी असणा-या संबंधितांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये आयुक्त, महानगरपालिका पुणे यानी फौजदारी गुन्हा नोंदविण्यासह आवश्यक ती कारवाई करावी व दि. २५.४.२०११ पर्यंत अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० मार्च २०११**

प्रत माहितीसाठी व कार्यवाहसाठी - आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नंदकुमार बापू कोळी
ता. आटपाडी, जि. सांगली                    अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र. अधीक्षक,
सार्वजनिक न्यासनोंदणी कार्यालय,
सांगली विभाग, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष,
अहिल्यादेवी एज्युकेशन सोसायटी, निंबवडे
ता. आटपाडी, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५९४/२००९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र. अधीक्षक,
सार्वजनिक न्यासनोंदणी कार्यालय,
सांगली विभाग, सांगली यांचे प्रतिनिधी श्री. नागेश भिमाशंकर बैचबाळ

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष,
अहिल्यादेवी एज्युकेशन सोसायटी, निंबवडे
ता. आटपाडी, जि. सांगली श्री. तातोबा आप्पासाहेब पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. नंदकुमार बापू कोळी यानी अहिल्यादेवी एज्युकेशन सोसायटी, निंबवडे संस्थेकडील कर्मचारी भरती प्रक्रिया व अन्य विषयांबाबतची सन १९९५ ते २००८ या काळातील माहिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे मागितली होती. काही माहिती संस्थेकडील व काही माहिती शाळेकडील असल्यामुळे अर्ज संबंधितांकडे वर्ग केले. त्यानी धर्मादाय आयुक्त कार्यालयाला पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास दिली. दि.२.६.२००९ पर्यंत त्यानी आयोगाकडे अपील करण्याची मुदत असतांना दि. ५.११.२००९ रोजी म्हणजे ६ महिने विलंबाने केलेले अपील मुदतबाहय आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, अहिल्यादेवी एज्युकेशन सोसायटी, निंबवडे, ता. आटपाडी, जि. सांगली श्री. तातोबा आप्पासाहेब पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा प्र. अधीक्षक, सार्वजनिक न्यासनोंदणी कार्यालय, सांगली विभाग, सांगली यांचे प्रतिनिधी श्री. नागेश भिमाशंकर बैचबाळ यांनी केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. श्रीकांत गोपाळ देशपांडे
इंदिरा हौसिंग सोसायटी, कबनूर, अपीलकर्ता
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा सह निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७६८/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. श्रीकांत गोपाळ देशपांडे
इंदिरा हौसिंग सोसायटी, कबनूर,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर सौ. ए. व्ही. पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

**अपीलकर्ता** - अजरा अर्बन बँक शाखा, कबनूर बँकेला मिळकत ताब्यात घेण्यासाठी पोलिस संरक्षण मिळावे म्हणून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर या कार्यालयाने जिल्हा पोलिस प्रमुखांना दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने माहिती मागितली होती. या पत्राची प्रत मिळाली नाही.

**जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी** - अपीलकर्त्यांनी मागितलेली कागदपत्रे जतनाच्या कालावधीनुसार 'ड' वर्गातील एक वर्ष जतनाची असल्याने नष्ट केली असण्याची शक्यता आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एल. टी. भोसले यानी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. अपीलकर्त्यांनी मागणी केलेली कागदपत्रे सन २००८-०९ मधील असून माहिती-मागणीचा अर्ज दि. २३.१२.२००९ चा आहे. म्हणजे मागणी केली तेव्हा ही कागदपत्रे उपलब्ध असणे आवश्यक होते. त्यामुळे अपीलकर्त्यास हव्या असलेल्या पत्राचा शोध घेऊन अथवा जिल्हा पोलिस प्रमुख कार्यालयातून प्राप्त करुन घेऊन त्याची प्रत एक आठवडयात अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. २५.२.२०११ रोजी ही प्रत अपीलकर्त्यास पुरविल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर सौ. ए. व्ही. पाटील यानी दि. २५.२.२०११ च्या पत्राने आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. समीर सीताराम वांद्रे
प्लॉट नं. ३६० आर.के.नगर, सो.नं.सो.नं. २, अपीलकर्ता
पाचगांव, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर, जि. अहमदनगर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर, जि. अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. समीर सीताराम वांद्रे
प्लॉट नं. ३६० आर.के.नगर, सो.नं.सो.नं. २, पाचगांव, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर, जि. अहमदनगर श्री.जे.आर.वळवी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी जि. अहमदनगर येथील कर्मचारी भरतीबाबतच्या तक्रारीवरील कार्यवाहीबाबतची माहिती विहित मुदतीत मिळाली नाही. पुरविलेल्या काही पत्रांना जावक क्रमांक नाही. कृषी विद्यापीठाकडूनच घेऊन माहिती दिली आहे. अपुरी व विलंबाने माहिती दिल्याबद्दल संबंधितांवर कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी - सन २००५ पासून कृषी विद्यापीठात झालेल्या भरतीसंदर्भातील माहिती अपीलकर्त्यांनी मागितली होती.भरतीचा विषय विद्यापीठाच्या कुलगुरुंच्या कक्षेतील आहे. या प्रकरणातील तक्रारी व अर्ज यामागे व्यक्तिगत हेव्यादाव्यांचा भाग आहे. विद्यापीठाने तपासणीसाठी पाठविलेल्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन विद्यापीठाला पाठवून दिले. सर्व विषय विद्यापीठाच्या कक्षेतील असल्यामुळे आमच्या कार्यालयाकडील माहितीसह विद्यापीठाकडून माहिती घेऊन दिली.

जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखाचे अवलोकन करु द्यावे व हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती निःशुल्क द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. पांडुरंग लक्ष्मण आंबले
२२६८/ अ/२ भजनदास चौक, पंढरपूर, अपीलकर्ता
जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६१/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. पांडुरंग लक्ष्मण आंबले
२२६८/ अ/२ भजनदास चौक, पंढरपूर, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, पुणे डॉ. मा.ल.जाधव

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा
जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे सौ. मेघना रामचंद्र सावंत/भोसले

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा
जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे श्रीमती अरुणा व्ही. चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - पुणे विद्यापीठाने डिसेंबर २००८ मध्ये मोडीलेखक पदासाठी घेतलेल्या परीक्षेबाबतची माहिती दोन अर्जांद्वारे मागितली होती. निवड समितीत तज्ञ मोडी होते काय, उमेदवारांकडून कोणत्या निकषांची पूर्तता झाली नाही, अशा काही मुद्दयांची अपुरी माहिती मिळाली.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी अर्जामध्ये ११ प्रश्न विचारले होते. त्याचे मुद्देनिहाय उत्तर दिले. शासन निर्णयाप्रमाणे निवडसमिती सदस्य नेमले जातात. त्याचा तपशील दिला. परंतु विशिष्ट विषयातील पात्रतेबाबतची माहिती त्यात अपेक्षित नसल्यामुळे दिली नाही.

अपिलीय प्राधिकारी - संबंधित परीक्षा मोडी भाषेविषयीची नव्हती. अभिलेखापाल पदाची होती. आता हे पदही रद्द झाले आहे.

अपीकर्त्यांनी दोन अर्जासाठी एकच अपील करणे योग्य नाही. प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्र अपील केले पाहिजे. तसेच कारणे, खुलासा, स्पष्टीकरण अशा स्वरुपाची व अभिलेखात नसलेली माहिती निष्कर्षाच्या रुपात देण्याची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या संज्ञेत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. हनुमंत रामचंद्र सकुंडे
मु. मदनवाडी, ता.इंदापूर, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, वर्ग-१,
पंचायत समिती इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५४२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. हनुमंत रामचंद्र सकुंडे
मु. मदनवाडी, ता.इंदापूर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, वर्ग-१,
पंचायत समिती इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. किरण चं. जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. पोपट श्रीराम काळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मी जून २०१० मध्ये सेवानिवृत्त झालो. वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार लाभ मिळण्यासाठी सेवापुस्तक आवश्यक असून ते गहाळ झाल्याचे उत्तर जन माहिती अधिकारी यानी दिले आहे. लाभ मिळण्यात त्यामुळे अडचण येऊ नये, एवढीच मागणी आहे.

जन माहिती अधिकारी - श्री. सकुंडे यांचे सेवापुस्तक शोधण्याचे काम चालू असून तसे त्याना कळविले आहे.

अपिलीय प्राधिकारी - सेवापुस्तक ज्याच्याकडून गहाळ झाले आहे त्या कर्मचा-याविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेश अपिलाच्या निर्णयात दिले आहेत. तसेच श्री. सकुंडे यांच्या नियमानुसारच्या लाभाबाबत यापुढेही कोणतीही अडचण येणार नाही, याची दक्षता घेतली जाईल.

अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तरीही मूळ कागदपत्रांनुसार अपेक्षित कार्यवाहीबाबत अडचण येणार नसल्याचे अपिलीय प्राधिका-यांचे निवेदन उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ११ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.चितारी रसुल अन्सार
नालंदा कॉलनी, सर्व्हे नं.७३, आदर्शनगर, दिघी, पुणे-१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक, आरोग्य सेवा
(हिपताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), महाराष्ट्र राज्य, मध्यर्ती इमारत, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, सहसंचालक, आरोग्य सेवा यांचे कार्यालय,(हिपताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), महाराष्ट्र राज्य, मध्यर्ती इमारत, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२२१ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.चितारी रसुल अन्सार<br>नालंदा कॉलनी, सर्व्हे नं.७३, आदर्शनगर, दिघी, पुणे-१५ | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नोकरीसाठीच्या अर्जापासून जात वैधता प्रमाणपत्रापर्यंत विविध स्वरूपाची तपशीलवार माहिती मागितली होती. अशाच स्वरूपाची माहिती कोषागार कार्यालयाकडून

मिळाली. परंतु प्रस्तुत अपिलातील जन माहिती अधिकारी यानी मात्र 'त्रयस्थ व्यक्तीची गोपनीय माहिती' असल्याच्या कारणावरून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ११(१) अन्वये नाकारली. ती दिली गेली पाहिजे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.चितारी रसुल अन्सार यानी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नियमानुसार कार्यवाही केली आहे. संबंधित प्रशासकीय अधिकारी श्री.सी.आर.मंजल याना जन माहिती अधिकाऱ्यांनी विचारणा केली व श्री.मंजल यानी माहिती देऊ नये, असे कळविले. त्यानी 'नोकरीला प्रारंभ केल्यापासून आजतागायतची' अशी सरसकट माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी संकलित करून देणे बंधनकारक नाही. तथापि संबंधित अधिकाऱ्यांनी (श्री.मंजल यानी )सार्वजनिक सेवेतील नियुक्तीसाठीचा नियमानुसार आवश्यक असलेला भाग म्हणून सादर केलेले शैक्षणिक प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र याची प्रत ही माहिती वैयक्तिक व गोपनीय मानता येणार नाही. त्यामुळे या दोन कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास दिल्या जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, सहसंचालक, आरोग्य सेवा यांचे कार्यालय,(हिपताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), महाराष्ट्र राज्य, मध्यर्ती इमारत, पुणे श्री.सी.आर. मंजल यांचे शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र याची छायांकित प्रत जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, सहसंचालक, आरोग्य सेवा यांचे कार्यालय,(हिपताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), महाराष्ट्र राज्य, मध्यर्ती इमारत, पुणे यानी निःशुल्क पुरवावी व अनुपालन अहवाल दि.२५.३.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ११ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शिवाजी हंबीरराव एकाड
रा. रसडेवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
बारामती विभाग, ता. बारामती, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग कार्यालय इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२२६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. शिवाजी हंबीरराव एकाड
रा. रसडेवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
बारामती विभाग, ता. बारामती, जि. पुणे श्री. जयसिंग कृष्णाजी पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,

| | |
|---|---|
| | उपविभाग कार्यालय इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. दत्तात्रय रामचंद्र बालगुडे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - रोहित्र व त्यासाठीची उपकरणे बसविण्यासाठी केलेल्या लेआऊटची प्रत व त्या कामाच्या अनुषंगाने काही बाबींचा खुलासा मागितला होता. परंतु माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांच्या अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही करण्यात आली असून त्यानी शुल्क भरले त्याच दिवशी माहिती दिली आहे. अंतर्गत कामासाठी ज्या प्रकारची पध्दती अवलंबिली जात नाही तशीच माहिती मिळण्याचा त्यांचा आग्रह आहे. ती देता येणार नाही. आवश्यक असल्यास ते अभिलेखाचे अवलोकन करु शकतात.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग कार्यालय इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. दत्तात्रय रामचंद्र बालगुडे व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बारामती विभाग, ता. बारामती, जि. पुणे श्री. जयसिंग कृष्णाजी पाटील यांनी माहितीबाबत योग्य कार्यवाही केली असल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- ११ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. निखिल अनिल शहा
६६६, शुक्रवार पेठ, अपीलकर्ता
प्यासा हॉटेल समोर, पुणे ४११ ००२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहा. अन्नधान्य वितरण अधिकारी,
ए बॅरॅक, मध्यवर्ती इमारत, पुणे - १

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडळ अधिकारी,
परिमंडळ अधिकारी 'ग' विभाग, तुळशीबाग, मंडई , पुणे - ४११ ००२

<table>
<tr><td>१</td><td>अपील क्रमांक</td><td>२२६९/२०१०/पुणे</td></tr>
<tr><td>२</td><td>सुनावणीची तारीख</td><td>दि. २४/२/२०११</td></tr>
<tr><td colspan="3">३. उपस्थित<br><br>अपीलकर्ता - श्री. निखिल अनिल शहा<br>६६६, शुक्रवार पेठ, प्यासा हॉटेल समोर, पुणे<br><br>अपिलीय प्राधिकारी तथा सहा. अन्नधान्य वितरण अधिकारी,<br>ए बॅरॅक, मध्यवर्ती इमारत, पुणे श्री. ज्ञानेश्वर जंवजाळ<br><br>जन माहिती अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी,<br>परिमंडळ अधिकारी 'ग' विभाग,तुळशीबाग, मंडई ,<br>पुणे श्रीमती उज्ज्वला शामराव सोरटे</td></tr>
<tr><td>४</td><td colspan="2">माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.</td></tr>
</table>

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - गावाकडील दाखला आणला असूनही चुलत्याच्या शिधापत्रिकेत नाव असल्याचे कारण दाखवून मला त्या पत्त्यावर रहात नसल्यामुळे शिधापत्रिका देण्यात येत नसल्याचे जन माहिती अधिकारी यानी कळविले. त्याबाबतची माहिती व शिधापत्रिका दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांच्या दि. १४.५.२०१० च्या अर्जाला दि. १५.५.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. शिधापत्रिकेबाबत केलेल्या तपासणीत संबंधित व्यक्ती त्या पत्त्यावर रहात नसल्याचे आढळून आल्यामुळे शिधापत्रिका नामंजूर केली.

अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांच्या तक्रारी बाबत पुन्हा शहानिशा केली असता जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे दिसून आले. उपलब्ध माहिती देण्याचे आदेश अपिलाच्या निर्णयात दिले होते.

शिधापत्रिका मिळण्याची अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ११ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. कांता अर्जुन मोरे
यशवंतनगर, कुसगांव बुद्रुक, ता. मावळ, अपीलकर्ता
जि. पुणे - ४१० ४०१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ, लोणावळा नगरपरिषद,
लोणावळा, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून,
शिक्षण मंडळ, लोणावळा नगरपरिषद,
लोणावळा, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३५९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** सौ. कांता अर्जुन मोरे<br>यशवंतनगर, कुसगांव बुद्रुक, ता. मावळ, जि. पुणे - ४१० ४०१ | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्रधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्त्या - लोणावळयातील शाळांमध्ये ‘भारतीय संविधान दिन’ साजरा होण्याच्या संदर्भातील माहिती मागितली होती. कोणतीही माहिती दिली गेली नाही.

जन माहिती अधिकारी - सौ. मोरे यांच्या दि. १.६.२०१० च्या अर्जानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, शिक्षण मंडळ, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, जि. पुणे श्री. श्रीकांत धारके यानी माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिका-यांनी अपिलाचा निर्णय दिलेला नाही. श्री. धारके हे दि. ६.१०.२०१० पासून भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाच्या कारवाईनुसार निलंबित आहेत. त्यांच्या काळातील कागदपत्रांचा ताळमेळ लागत नाही.

अपिलीय प्राधिकारी - शहरातील सर्व शाळांची माहिती संकलित करुन देणे शक्य नाही. त्या त्या शाळेत जन माहिती अधिकारी असतात. त्यांच्याक्डून अपीलकर्त्यांनी माहिती मागणे आवश्यक आहे. तरीही संविधान दिनासारख्या कार्यक्रमांच्या संदर्भात नोंदी ठेवण्याचे सर्व शाळांना पत्राद्वारे कळविले आहे. शिक्षण मंडळाच्या कार्यालयाचे स्थलांतर झाले असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, शिक्षण मंडळ, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, जि. पुणे श्री. श्रीकांत धारके हे निलंबित आहेत. तरीही दि. ५.३.२०११ पर्यंत अपीलकर्त्यांना माहिती देण्यात येईल.

सर्व शाळांकडील माहिती संकलित करुन देणे जन माहिती अधिका-यांवर बंधनकारक नाही. अपीलकर्त्यांनी आवश्यक असल्यास त्या त्या शाळेकडून माहिती मागावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ११ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सतीश शिवाजीराव काकडे
मु. पो. निंबुत, ता. बारामती, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक,
पुणे विभाग, साखर संकुल, पुणे- ५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
सोमेश्वर सहकारी साखर कारखाना मर्यादित,
सोमेश्वर नगर, ता. बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२३७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी -** श्री. ज्योतीराम आप्पासाहेब जाधव

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे विभाग, पुणे- ५
श्री. बी. जे. देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
सोमेश्वर सहकारी साखर कारखाना मर्यादित,
सोमेश्वर नगर, ता. बारामती, जि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. भालचंद्र ग. होळकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचा मी सभासद असून केंद्र व राज्य शासनाकडून कारखान्याला वेळोवेळी निधी मिळाला असतानाही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी यानी अपिलाचा निर्णय दिला नाही.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. काकडे यांचे दोन अर्ज दि. २०.४.२०१० रोजी प्राप्त झाले. दि. १२.५.२०१० च्या दोन पत्रान्वये या दोन अर्जांमधील माहितीसाठीचे शुल्क कळविले. त्यानी शुल्क भरले नाही. अपिलीय प्राधिकारी यानी पाठविलेले अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबतचे पत्र दि. १५.५.२०१० रोजी कारखान्याला प्राप्त झाले. त्यावर दि. २२.५.२०१० रोजीच्या पत्रान्वये पुन्हा शुल्काबाबत अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी यांना कळविले. अपिलीय प्राधिका-यांनीही अपिलकर्त्यास शुल्क भरुन माहिती घेण्याचे आदेश दिले. परंतु त्यानुसार अपीलकर्त्यांनी पूर्तता केलेली नाही. अपीलकर्ता स्वत: शुल्क न भरता तक्रारी व अपिले करीत आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. वस्तुत: अपीलकर्त्यांनी स्वत: शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. परंतु तसे न करता अपील करण्याची अपीलकर्त्यांची कृती योग्य नसून सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम यांचा अपव्यय करणारी आहे. त्याबाबत त्याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १५ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश संभाजी खुडे
७७/१, टाईप २, रेंजहिल्स, पुणे ४११ ०२० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
ऑर्डनन्स फॅक्टरीज एम्प्लॉईज एज्युकेशन सोसायटी,
व्दारा रेंजहिल्स सेकंडरी स्कूल, रेंजहिल्स, पुणे ४११ ०२०

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
ऑर्डनन्स फॅक्टरीज एम्प्लॉईज एज्युकेशन सोसायटी,
व्दारा रेंजहिल्स सेकंडरी स्कूल, रेंजहिल्स, पुणे ४११ ०२०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१५७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सुरेश संभाजी खुडे
७७/१, टाईप २, रेंजहिल्स, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
ऑर्डनन्स फॅक्टरीज एम्प्लॉईज एज्युकेशन सोसायटी,
व्दारा रेंजहिल्स सेकंडरी स्कूल, रेंजहिल्स, पुणे श्री. प्रदिप बापू जगताप

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
ऑर्डनन्स फॅक्टरीज एम्प्लॉईज एज्युकेशन सोसायटी,
व्दारा रेंजहिल्स सेकंडरी स्कूल, रेंजहिल्स, पुणे संजय चंद्रकांत बाराथे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - माहिती मिळाली नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीला बोलाविले होते. परंतु हजर राहू शकलो नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - श्री. खुडे यानी सन २००५ पासूनची विस्तृत माहिती मागितली होती. ती संकलित करुन यु.पी.सी.ने पत्र पाठवून शुल्क कळविले. त्यानी प्रतिसाद दिला नाही. अपिलाच्या सुनावणीला ते उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे त्याना माहिती मिळविण्यात रस नाही, असे समजून अपील निकाली काढले. ऑगस्ट २००६ मध्ये झालेल्या संस्थेच्या निवडणुकीत श्री. खुडे यांचा पराभव झाल्यामुळे संस्थेला त्रास देण्यासाठी विविध ठिकाणी तक्रारी व अशा प्रकारचे अर्ज ते सातत्याने करीत असतात. एकाच पत्त्यावर बनावट नावांनीही ते पत्रव्यवहार करतात. त्यानी नमूद केलेल्या पत्त्यावर ते रहात नसल्याचा पुरावा सादर करीत आहोत.

बनावट नावाने अर्ज व पत्रव्यवहार होत असल्याची जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही. मात्र अपीलकर्त्यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असून ती आवश्यक असल्यास त्यानी जन माहिती अधिकारी यानी कळविल्यानुसार शुल्क भरुन प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १५ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

मेजर जनरल श्री. सुधीर जटार (निवृत्त)
अे १०२, नील सदन, १४२६, सदाशिव पेठ, पुणे - ३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विधी अधिकारी,
पुणे महानगरपालिका परिवहन महामंडळ लि., स्वारगेट, पुणे - ३७
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा असिस्टंट डेपो मॅनेजर,
पुणे महानगरपालिका परिवहन महामंडळ लि., स्वारगेट, पुणे - ३७

| | | |
|---|---|---|
| १ | तक्रार क्रमांक | ४५७/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/९/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विधी अधिकारी,
पुणे महानगरपालिका परिवहन महामंडळ लि. स्वारगेट,
पुणे श्री. त्रिंबक श्रीपाद धारुरकर

**जन माहिती अधिकारी** तथा असिस्टंट डेपो मॅनेजर,
पुणे महानगरपालिका परिवहन महामंडळ लि. स्वारगेट,
पुणे श्री. नितीन रामचंद्र घोगरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

झेड एफ हायड्रॉलिक स्टिअरिंग पाईप खरेदीबाबतची माहिती व दोन पुरवठादारांकडील बिलांच्या प्रती मागितल्या होत्या. परंतु खरेदी केलेली असतांना या पुरवठादारांकडून खरेदी केली नसल्याचे पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या अधिका-यांनी कळविले. म्हणजेच खोटी माहिती दिली आहे, असे तक्रारकर्ता मेजर जनरल श्री. सुधीर जटार (निवृत्त) यानी राज्य माहिती आयोगाकडील तक्रार अर्जात म्हटले आहे.

मेजर जनरल जटार यानी दोन अर्जांद्वारे बिलांच्या प्रतींची मागणी केली होती. ही बिले खरेदीची नसून दुरुस्तीची आहेत, तसे त्याना कागदपत्रांसह स्पष्ट केले आहे. खरेदी केली नसल्यामुळे दिलेली माहिती खोटी नाही, योग्य आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा असिस्टंट डेपो मॅनेजर, पुणे महानगरपालिका परिवहन महामंडळ लि., स्वारगेट, पुणे श्री. नितीन रामचंद्र घोगरे व अपिलीय प्राधिकारी तथा विधी अधिकारी, पुणे महानगरपालिका परिवहन महामंडळ लि., स्वारगेट, पुणे श्री. त्रिंबक श्रीपाद धारुरकर यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता संदर्भित बिले ही दुरुस्तीची असल्याचे संबंधित विभागांनी/अधिका-यांनी लेखी नमूद केले आहे. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे :

## आदेश

तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १५ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. इमतियाज महिबूब बागवान
२६६, गुरुवार पेठ, भाजी मार्केट, कराड, जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह संचालक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक, संचालनालय, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक, संचालनालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५४४/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/२/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,<br>माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक, संचालनालय, पुणे<br>श्रीमती मनिषा विष्णू बिरारीस | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. इमतियाज महिबूब बागवान यानी अल्पसंख्यांकांना दिल्या जाणा-या शिष्यवृत्तीसंबंधीची माहिती विशिष्ट स्वरुपाच्या तक्त्यात संकलित करुन मागितली होती. दि. ९.२.२०१० रोजी प्राप्त झालेल्या त्यांच्या अर्जाला दि. २०.२.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. त्यानी मागितलेल्या

स्वरुपात माहिती आपल्या कार्यालयाच्या अभिलेखात ठेवली जात नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २२ (१) नुसार अशा नमुन्यात माहिती देता येणार नाही. अभिलेख अवलोकन करुन कागदपत्रांच्या प्रती मागितल्यास देता येतील, असे त्याना कळविले. कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध असलेल्या नमुन्यातील माहितीच्या प्रती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक, संचालनालय, पुणे श्री. जी. के. म्हमाणे यानी दिले. त्यानुसार माहिती निःशुल्क दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक, संचालनालय, पुणे श्रीमती मनिषा विष्णू बिरारीस यानी पूरक कागदपत्रांसह लेखी व तोंडी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १५ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अशोक महादेव कांबळे
मु. पेरीड, पो. शिरगांव, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७६०/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/२/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, शाहुवाडी, ता. शाहुवाडी,<br>जि. कोल्हापूर श्री. मनोजकुमार सत्त्याप्पा ऐतवडे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मंजूर भूखंडाची रक्कम जमा करुन घेऊनही भूखंड का दिला नाही, याबाबतची विचारणा अपीलकर्ता श्री. अशोक महादेव कांबळे यानी केली होती. सन १९९१ मधील हा विषय असून माहिती देण्यास अवधी लागेल, असे त्यांच्या दि. ३०.११.२००९ च्या अर्जावर दि. २४.१२.२००९ च्या पत्रान्वये कळविले. संकलन लिपिकाला प्रांत कार्यालयात पाठवून अभिलेखांची तपासणी करुन माहिती शोधून निःशुल्क दिली, असे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. मनोजकुमार सत्त्याप्पा ऐतवडे यानी पूरक कागदपत्रांसह लेखी व तोंडी नमूद केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. तथापि माहिती-मागणीचा अर्ज व प्रथम अपील याबाबत अधिक काटेकोरपणे कार्यवाही करणे आवश्यक असल्याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस.बी.बचाटे (सेवानिवृत्त) व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय शाहुवाडी, जि. कोल्हापूर श्री. डी. एस. कुंभार यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १५ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. माणिक आनंदा चौगुले
मु. पो. जाखले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्या.
ग्रामीण विभाग क्र. १, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्या.
ग्रामीण विभाग क्र. १, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३१/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. माणिक आनंदा चौगुले
मु. पो. जाखले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्या.
ग्रामीण विभाग क्र. १, कोल्हापूर श्री. नरेंद्र कृष्णराव इंदुलकर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्या.
ग्रामीण विभाग क्र. १, कोल्हापूर श्री. अजित बबन नवाळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

<u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - वीज कनेक्शन तोडण्यापूर्वीची नोटिस, न्यायालयाचा आदेश याच्या प्रती व अन्य माहिती दिली नाही. नोटीस दिल्याचे सांगितले असले तरी प्रत्यक्षात नोटीस दिलेली नाही. त्यामुळे दिलेली माहिती खोटी आहे.

<u>जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी</u> - श्री. चौगुले यांच्या दि. १७.८.२००९ च्या अर्जाला दि. ९.९.२००९ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर दिले. तसेच यु.पी.सी.ने माहिती पाठविली. अपीलकर्ता यानी विजेची चोरी केली असून त्यांच्याकडे थकबाकी आहे. अशा बाबतीत वीज कनेक्शन तोडण्याच्या कारवाईसाठी न्यायालयीन आदेशाची गरज नाही. पोलिस संरक्षणात वीज कनेक्शन तोडले आहे. त्यामुळे न्यायालयीन आदेशाची प्रत देण्याचा प्रश्न येत नाही.

वीज कनेक्शन तोडण्यासाठीच्या नोटिसीची प्रत मिळाली नसल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. ती दिली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पत्रव्यवहारावरुन स्पष्ट केले असले तरी अपीलकर्त्यास पुनश्च ही प्रत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.
त्यानुसार पूर्तता केल्याचे जन माहिती अधिकारी यानी दि. २४.२.२०११ च्या पत्रान्वये सर्व माहितीच्या प्रतींसह आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १५ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. विशाल बाबाजी काटे
मु. पो. खामगाव, ता. बार्शी,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा** उप अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग, बार्शी,
जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९९०/२०१०/ सोलापूर |
| २ | सुनावणीची नियोजित तारीख | दि.१८.३.२०११ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** बार्शी येथील जिल्हा परिषद बांधकाम उपविभागाची इमारत पाडून बांधण्याचे प्रमाणपत्र, जुन्या इमारतीचे लाकूड, दगड व कौलार यांचा लिलावाची कागदपत्रे व एम. बी. च्या प्रती. | |

**विवेचन,**

अपीलकर्ता श्री विशाल बाबाजी काटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१८.३.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'माहिती अधिकारान्वये मागितलेली माहिती मला जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग, बार्शी, जि. सोलापूर यांच्याकडून दि. ३.३.२०११ रोजी मिळाली असल्यामुळे माझे समाधान झाले आहे', असे निवेदन अपीलकर्ता श्री. काटे यानी दि. ३.३.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 15 MAR 2011

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. विशाल बाबाजी काटे
मु. पो. खामगाव, ता. बार्शी,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा** उप अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग, बार्शी,
जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११८९/२०१०/ सोलापूर |
| २ | सुनावणीची नियोजित तारीख | दि.१८.३.२०११ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** रस्ता दुरूस्ती योजनेखाली काटेगाव ते बांगरवाडी या रस्त्याचे अंदाजपत्रक, टेंडर, कामाची मोजमापे, देयक नक्कल, हजेरीपत्रक (मस्टर), देयक अदाई झालेले मोजमाप पुस्तक | |

**विवेचन,**

अपीलकर्ता श्री. विशाल बाबाजी काटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१८.३.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'माहिती अधिकारान्वये मागितलेली माहिती मला जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग, बार्शी, जि. सोलापूर

यांच्याकडून दि. ३.३.२०११ रोजी मिळाली असल्यामुळे माझे समाधान झाले आहे', असे निवेदन अपीलकर्ता श्री. काटे यानी दि. ३.३.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 15 MAR 2011

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.किशोर राजेंद्र खोमणे
जेजुरी रेल्वे स्टेशन रोड, **अपीलकर्ता**
खोमणेवस्ती, जेजुरी,
ता.पुरंदर, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
जेजुरी नगरपरिषद, जेजुरी,
ता.पुरंदर, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कर विभाग प्रमुख,**
जेजुरी नगरपरिषद, जेजुरी,
ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५३७/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** जेजुरी शहरातील घर क्र.९६२/१९ वर श्री.शंकर गजाबा खोमणे यांचे नाव ज्या आदेशान्वये लावले याबाबतची माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.किशोर राजेंद्र खोमणे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१६.३.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, जेजुरी नगरपरिषद, ता.पुरंदर, जि.पुणे व माझ्यात चर्चेअंती तडजोड झाली असल्याने मी अपील मागे घेत

आहे', असे अपीलकर्ता श्री.खोमणे यांचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, जेजुरी नगरपरिषद, ता.पुरंदर, जि.पुणे दि.८.३.२०११ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १७ मार्च २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री रामलिंग सिद्राम कवचाळे
मु. पो. बोराळे ता. मंगळवेढा,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी (पं.),
पंचायत समिती मंगळवेढा,
जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत बोराळे,
ता. मंगळवेढा जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१५/२०१०/ सोलापूर |
| २ | सुनावणीची नियोजित तारीख | दि.१८.३.२०११ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** :- ग्रामपंचायत सदस्य श्री त्रिभ्वनाथ बाबुराव पाटील यांचे शेतीस गावच्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरीतुन पाणी दिल्यासंदर्भातील एकूण ५ मुद्यांची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. रामलिंग सिद्राम कवचाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१८.३.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'मी माहिती अधिकारान्वये मागितलेली माहिती मला जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, बोराळे ता. मंगळवेढा, जि. सोलापूर यांच्याकडून दि. २७.९.२०१० रोजी मिळाली आहे', असे निवेदन अपिलकर्ता श्री. कवचाळे यानी दि. १.३.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** 17 MAR 2011

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री रेणुकप्रभु परमेश्वर संस्थानमठ
मु.पो.करजगी, ता. अक्कलकोट,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलिस अधिकारी,
अक्कलकोट, जि. सोलापूर

**उत्तरवादी**

अपिलीय प्राधिकारी तथा
अप्पर पोलिस अधिक्षक, सोलापूर (ग्रामीण),
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४७९/२०१०/ सोलापूर |
| २ | सुनावणीची नियोजित तारीख | दि.१८.३.२०११ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** :- उच्च माध्य, प्रमाणपत्र परीक्षा, फेब्रुवारी २०१० मध्ये करजगी व सोलापूर येथील केंद्रांवरील कॉपीसंदर्भात केलेल्या कारवाईबाबतची माहिती. | |

**विवेचन,**

अपीलकर्ता श्री. रेणुकप्रभु परमेश्वर संस्थानमठ यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१८.३.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'माहिती अधिकारान्वये मागितलेली माहिती मला जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी,अक्कलकोट, जि. सोलापूर यांच्याकडून मिळाली असल्यामुळे माझे समाधान झाले आहे', असे अपीलकर्ता श्री. संस्थानमठ यांचे निवेदन जन माहिती

अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी, अक्कलकोट, जि. सोलापूर यांनी दि. ८.३.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे 17 MAR 2011

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय बळवंत साळुंके
१४२/४३, मंगळवार पेठ, पुणे ४११ ०११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कर आकारणी व कर संकलन प्रमुख क्र. ३
पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहा. कर आकारणी व कर संकलन प्रमुख क्र. ३
पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०६३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. दत्तात्रय बळवंत साळुंके
१४२/४३, मंगळवार पेठ, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कर आकारणी व कर संकलन प्रमुख क्र. ३
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. विलास लक्ष्मण कानडे

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा सहा. कर आकारणी व कर संकलन प्रमुख क्र. ३
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. खेमजी तुकाराम भोईर

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा सहा. कर आकारणी व कर संकलन प्रमुख क्र. ३
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रामदास बापू जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - एका स्त्री कर्मचा-याचा पगार, सेवानिवृत्ती वेतन आदिबाबत विहित मुदतीत माहिती दिली नाही. माहिती मिळाली असून काहीही तक्रार नाही, असे माझ्या स्वाक्षरीचे म्हणून जे पत्र दाखविण्यात येत आहे ते मी लिहिलेले नाही व त्यावरील स्वाक्षरी माझी नाही. अपिलीय प्राधिका-यां समोर ही बाब उपस्थित न झाल्यामुळे हे नमूद केले नाही.

जन माहिती अधिकारी - कामाच्या व्यापामळे माहिती देण्यास विलंब झाला. दि .४.५.२०१० चा अर्ज असून पेन्शन शाखेकडे पत्रव्यवहार करुन दि. ५.७.२०१० रोजी माहिती दिली. प्रथम अपिलाच्या सुनावणीतील आदेशानुसार माहिती दिली. श्री. साळुंखे यानी दि. २७.७.२०१० रोजी पत्र दिले असून आता ते नाही म्हणत आहेत.

अपिलीय प्राधिकारी - श्री. साळुंखे यानी मागितलेली माहिती त्वरित देणे शक्य होते. अन्य विभागांकडील माहिती मागितली असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतदुीनुसार पाच दिवसांत अर्ज त्या विभागाकडे वर्ग करणे आवश्यक होते. तसे जन माहिती अधिकारी यानी केलेले नाही. त्यामुळे ते कारवाईस पात्र असल्याचे प्रथम अपिलाच्या निकालपत्रात स्पष्टपणे म्हटले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता दैनंदिन कामाच्या व्यापामुळे माहिती देण्यास विलंब झाल्याचे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिपादन समर्थनीय नाही. अपीलकर्त्यांनी मगितलेली माहिती देण्यास ३० दिवसांचा कालावधी मुबलक होता. माहिती मिळाली असून तक्रार राहिली नसल्याचे पत्र अपीलकर्त्यांनी दिले की नाही हा प्रश्न वादाचा म्हणून बाजूला ठेवला तरी दि. ४.५.२०१० च्या अर्जानुसार दि. ३०.६.२०१० पर्यंत माहिती देणे आवश्यक असतांना ती दि. ५.७.२०१० रोजी दिली आहे. (माहिती मिळाली असून तक्रार नसल्याचे अपीलकर्त्याचे म्हणून सादर करण्यात आलेले पत्र दि. २७.७.२०१० चे आहे.) म्हणजे माहिती देण्यास ८५ दिवस विलंब झाला आहे. अत्यंत सहजतेने देता येण्यासारखी माहिती विलंबाने देण्यामागे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा. कर आकारणी व कर संकलन प्रमुख क्र. ३ पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रामदास बापू जाधव याची माहिती देण्याबाबतची अनास्थाच असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे विलंबाबद्दल ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. माहिती देण्यास ८५ दिवस विलंब केल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २० मधील तरतुदीनुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा. कर आकारणी व कर संकलन प्रमुख क्र. ३ पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रामदास बापू जाधव याना ८५ दिवसांच्या विलंबाबद्दल (८५ x २५०) अशी एकूण रु. २१,२५०/- शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम श्री. जाधव यांच्या एप्रिल २०११, मे २०११, जून २०११, व जुलै २०११ च्या अनुक्रमे मे २०११, जून २०११, जुलै २०११ व ऑगस्ट २०११ मध्ये देय असलेल्या वेतनातून समान हप्त्यात कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त, अमरावती विभाग यानी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरिंदरलाल सी. सेठी
८८, साहनी सुजन पार्क, पुणे ४११ ०४० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी,
पुणे जिल्हा परिषद, जि. पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
सरदार दस्तुर बॉईज हायस्कूल, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५०६/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सुरिंदरलाल सी. सेठी
८८, साहनी सुजन पार्क, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी,
पुणे जिल्हा परिषद, जि. पुणे श्रीमती विद्या शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
सरदार दस्तुर बॉईज हायस्कूल, पुणे श्रीमती लिली बी. पटेल

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - नववी अ मधील विद्यार्थ्यांच्या सर्व घटक चाचण्यांसह तीन परीक्षांच्या सहा विषयांच्या उत्तरपत्रिका व अन्य माहिती मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ८ (जी) ( माहिती जाहीर केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा विश्वासाश्रित संबंधातून दिलेल्या माहितीचा स्त्रोत उघड होईल) व ८ (एच) (जी माहिती प्रकट केल्याने अपराध्यांवरील तपास, अटक, खटला या कारवाईच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होईल.) या कलमांखाली चुकीच्या पध्दतीने माहिती नाकारली.

जन माहिती अधिकारी - श्री. सेठी यानी विविध स्वरुपाची माहिती मागणारे अनेक अर्ज केले असून देय माहिती त्या त्या वेळी दिली आहे. मात्र विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती देता येणार नाहीत. तसे त्याना विहित मुदतीत कळविले.

अपिलीय प्राधिकारी - प्रथम अपिलाच्या निर्णयात द्यावयास सांगितलेली माहिती जन माहिती अधिकारी यानी दिली आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यांचा विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती नाकारण्याचा निर्णय योग्य आहे. मात्र त्यासाठी नमूद केलेली कलमे पूर्णांशाने लागू होत नाहीत. याबाबत जन माहिती अधिकारी यानी अधिक काटेकोरपणा बाळगणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बाबुराव कोंडीबा तिर्थकर
रा. बाळे, घ.नं. ७७, वॉर्ड नं. २, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (म),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्यलेखापाल,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५१/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. बाबुराव कोंडीबा तिर्थकर
रा. बाळे, घ.नं. ७७, वॉर्ड नं. २, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (म),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. अनिल सदानंद विपत

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्यलेखापाल,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. बाळासाहेब शंकरराव बोले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपण सेवानिवृत्त झाल्याला दोन वर्ष उलटूनही भविष्य निर्वाह निधी व हक्क रजेचा पगार याची रक्कम मिळाली नव्हती. त्याची कारणे व अन्य माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. बाबुराव कोंडीबा तिर्थकर यानी केली.

श्री. तीर्थकर याना भविष्य निर्वाह निधी व हक्क रजेचा पगार अनुक्रमे दि .४.१०.२००७ व दि.६.७.२००७ रोजी अदा करण्यात आला आहे. प्रशासकीय कार्यवाहीची ही बाब असल्याचे त्याना कळविले होते. अन्य कर्मचा-यांबाबतचा त्यानी मागितलेला तपशील संकलित करुन देणे आवश्यक होते.

तत्कालीन लेखापाल श्री. एस. एम. चव्हाण सेवानिवृत्त झाले आहेत. अन्य सेवानिवृत्त कर्मचा-यांबाबतची माहिती श्री. तिर्थकर यांच्या मागणीनुसार विशिष्ट तक्त्यात यानी मागितली असून ती तयार करण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्यलेखापाल, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. बाळासाहेब शंकरराव बोले व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (म), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. अनिल सदानंद विपत यानी केले. आपल्याला रक्कम मिळाल्याचे अपीलकर्त्यांनी मान्य केले.

खुलासा, स्पष्टीकरण या स्वरुपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गजानन सदाशिव कुंभार
मु. पो. समडोळी, ता. मिरज, जि. सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा करनिर्धारक व संकलक,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५०/२००९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली श्री. विजय कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा करनिर्धारक व संकलक,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली यांचे प्रतिनिधी श्री. डी. डी. शिंदे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. गजानन सदाशिव कुंभार यानी एका इमारतीच्या घरपट्टीच्या संदर्भातील माहिती दि. २९.४.२००९ च्या अर्जान्वये मागितली होती. महानगरपालिकेच्या करनिर्धारक व संकलन विभाग व सहा. संचालक नगररचना विभाग या दोन विभागांकडील ही माहिती होती. कर निर्धारक व संकलक विभागाकडील माहिती दि. २२.५.२००९ च्या पत्रान्वये दिली व सहा. संचालक नगररचना विभाग यांच्याकडे अर्ज वर्ग करुन माहिती त्यांच्याकडून घेण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. त्या विभागाचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचनाकार, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. अे. आर. पाटील यानी दि. १८.२.२०११ रोजी माहिती दिली व विलंबाबाबत दिलगीरी व्यक्त केली. विलंबाबद्दल श्री.अे. आर. पाटील याना समज देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा करनिर्धारक व संकलक, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगर-पालिका, सांगली यांचे प्रतिनिधी श्री. डी. डी. शिंदे व अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. विजय कुलकर्णी यानी केले.

'आपले पूर्णपणे समाधान झाले असून कोणतीही तक्रार नाही. संबंधितावर कोणत्याही प्रकारची कारवाई होऊ नये',असे श्री. कुंभार यांचे विनंतीपत्र जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :१७ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. कृष्णा जयरामराव सुर्वे
डि-५-१७०, शांतीरक्षक सोसायटी, अपीलकर्ता
येरवडा, पुणे ४११ ००६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस आयुक्त (प्रशासक),
पोलिस आयुक्त कार्यालय, साधु वासवानी रोड, पुणे ४११ ००१
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त (प्रशासक),
पोलिस आयुक्त कार्यालय, साधु वासवानी रोड, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३३९/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/२/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. कृष्णा जयरामराव सुर्वे<br>डि-५-१७०, शांतीरक्षक सोसायटी,<br>येरवडा, पुणे ४११ ००६ | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पुणे पोलिस आयुक्त कार्यालयातून चुकीचा निर्णय घेऊन विलंबाने पाठविलेल्या प्रकरणी पुनर्सुधारित वेतननिश्चिती व सेवानिवृत्ती वेतन नियमानुसार योग्य प्रकारे केलेले नाही. ती दुरुस्ती होऊन आपल्याला नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. कृष्णा जयरामराव सुर्वे यानी केली.

अपीलकर्ता यांची मागणी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील निर्णयाचा विषय नाही. तसेच याच संदर्भातील त्यांच्या अपील क्र. २५५८/२००८ मध्ये आयोगाने पूर्वी निर्णय दिला असून त्यानुसार माहितीबाबत कार्यवाही झाली आहे, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि : १७ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विश्वास भांबुरकर
बी- ७२, सॅटेलाईट सेंटर, अपीलकर्ता
वस्त्रापूर अहमदाबाद ३८० ०१५

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
मावळ उपविभाग पुणे यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी, मावळ उपविभाग पुणे यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७३०/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
मावळ उपविभाग पुणे यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, पुणे श्री. दिलीप जगदाळे

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी, मावळ उपविभाग पुणे यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, पुणे श्री. सुरेश संभाजी कदम

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

श्री चाणक्य एज्युकेशन सोसायटीच्या 'इंदिरा इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट'च्या इमारतीबाबतची माहिती न दिल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. विश्वास भांबुरकर यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्ता यांचा दि. १९.६.२००९ चा अर्ज दि. २५.६.२००९ रोजी प्राप्त झाला. त्याला दि. १७.७.२००९ च्या पत्रान्वये उत्तर दिले. यापूर्वीही याच संदर्भात दि. ५.६.२००९ रोजी त्यानी केलेल्या अर्जाला दि. २०.६.२००९ च्या पत्रान्वये उत्तर दिले होते. अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवून अकृषिक परवानगी आदेशाच्या प्रती व अन्य माहिती प्राप्त करुन घेऊन दिली. ऊर्वरित कागदपत्रांबाबत पूर्वी कळविले असून त्यानुसार तेच पुन्हा नमूद केले, असे जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी, मावळ उपविभाग पुणे यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, पुणे श्री. सुरेश संभाजी कदम यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. माहितीबाबत त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीची सूचना आपल्याला मुदतीत मिळाली नसल्याची तक्रार श्री. भांबुरकर यानी केली आहे. याबाबत दक्षता घेण्याची समज तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मावळ उपविभाग पुणे यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, पुणे श्री. संजय जगदाळे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अनंत दत्तात्रय कुलकर्णी
३०/१३, डी II ब्लॉक, एम.आय.डी.सी. अपीलकर्ता
चिंचवडगांव, पुणे - १९

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (करसंकलन),
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११ ०१८

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी (कर),
पिंपरी वाघेरे विभागीय कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११ ०१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२४१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. अनंत दत्तात्रय कुलकर्णी
३०/१३, डी II ब्लॉक, एम.आय.डी.सी.
चिंचवडगांव, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी (कर),
पिंपरी वाघेरे विभागीय कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री. दत्तात्रय मारुती फुंदे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापनेच्या आधीपासून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे स्थानिक विकसन प्राधिकरण असून त्यांच्या वसाहतीतील भूखंड धारकांकडून मिळकत कर व अन्य कर वसूल करण्याचा महानगरपालिकेला अधिकार असल्याबाबतचा ठोस कायदेशीर पुरावा दिला जात नाही. असे कर वसूल करणे बेकायदेशीर आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. अनंत दत्तात्रय कुलकर्णी यानी केले.

श्री. कुलकर्णी यानी दि.१.४.२०१० च्या अर्जान्वये मागितलेली मुद्देनिहाय माहिती दि.२०.४.२०१० च्या पत्रान्वये दिली. अपिलीय प्राधिकारी यांनीही ते योग्य ठरवून अपील फेटाळले. संबंधित नियमांची प्रत श्री. कुलकर्णी याना दिली असून कायदाविषयक अभिप्राय माहितीच्या अधिकारात मागता/देता येणार नाही,असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी(कर), पिंपरी वाघेरे विभागीय कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री. दत्तात्रय मारुती फुंदे यानी केले.

जन माहिती अधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. श्री. कुलकर्णी यानी उपस्थित केलेला मुद्दा हा कायदेशीर अन्वयार्थाचा व अनुषंगिक कार्यवाहीची अपेक्षा असणारा असा आहे. तो महत्वाचा असला तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. त्याना आवश्यक असल्यास जन माहिती अधिकारी यानी सर्व संबंधित अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन देणे व अपीलकर्त्यांनी त्यातील आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती घेणे योग्य ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. माणिकचंद किसनलाल वर्मा
माऊली कृपा, विठ्ठलवाडी, आकुर्डी, पुणे - ३५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी,
ए बॅरॅक, मध्यवर्ती इमारत, पुणे - १

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडळ अधिकारी,
'ड' विभाग, शिवाजीनगर धान्य गोदाम, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२३६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. माणिकचंद किसनलाल वर्मा
माऊली कृपा, विठ्ठलवाडी, आकुर्डी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी,
ए बॅरॅक, मध्यवर्ती इमारत, पुणे श्री. ज्ञानेश्वर जवंजाळ

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडळ अधिकारी,
'ड'विभाग, शिवाजीनगर धान्य गोदाम, पुणे श्रीमती आशा होळकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - दोन विभक्त शिधापत्रिकांसाठी अनेक अर्ज देऊन व वारंवार हेलपाटे घालूनही शिधापत्रिका दिली नाही. एजंटामार्फत मागणी केल्यास शिधापत्रिका त्वरित मिळते. परंतु मला मात्र उत्तरही मिळाले नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांच्या अर्जात असलेल्या त्रुटींबाबत कळवूनही आवश्यक कागदपत्रे देण्यास त्यानी नकार दिला. सात दिवसांत शिधापत्रिका देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले. त्यानंतर कागदपत्रांबाबत अपीलकर्त्यास पुन्हा विचारणा केल्यावरही त्यानी पूर्तता केली नाही. ती झाल्या-शिवाय शिधापत्रिका देता येणार नाही, असे या संदर्भातील शासकीय परिपत्रकाच्या प्रतीसह कळविले.

अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तरीही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी प्रशासकीय कार्यवाहीबाबत उत्तर व आदेश दिले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. कुलदीप लक्ष्मण मळेकर
गोपाळ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, अपीलकर्ता
फ्लॅट नं. अे-७, वॉर्ड अे-भांगरवाडी, लोणावळा,
ता. मावळ, जि. पुणे ४१० ४०१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
लोणावळा नगरपरिषद, ता. मावळ, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नगररचनाकार,
लोणावळा नगरपरिषद, ता. मावळ, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२२५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
लोणावळा नगरपरिषद, ता. मावळ, जि. पुणे श्री. योगेश गोडसे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नगररचनाकार,
लोणावळा नगरपरिषद, ता. मावळ, जि. पुणे श्री. शरद भागवत पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. कुलदीप लक्ष्मण मळेकर यानी गोपाळ सहकारी गृहरचना संस्था मर्या. भांगरवाडी लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे या संस्थेच्या संदर्भात दि. २९.६.२०१० च्या अर्जान्वये माहिती मागितली होती. त्याला दि. २२.७.२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर दिले. विकसकाने सादर केलेल्या दोन नकाशांसोबतच्या पत्रांच्या (कव्हरिंग लेटर्स) प्रती त्यानी मागितल्या होत्या. मात्र सुधारित नकाशासोबत असे पत्र नव्हते. सर्व संचिका अपीलकर्त्यांना अवलोकनासाठी उपलब्ध करुन दिल्या. सादर न झालेल्या पत्राची प्रत देता येणार नाही. याच संदर्भात यापूर्वी अपील क्र. ८२/२०१० या प्रकरणी दि. २७/४/२०१० रोजी आयोगाने आदेश दिले आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, लोणावळा नगरपरिषद, ता. मावळ, जि. पुणे श्री. शरद भागवत पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद, ता. मावळ, जि. पुणे श्री. योगेश गोडसे यानी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शाहू तात्याबा वाघमारे
रा. २९७, दत्तवाडी, पुणे - ४११ ०३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस उप आयुक्त (मुख्यालय),
पोलिस आयुक्त कार्यालय, साधु वासवानी रोड,
पुणे - ४११ ००१.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहा. पोलिस आयुक्त (प्रशासन),
पोलिस आयुक्त कार्यालय, साधु वासवानी रोड,
पुणे - ४११ ००१.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७८४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. शाहू तात्याबा वाघमारे<br>रा. २९७, दत्तवाडी, पुणे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पुणे पोलिस दलातून मार्च २००८ मध्ये आपण सेवानिवृत्त झाल्यानंतरही घरभाडे भत्त्याची फरकाची रक्कम मिळाली नाही. शासकीय निवासस्थानही दिले नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. शाहू तात्याबा वाघमारे यानी केली.

अपीलकर्त्यांच्या अर्जानुसार माहिती देण्यात आली असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते. प्रशासकीय कार्यवाहीविषयीच्या त्यांच्या तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.अनिल राजाराम टिंगरे
मु.पो.दिघंची, ता.आटपाडी,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय आटपाडी,
ता.आटपाडी, जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय आटपाडी,
ता.आटपाडी, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५९/२०१०/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे दिघंची येथील सुरेश इण्डेन गॅस वितरण केंद्र, आटपाडी या केंद्रात वाटप होणाऱ्या गॅसबाबतची माहिती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.अनिल राजाराम टिंगरे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१७.३.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'मला माझ्या माहिती-मागणी अर्जानुसार सर्व माहिती मिळाली असून माझी कोणतीही तक्रार नाही, माझे अपील निकाली काढण्यास हरकत नाही', असे अपीलकर्ता श्री.टिंगरे यांचे दि.८.३.२०११ रोजीचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा

तहसीलदार, तहसील कार्यालय आटपाडी, ता.आटपाडी, जि.सांगली यानी दि.१०.३.२०११ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 17 MAR 2011

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुधाकर पांडुरंग बारटक्के
१८८, मंगळवार पेठ, सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
यांत्रिकी मंडळ (उ.स.),
कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक अभियंता,**
यांत्रिकी मंडळ (उ.स.),
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५६/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.सुधाकर पांडुरंग बारटक्के<br>१८८, मंगळवार पेठ, सातारा<br>**जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक अभियंता,**<br>यांत्रिकी मंडळ (उ.स.), कोल्हापूर<br>श्री.प्रकाश बी. भोसले<br>**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**<br>यांत्रिकी मंडळ (उ.स.), कोल्हापूर<br>श्री.ता.रा.नाकलगांवकर | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** विभागीय कार्यालय कृष्णानगर, सातारा या कार्यालयाची | |

| | मंडल कार्यालयाकडून करण्यात आलेल्या वार्षिक तपासणीबाबतची माहिती |
|---|---|

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.सुधाकर पांडुरंग बारटक्के यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१७.३.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी माझे अपील स्वखुशीने मागे घेत आहे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.बारटक्के यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १८ मार्च २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.प्रभाकर रामकृष्ण प्रभावळकर
मु.पो.मलकापूर, ता.शाहुवाडी, **अपीलकर्ता**
जि.कोल्हापूर-४१५ १०१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (नगरपालिका प्रशासन),**
विभागीय आयुक्त पुणे यांचे कार्यालय,
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
मलकापूर नगरपरिषद, ता.शाहुवाडी,
जि.कोल्हापूर-४१५ १०१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१५/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**<br>मलकापूर नगरपरिषद,<br>ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर-४१५ १०१<br>यांचे प्रतिनिधी श्री.एस.डी.गांधी (वरिष्ठ लिपिक)<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (नगरपालिका प्रशासन),**<br>नगरपालिका प्रशासन, विभागीय आयुक्त पुणे यांचे कार्यालय,<br>पुणे श्री.प्रकाश एस.पाटील | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मलकापूर नगरपरिषदेच्या दि.१.१०.२००६ ते ३१.१०.२००७ या कालावधीत पार पाडलेल्या सर्व साधारण सभा, स्थायी समितीच्या सभा, त्यांच्या तारखा, त्यासाठीच्या नोटीसा तदनुषंगिक माहिती. |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.प्रभाकर रामकृष्ण प्रभावळकर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१७.३.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता श्री.प्रभावळकर यांचे दि.१.११.२०१० रोजी निधन झाले असल्याबाबतचे त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, मलकापूर नगरपरिषद, ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.एस.डी.गांधी, वरिष्ठ लिपिक, यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १८ मार्च २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.गोविंदराव जगन्नाथ खटावकर
डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, **अपीलकर्ता**
सुभाषनगर, मिरज, जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी,**
राजवाडा कंपौंड, सांगली-४१६ ४१६

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२,**
वाळवा इस्लामपूर, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६२/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२,**<br>वाहवा इस्लामपूर, जि.सांगली<br>यांचे प्रतिनिधी सौ.स्नेहल सतिश तेरगांवकर (वरिष्ठ लिपिक) | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.दिलीप राघोजी पाटील हे सह दुय्यम निबंधक व विवाह निबंधक, इस्लामपूर या पदावर रुजू झाल्यापासून त्यानी नोंद केलेले दस्त, खरेदीपत्रक, वाटणीपत्रक, गहाणखत तदनुषंगिक एकूण १८ मुद्दयांची विस्तृत माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.गोविंदराव जगन्नाथ खटावकर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१७.३.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. ‘मी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केल्यानंतर

मला आवश्यक असणारी माहिती समक्ष अवलोकनास देण्यात आली. सदर माहिती पाहिल्यानुसार मी समाधानी आहे', असे अपीलकर्ता श्री.खटावकर यांचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सांगली यानी दि.१६.३.२०११ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १८ मार्च २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

ॲड.व्ही.डी.घाटगे
द्वारा श्री.आर.के.पाटील **अपीलकर्ता**
घर नं.८९१, भांडवले गल्ली,
खणभाग, सांगली-४१६ ४१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त,**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगररचना,**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५२/२००९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.२.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगररचना,**<br>सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,<br>सांगली श्री.बी.एन.बनकर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त,**<br>सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,<br>सांगली श्री.विजय कुलकर्णी | |
| ४ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.प्रकाश किसन काळोखे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२२.२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केलेली माहिती प्रथम प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार दरम्यानच्या कालावधीमध्ये मला मिळालेली आहे. त्यामुळे आयोगाकडील द्वितीय अपील क्र.१०५२/२००९/संगली निकाली काढावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.घाटगे यानी दि.१०.३.२०११ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १८ मार्च २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.राधेय विनोद शहा
गांधी चौक, जैन मंदिरा शेजारी, **अपीलकर्ता**
इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
वाळवा विभाग, ता.वाळवा,
जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७०६/२०१०/सांगली<br>१७०७/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**<br>तहसील कार्यालय माढा, ता.माढा, जि.सोलापूर<br>श्रीमती स्नहेल रविंद्र बरगे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**<br>जिल्हाधिकारी कार्यालय आवार,<br>सांगली श्री.डी.एस.पाटील | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** अनधिकृतपणे गौण खनिज उत्खनन केल्याबाबत करण्यात आलेल्या दंडासंदर्भातील माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.राधेय विनोद शहा यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील क्र.१७०६/२०१०/सांगली प्रकरणी दि.१७.३.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली यानी प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वाळवा विभाग, जि.सांगली यानी माझे माहितीबाबत निरसन केले आहे. त्यामुळे माहिती अधिकारातील अपील क्र.१७०६/२०१०/सांगली व अपील क्र.१७०७/२०१०/सांगली ही दोन्ही अपिले निकाली काढावी', असे निवेदन अपीलकर्ता श्री.शहा यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे.**
**दि :- १८ मार्च २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.प्रकाश किसन काळोखे
मु.पो.देहुगांव, विठ्ठलवाडी, **अपीलकर्ता**
ता.हवेली, जि.पुणे-४१२ १०९

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),**
पंचायत समिती हवेली,
ता.हवेली, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,**
ग्रामपंचायत देहुगांव,
ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३८७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची नियोजित तारीख | दि.६.४.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** देहुगांव ग्रामपंचायतीच्या मागील पाच वर्षातील मासिक सभा, केलेल्या कामांच्या निविदा, थकबाकीदारांवरील कारवाई तदनुषंगिक एकूण ७ मुद्दे | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री.प्रकाश किसन काळोखे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१६.३.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. (पुढे ढकलल्याची तारीख ६.४.२०११) दरम्यान, 'जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत देहुगांव, ता.हवेली, जि.पुणे यानी

मला उपयुक्त व अभिप्रेत असलेली माहिती दोन दिवसात देण्याचे कबूल केले असल्याने नियोजित करण्यात आलेली सुनावणी रद्द करण्यात यावी. माझी काहीही तक्रार नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.काळोखे दि.१५.३.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १८ मार्च २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.बंडू भगवान झगडे
दूध डेअरीजवळ, मु.पो. व ता.इंदापूर, **अपीलकर्ता**
जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगरपरिषद इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपमुख्याधिकारी,**
नगरपरिषद इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०९/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**<br>नगरपरिषद इंदापूर,<br>ता.इंदापूर, जि.पुणे<br>श्री.महेश साहेबराव रोकडे | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** इंदापूर नगरपरिषदेने सर्व्हे नं.११९(३४९) मधून काढलेल्या रस्त्यासंदर्भातील ठराव, रस्त्याचा नकाशा व रस्त्यासाठी झालेला खर्च इ. माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.बंडू भगवान झगडे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.९.२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी जन माहिती अधिकारी तथा नगरपरिषद इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे यांच्याकडे मागणी केलेली माहिती मला प्राप्त झाली असून त्याबाबत माझी काहीही तक्रार नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.झगडे यानी दि.९.२.२०११ रोजी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १८ मार्च २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रकाश लक्ष्मण खाडे
'समर्थकृपा',अत्रे पुल, मु.पो.जेजुरी, अपीलकर्ता
ता. पुरंदर, जि. पुणे .

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ५
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, पुरंदर , जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५८६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. प्रकाश लक्ष्मण खाडे
'समर्थकृपा',अत्रे पुल, मु.पो.जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे .

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर,

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, पुरंदर , जि. पुणे श्री. अरुण तुकाराम साकोरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

आपल्या ताब्यातील १० एकर जमीन अत्यंत अल्प किंमतीला शिवरी को-ऑप. क्रेडीट सोसायटी शिवरी, (ता.पुरंदर) या सोसायटीने विकली असून अशा विक्रीला सहकार खात्याने दिलेल्या परवानगीबाबतची माहिती सातत्याने प्रयत्न करुनही दिली जात नाही. सन १९९४ व १९९६ मध्ये जमीन विक्रीचा व्यवहार झाला असून त्याबाबतच्या आदेशाची माहिती आपल्याला हवी आहे. सोसायटीने काही कागदपत्रे दिली. परंतु त्यावर सहीशिक्के नसल्यामुळे ते अधिकृत मानता येत नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. प्रकाश लक्ष्मण खाडे यानी केले.

श्री. खाडे यानी यापूर्वीही ३-४ वेळा याच स्वरुपाची माहिती मागितली होती. परंतु अशा प्रकारच्या परवानगीचे आदेश वा त्यासंबंधातील मूळ कागदपत्रे आढळत नाहीत. दि.२.११.१९९२ व दि. ३.१०.१९९४ रोजीच्या काही छायांकित प्रती आहेत. पंरतु त्या अस्पष्ट आहेत. त्यावरुन सत्यप्रत देता येत नाही. सोसायटीच्या पूर्वीच्या सचिवांकडून पदभार मिळाला नव्हता. परंतु तत्कालीन सचिवांचे निधन झाले असून कारवाईची जाणीव देऊन तत्कालीन सचिवांच्या चिरंजीवाकडून प्राप्त करुन घेतलेल्या दप्तरामध्ये श्री. खाडे यांना हवी असलेली कागदपत्रे समाविष्ट नाहीत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पुरंदर , जि. पुणे श्री. अरुण तुकाराम साकोरे यानी केले.

सोसायटीच्या दप्तरात विशिष्ट कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत. तसेच सहकार खात्याकडील परवानगीबाबतची कागदपत्रे खात्याच्या दप्तरी नाहीत, ही बाब गंभीर आहे. या स्थितीत, जतनाच्या कालावधीनुसार मूळ कागदपत्रे उपलब्ध करुन देणे किंवा संबंधित प्रकरणी दप्तरी उपलब्ध असलेल्या छायांकित प्रतीवरुन सत्यप्रती करुन देणे आवश्यक आहे. यानुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पुरंदर, जि. पुणे श्री. अरुण तुकाराम साकोरे यानी एक आठवडयात कार्यवाही करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्याबाबतचा अहवाल आयोगास अद्याप अप्राप्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यानी दि. ३०.३.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुनिल बाळासाहेब भांडवलकर
मु. पो. कोरेगाव भिमा, ता. शिरुर, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती शिरुर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कोरेगाव भिमा, ता. शिरुर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६००/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सुनिल बाळासाहेब भांडवलकर
मु. पो. कोरेगाव भिमा, ता. शिरुर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती शिरुर, जि. पुणे श्री. सुखदेव नामदेव खैरे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कोरेगाव भिमा, ता. शिरुर, जि. पुणे श्री. एस.एच.खेडकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

आपल्या मागणीनुसार कोणतीही माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. सुनिल बाळासाहेब भांडवलकर यानी केली. मात्र माहितीची पोहच देणारी अपीलकर्त्याची स्वाक्षरी असल्याची प्रत जन माहिती अधिकारी यानी सादर केली. परंतु ती आपली स्वाक्षरी नसल्याची व बनावट स्वाक्षरी असल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. सुनिल बाळासाहेब भांडवलकर यानी केली. तत्कालीन ग्रामसेवक श्री. किसन बबन बिबे हे नियुक्तीच्या ठिकाणी रहात नसल्याची अपीलकर्त्यांची तक्रार होती व त्या अनुषंगाने त्यानी हालचाल रजिस्टरची प्रत मागितली होती. परंतु असे हालचाल रजिस्टर उपलब्ध नसल्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोरेगाव भिमा, ता. शिरुर, जि. पुणे श्री. एस.एच. खेडकर यानी नमूद केले.

खोटया स्वाक्षरीबाबतची अपीलकर्त्यांची तक्रार असल्यास दोन दिवसांत पोलिसांकडे तक्रार करावी, व त्याबाबत पोलिसांनी तातडीने चौकशी करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यानी अशा प्रकारची तक्रार दाखल केल्याचा अहवाल आयोगाला अद्याप सादर केलेला नाही. हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. मनिषा रविंद्र गिरी
थोरात साईसमर्थ हॉस्पिटल, अपीलकर्ता
नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर पोलिस अधीक्षक,
पुणे ग्रामीण पोलिस यांचे कार्यालय, पाषाण,
पुणे ४११ ००८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलिस अधिकारी,
जुन्नर विभाग, ता. जुन्नर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३६/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** सौ. मनिषा रविंद्र गिरी
थोरात साईसमर्थ हॉस्पिटल, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे

**विद्यमान अपिलीय प्राधिकारी** तथा अपर पोलिस अधीक्षक,
पुणे ग्रामीण पोलिस यांचे कार्यालय, पाषाण, पुणे श्री. रामनाथ पोकळे

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** श्री. अशोक मोराळे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलिस अधिकारी,
जुन्नर विभाग, ता. जुन्नर, जि. पुणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्त्या - ॲट्रॉसिटीबाबत केलेल्या अर्जावरील माहिती विलंबाने व असमाधानकारक दिली.

जन माहिती अधिकारी - श्रीमती गिरी याना वेळोवेळी विहित मुदतीत उत्तरे देण्यात आली आहेत. दि. २४.३.२००९ चा त्यांचा अर्ज दि. १.४.२००९ रोजी उपविभागीय पोलिस अधिकारी, जुन्नर विभाग, जुन्नर या कार्यालयाकडे वर्ग केला. सहाय्यक जन माहिती अधिकारी यानी दि. १९.४.२००९ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली. एफ आय आर, जबाब यांच्या प्रती दिल्या. खुलाशाची मागणी असणारा प्रश्न, तसेच संभाव्य कार्यवाहीबाबतची विचारणा असलेल्या मुद्दयांबाबत अशी मागणी देता येत नसल्याचे कळविले.

अपिलीय प्राधिकारी - विहित मुदतीत अर्ज वर्ग करुन उत्तर दिले आहे.

जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.दिलीप माधवदास शहा
डॉ.हेडगेवार शॉपिंग सेंटर, **अपीलकर्ता**
गाळा नं.१, बारामती सहकारी बँकेशेजारी,
इंदापूर, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
इंदापूर नगरपालिका,
ता.इंदापूर, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा बांधकाम पर्यवेक्षक,**
इंदापूर नगरपालिका,
ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३७६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची नियोजित तारीख | दि.६.४.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** इंदापूर नगरपरिषदेला सन २००७-२०१० या आर्थिक वर्षात प्राप्त झालेले अनुदान, वसुली व खर्च इ. तपशील | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.दिलीप माधवदास शहा यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.६.४.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'मला लेखाविभागाकडील सर्व माहिती मिळाली असल्याने माझे अपील क्र.२६७६/२०१०/पुणे निकाली काढावे', असे अपीलकर्ता श्री.शहा यांचे निवेदन

अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, इंदापूर नगरपालिका, ता.इंदापूर, जि.पुणे यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १८ मार्च २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.दत्तात्रय पांडुरंग दुसे
रेणुका श्रीराम हौसिंग सोसायटी,
उजनीनगर, जनता बँकेजवळ,
सोलापूर-४१३ ००३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
भीमा कालवा मंडळ, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
उजनी कालवा विभाग क्र.८,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४६२/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.दत्तात्रय पांडुरंग दुसे<br>रेणुका श्रीराम हौसिंग सोसायटी,<br>उजनीनगर, जनता बँके जवळ,<br>सोलापूर-४१३ ००३<br>**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**<br>उजनी कालवा विभाग क्र.८,<br>सोलापूर श्री.धनंजय गोडसे<br>**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**<br>भीमा कालवा मंडळ, सोलापूर<br>श्री.र.प्र.लांडेकर | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** उजनी कालवा विभाग क्र.१६ यांच्या दि.३०.११.२००९ च्या पत्राच्या संदर्भातील माहिती अवलोकनास मिळावी |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.दत्तात्रय पांडुरंग दुसे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१८.३.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केल्यानुसार कागदपत्रे पाहून माझे समाधान झाले आहे. याबाबत माझी कोणतीही तक्रार नाही', असे अपीलकर्ता श्री.दुसे यांचे निवदेन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.८, सोलापूर श्री.धनंजय गोडसे यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 18 MAR 2011

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.धन्यकुमार रामदास कोल्हापुरे
मंगळवार पेठ, मु.पो.माढा, **अपीलकर्ता**
ता.माढा, जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय माढा,
ता.माढा, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय माढा,
ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५६८/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**<br>तहसील कार्यालय माढा,<br>ता.माढा, जि.सोलापूर श्री.एस.एस.भालके | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या धान्य वाटपासंदर्भातील माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.धन्यकुमार रामदास कोल्हापुरे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१८.३.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केलेली रास्तभाव दुकानांबाबतची माहिती मला प्राप्त झालेली आहे. त्यामुळे आपल्याकडे दाखल केलेले अपील निकाली काढण्यास माझी काही हरकत नाही', असे अपीलकर्ता श्री.कोल्हापुरे यांचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय माढा, ता.माढा, जि.सोलापूर दि.१७.३.२०११ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय माढा, ता.माढा, जि.सोलापूर श्री.एस.एस.भालके यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १८ मार्च २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

१२+१३ =१०५

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.उल्हासराव यशवंतराव शिर्के
मु.पो.नीरा, ता.पुरंदर, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अपर निबंधक,
सहकारी संस्था (पतसंस्था) सहकार आयुक्त यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उपनिबंधक,
सहकारी संस्था (पतसंस्था) सहकार आयुक्त यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८८६/पुणे (याच विषयासंदर्भातील अपिले क्र. २८८७+२८८८+२८८९+२८९०+२८९१+२९६१+२९६२+२९६३+२९६४+३०४१+३०४२+३०४३/पुणे) |
| २ | सुनावणीची तारीख | ०९.०२.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**अपीलकर्ता**-श्री.उल्हासराव यशवंतराव शिर्के<br>मु.पो.नीरा, ता.पुरंदर, जि.पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** उपनिबंधक,<br>सहकारी संस्था (पतसंस्था) सहकार आयुक्त यांचे कार्यालय,<br>महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१ श्री.संजयकुमार श्रीमंतराव भोसले | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.उल्हासराव यशवंतराव शिर्के यानी माहिती-मागणी अर्जानुसार कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे प्रतिपादन केले.

'श्री.शिर्के यानी त्यांच्या मुलाच्या कर्जाबाबतच्या वादाच्या अनुषंगाने समता ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, निरा, ता.पुरंदर,जि.पुणे या एकाच पतसंस्थेच्या संदर्भात व त्याअनुषंगाने पतसंस्थांच्या दैनंदिन प्रशासकीय कार्यपध्दतीबाबत सन २००८ पासून वेळोवेळी तक्रार अर्ज दाखल केले आहेत. त्या तक्रार अर्जांवर केलेली कार्यवाही व त्या अनुषंगाने नियमावली आदि माहितीबाबत श्री.शिर्के यानी १३ माहिती-मागणी अर्ज उपनिबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था), पुणे यांच्याकडे दाखल केले होते. सदर अर्जांमध्ये कागदपत्रे मागितलेली नव्हती. इतर कर्जदारांची माहिती देता येणार नाही, असे नमूद करुन श्री.शिर्के यांच्या सर्व अर्जांना एकच उत्तर दिले', असे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,सहकारी संस्था (पतसंस्था) सहकार आयुक्त यांचे कार्यालय,महाराष्ट्र राज्य,पुणे श्री.संजयकुमार श्रीमंतराव भोसले यानी सांगितले.

अपील क्र.२८८६ प्रमाणेच याच विषयाशी निगडीत अशा अन्य अपिलांबाबतही (२८८७+२८८८+२८८९+२८९०+२८९१+२९६१+२९६२+२९६३+२९६४+३०४१+३०४२ + ३०४३/पुणे) माहिती मिळाली नसल्याची तक्रार श्री.शिर्के यानी केली.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता कोणत्याही कागदपत्रांची मागणी श्री.शिर्के यानी केलेली नाही. नियमावली आदींच्या प्रती ही सार्वजनिक स्वरुपात उपलब्ध असणारी माहिती जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,सहकारी संस्था (पतसंस्था) सहकार आयुक्त यांचे कार्यालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या कक्षेत असल्याचे मानता येणार नाही. तसेच त्याबाबतचा खुलासा, स्पष्टीकरण आदी बाबी व पतसंस्थेच्या प्रशासकीय कामकाजाबाबत केलेल्या तक्रारींवरील कारवाईची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाही. तसेच नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने

रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेला आहे. तरीही माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,सहकारी संस्था (पतसंस्था) सहकार आयुक्त यांचे कार्यालय,महाराष्ट्र राज्य,पुणे श्री.संजयकुमार श्रीमंतराव भोसले व अपिलीय प्राधिकारी तथा अपर निबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था) सहकार आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे डॉ.भानुदास टी.बधान यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. श्री.शिर्के यानी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कक्षेबाहेरील व एकाच विषयाबाबत वारंवार अर्ज व अपिले करुन सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम यांचा अपव्याय न करता आवश्यक असल्यास उपलब्ध अभिलेखांची पाहणी करावी व हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी करावी. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,सहकारी संस्था (पतसंस्था) सहकार आयुक्त यांचे कार्यालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यानी त्याना अशी पाहणी करु द्यावी. त्यांनी लेखी मागणी केल्यास त्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारुन पुरवाव्या, हे अधिक उचित ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील क्र.२८८६/पुणे निकाली काढण्यात येत आहे.

२. याच विषयासंदर्भात श्री.उल्हासराव यशवंतराव शिर्के यांनी आयोगाकडे दाखल केलेली अपील क्र.२८८७+२८८८+२८८९+२८९०+२८९१+२९६१+२९६२+२९६३ + २९६४+३०४१+३०४२+३०४३/पुणे) निकाली काढण्यात येत आहेत.

३. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,सहकारी संस्था (पतसंस्था) सहकार आयुक्त यांचे कार्यालय,महाराष्ट्र राज्य, पुणे यानी वरील सर्व अपिलांमध्ये श्री.उल्हासराव यशवंतराव शिर्के याना आवश्यक असल्यास अभिलेखांचे निःशुल्क अवलोकन करू द्यावे व त्यानी लेखी मागणी केल्यास त्या कागदपत्रांच्या प्रती सशुल्क पुरवाव्यात.

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ : पुणे**
**दि.** 19 MAR 2011

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रविण निवृत्ती सावंत
१२/७१८, हत्ती चौक परिसर, आर.पी.रोड,
इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, २९३५, सी वॉर्ड,
जुना बुधवार पेठ, सोन्या मारूती चौक, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, इचलकरंजी,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८३ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रविण निवृत्ती सावंत
१२/७१८, हत्ती चौक परिसर, आर.पी.रोड, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, २९३५, सी वॉर्ड, जुना बुधवार पेठ,
सोन्या मारूती चौक, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.एस.डी.अलगोंडर

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, इचलकरंजी,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.मोहन सदाशिव काळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मिळकतपत्रिकेवरील नावनोंदणीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.प्रविण निवृत्ती सावंत यानी दि.२७.१.२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. दि.२३.२.२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली. नाव नोंदणीचे अर्ज सबळ कारणाशिवाय निकाली काढले जातात, अशी तक्रार अपीलकर्त्यांनी प्रथम अपिलात केली होती. संबंधित नियमांच्या व शासकीय परिपत्रकांच्या प्रती त्याना दिल्या. कागदपत्रांची छाननी न करता स्वत:ची नाव नोंद व्हावी असा त्यांचा आग्रह आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.मोहन सदाशिव काळे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, २९३५, सी वॉर्ड, जुना बुधवार पेठ, सोन्या मारूती चौक, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.एस.डी.अलगोंडर यानी केले. माहितीबाबत त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. जितेंद्र कृष्णराव नाईक-निंबाळकर
मु. पो. वाठार निंबाळकर, ता. फलटण, जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती फलटण, ता. फलटण, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
तावडी ग्रामपंचायत, ता. फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८२८/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती फलटण, ता. फलटण,
जि. सातारा श्री. सुधाकर कुंडलीक जमदाडे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
तावडी ग्रामपंचायत, ता. फलटण, जि. सातारा श्री. सुशिलकुमार वामनराव सकटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अन्य व्यक्तीच्या घराच्या व जागेच्या संदर्भात अपीलकर्ता श्री. जितेंद्र कृष्णराव नाईक-निंबाळकर यानी केलेल्या माहिती-मागणी अर्जाला विहित मुदतीत मुद्देनिहाय उत्तर दिले. संबंधित घर व ते ज्या जागेवर बांधले आहे ती जमीन वेगवेगळया नावावर असून १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर केलेले करारपत्र हे खरेदीखत होत नाही. म्हणून माहिती खोटी आहे, असे अपीलकर्त्याचे म्हणणे होते. परंतु संबंधित व्यक्तीने नंतर रीतसर दस्त करुन घेतला असून त्या खरेदीखताची छायांकित प्रत अपीलकर्त्यास देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, तावडी ग्रामपंचायत, ता. फलटण, जि. सातारा श्री. सुशिलकुमार वामनराव सकटे व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती फलटण, ता. फलटण, जि. सातारा श्री. सुधाकर कुंडलीक जमदाडे यांनी नमूद केले. अपीलकर्त्यांची माहितीची पोहोच त्यानी सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश मधुकर क्षिरसागर
मु.पो.टेंभुर्णी, महादेव गल्ली, ता.माढा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, भिमा कालवा मंडळ, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,
भिमा कालवा मंडळ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६२० / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश मधुकर क्षिरसागर
मु.पो.टेंभुर्णी, महादेव गल्ली, ता.माढा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, भिमा कालवा मंडळ, सोलापूर श्री.र.प्र.लांडेकर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,
भिमा कालवा मंडळ, सोलापूर श्री.उदयकुमार दिगंबर पतकी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

<u>अपीलकर्ता</u> : सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या पाल्यांच्या/वारसदारांची यादीची व अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीबाबतच्या प्रतीक्षा यादीची प्रत मागितली असता फक्त अनुकंपा नियुक्तीची यादी दिली. सेवानिवृत्तांच्या पाल्यांची प्रतीक्षा यादी नसल्याचे कळविले. परंतु तशा यादीची प्रत माझ्याकडे आहे.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्याच्या दि.१४.६.२०१० च्या अर्जानुसार अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीची १३ पानांची यादी दि.८.७.२०१० रोजी दिली. अपीलकर्ता म्हणतात त्याप्रमाणे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची / वारसांची यादी ठेवली जात नाही. त्याबाबतच्या शासनाच्या आदेशाची माहितीही अपीलकर्त्यास दिली.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरून प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिल सिद्रामप्पा अळकोळी
समाधी मठ, बुधवार पेठ, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद अक्कलकोट,
ता.अक्कलकोट, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ओव्हरसियर, मुख्याधिकारी, नगरपरिषद
अक्कलकोट कार्यालय, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३५८/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुनिल सिद्रामप्पा अळकोळी
समाधी मठ, बुधवार पेठ, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद अक्कलकोट,
ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.विनायक विजय औंधकर

**जन माहिती अधिकारी** तथा ओव्हरसियर, मुख्याधिकारी, नगरपरिषद
अक्कलकोट कार्यालय, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.मल्लय्या गुरलिंगय्या स्वामी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता : शेजा-याने विनापरवाना शेड बांधून आमची खिडकी बंद केली आहे. त्याच्या अतिक्रमणाविरुध्द दोन तक्रार अर्ज करुनही नगरपरिषदेने कारवाई केली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यांची तक्रार ज्यांच्या विरुध्द होती त्याना नोटीस दिली. त्याबाबतची माहिती अपीलकर्त्यास दिली. मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असल्यामुळे उभय बाजूंकडे जागेच्या मालकी हक्काचा पुरावा मागितला. अपीलकर्त्यांनी दि.२४.२.२०११ रोजी पुरावा सादर केला असून येत्या ७ दिवसांत योग्य कार्यवाही करण्यात येईल.

अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि : १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. दिपक अंबादास साळुंखे
रा.१४, रेल्वे लाईन, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
सहाय्यक कामगार आयुक्त,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
सरकारी कामगार अधिकारी,
सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७१/२०१०/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१०.२०१० |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** :- बत्तीन बिडी वर्क्स, गणेश पेठ, सोलापूर येथील कामगार संख्या, त्यांचे वेतन, शॉप्स ॲक्ट नोंदणी व श्री निवास चित्रमंदिर (सिनेमागृह) यांच्या संदर्भात एकूण आठ मुद्द्यांची माहिती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. दिपक अंबादास साळुंखे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२८.१०.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'माहिती अधिकारान्वये मागितलेली माहिती मला जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, सोलापूर यांच्याकडून मिळाली असल्यामुळे माझे समाधान झाले आहे', असे निवेदन अपीलकर्ता श्री साळुंखे यानी दि. ८.३.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि. 19 MAR 2011

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अजित गणपतराव पवार
रा. पिरवाडी, पो. कृष्णानगर,
ता. जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती ता. जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
खेड, ता. जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१२७/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/३/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अजित गणपतराव पवार
रा. पिरवाडी, पो. कृष्णानगर, ता. जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती ता. जि. सातारा श्री. सी. एन. गार्डे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
खेड, ता. जि. सातारा श्री. जी. बी. माने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जन माहिती अधिकारी यानी मूळ अर्जानुसार विहित मुदतीत माहिती दिली नव्हती. परंतु त्यानी दि. २५.२.२०११ रोजी माहिती दिली असल्याने त्याना दंड अथवा शास्ती होऊ नये, ही विनंती, असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री. अजित गणपतराव पवार यानी सादर केले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये विहित मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक असल्याची समज जन माहिती अधिकारी तथा तथा ग्रामविकास अधिकारी, खेड, ता. जि. सातारा श्री. जी. बी. माने याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संभाजी निवृत्ती काळे
माढा रोड, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक, सोलापूर ग्रामीण,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०८२ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संभाजी निवृत्ती काळे
माढा रोड, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक, सोलापूर ग्रामीण,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर प्रतिनिधी श्री.धनंजय अनंतराव जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपण व आपला पुतण्या यांच्यात वाद असल्याचा शोध पोलिसांनी कशावरून लावला याची माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.संभाजी निवृत्ती काळे (वय ९१ वर्षे) यानी केली.

श्री.काळे यांची मागणी चुलता-पुतण्याच्या संबंधाचा शोध घेऊन माहिती देण्याची आहे. तसे करणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, सोलापूर ग्रामीण, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर प्रतिनिधी श्री.धनंजय अनंतराव जाधव यानी केले.

लोकशाही दिनातील अर्जावर अप्पर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यानी अपीलकर्त्यांना दिलेल्या उत्तरात पुतण्याविरूध्द जागेबाबतची तक्रार असल्याचे व ती दिवाणी स्वरूपाची असल्याचे नमूद केले आहे. त्या अनुषंगाने अपीलकर्त्यांनी विचारणा केली आहे. त्यांचे वय लक्षात घेता त्यांच्या अर्जातील आशय लक्षात घेऊन जन माहिती अधिकारी यानी माहिती देणे योग्य ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता याना अप्पर पोलीस अधीक्षक यानी दिलेल्या दि.१.८.२००९ च्या उत्तरातील तपशील कशाच्या आधारे नमूद केला, ही माहिती / कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, सोलापूर ग्रामीण, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर यानी अपीलकर्त्यास दि.५.४.२०११ पर्यंत पुरवून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गोपीनाथ बाबू महिंद्र
देवराष्ट्र, ता. कडेगाव, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
ताकारी पंपगृह विभाग क्र. इस्लामपूर, पेठ वसाहत,
ता. वाळवा, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६१६/२००९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. गोपीनाथ बाबू महिंद्र
देवराष्ट्रे, ता. कडेगाव, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली श्री. डी.एम.सोनवलकर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
ताकारी पंपगृह विभाग क्र. १,
इस्लामपूर, पेठ वसाहत, ता. वाळवा, जि. सांगली श्रीमती वैशाली गजानन नारकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - नुकसान भरपाईसाठी २४ वर्षे आपण प्रयत्न करीत असून त्या अनुषंगाने सन १९९५ ते जून २००९ या काळात ताकारी विभागात कामाला असलेल्या अधिका-यांबाबतची पत्ता, हुद्दा इ. माहिती जन माहिती अधिकारी यानी दिली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - श्री. महिंद्र यांच्या दि. १७.६.२००९ च्या अर्जाला दि. ३०.७.२००९ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर दिले. सन १९८५ मध्ये संबंधित कामावर असणा-या अधिका-यांची नावे व तपशीलही मिळवून दिला. परंतु या विभागातील ६ कार्यालये बंद झाल्यामुळे व बदल्यांचे अभिलेख ठेवले जात नसल्यामुळे तत्कालीन अधिका-यांतील कोण कोठे आहेत हे कळून येत नाही.

संबंधित कार्यालयांकडून संबंधित अधिका-यांबाबतचा तपशील मिळवून अपीलकर्त्यास पुरवावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे उप कार्यकारी अभियंता, ताकारी पंपगृह विभाग क्र. १, ता. वाळवा, जि. सांगली श्री. व. ना. पाटील यानी अपीलकर्त्यास पाठविलेल्या दि. २१.४.२०११ च्या पत्राच्या प्रतीनुसार आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. चंद्रकांत दिगंबर विंचू
अलंकापुरी कॉलनी, बी बिल्डींग, एफ - २, अपीलकर्ता
आगाशिवनगर, ढेबेवाडी रोड, मलकापूर, ता. कराड, जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
नगरपंचायत, मलकापूर, ता. कराड, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
नगरपंचायत, मलकापूर, ता. कराड, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५३/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/३/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. चंद्रकांत दिगंबर विंचू
अलंकापुरी कॉलनी, बी बिल्डींग, एफ - २,
आगाशिवनगर, ढेबेवाडी रोड, मलकापूर, ता. कराड, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
नगरपंचायत, मलकापूर, ता. कराड, जि. सातारा श्री.ज्ञानेश्वर दत्तात्रय ढेरे

**जन माहिती अधिकारी**
नगरपंचायत, मलकापूर, ता. कराड, जि. सातारा श्री. आत्माराम परशराम मोहिते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - एका इमारतीमधील पार्किंगच्या जागेत बिल्डरने बांधलेल्या सदनिकेच्या संदर्भात मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यानी अपूर्ण, दिशाभूल करणारी व टप्प्याटप्प्याने-म्हणजेच विलंबाने दिली. ग्रामपंचायतीचा ठराव व खोटा नकाशा दिला.

जन माहिती अधिकारी - श्री. विंचू यांच्या दि. २०.५.२०१० च्या अर्जाला दि. १८.६.२०१० रोजी उत्तर पाठवून माहिती दिली. सर्व माहिती मिळाल्याचे व तक्रार नसल्याचे त्यानी प्रथम अपिलाच्या सुनावणीत सांगितले. संबंधित बांधकाम सन २००३ मध्ये ग्रामपंचायत असतानाच्या काळात झालेले आहे. आता नगरपालिका झाली असून पूर्वीचा नकाशा वगैरे माहिती शोधून दिली. ते म्हणतात त्याप्रमाणे संबंधित सदनिका नकाशात नाही व तशा बांधकामाला नगरपालिकेने परवानगी दिलेली नाही, हेही कळविले.

अपिलीय प्राधिकारी - मूळ बांधकाम परवान्याव्यतिरिक्तचे बांधकाम अनधिकृत असून त्याबाबतची तक्रार असल्यास तो प्रशासकीय कार्यवाहीचा भाग ठरेल. माहिती देण्यात आली आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अभिलेखात असलेली माहिती जन माहिती अधिकारी यानी दिली आहे. अनधिकृत बांधकामाबाबतची अपीलकर्त्यांची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मुरलीधर मारुती कदम
१४०, शुक्रवार पेठ, कराड, जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
कराड नगरपरिषद, कराड, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
कराड नगरपरिषद, कराड, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०६८/२०१०/सातारा + २०७०/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. मुरलीधर मारुती कदम
१४०, शुक्रवार पेठ, कराड, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
कराड नगरपरिषद, कराड, जि. सातारा श्री. के. एन. कुंभार

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
कराड नगरपरिषद, कराड, जि. सातारा श्री. ए. एन. मुल्ला

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

'माझ्या मालकीच्या जागेतून ड्रेनेज लाईन व पाण्याची लाईन इतरांसाठी टाकताना माझे संमतीपत्र आणण्यास संबंधितांना सांगितले नाही किंवा माझ्याकडे मागितले नाही. परंतु कुंपण भिंत बांधण्यासाठी मी मागणी केल्यानंतर मात्र त्या मिळकतधारकांची संमती व प्लॉनवर सही आवश्यक असल्याचे कळविले. हे अन्यायकारक व नियमबाहय आहे. माहिती मिळाली असली तरी या अन्यायाचे निराकरण होणे आवश्यक आहे', असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. मुरलीधर मारुती कदम यानी केले. बांधकाम विषयक उपनियमांच्या प्रती मिळाल्या नसल्याची तक्रारही त्यानी केली.

श्री. कदम यांच्या दोनही अर्जांवर विहित मुदतीत उत्तर दिले. तसेच नियमांबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट केली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, कराड नगरपरिषद, कराड, जि. सातारा श्री. ए. एन. मुल्ला यानी पूरक कागदपत्रांसह केले.

अपीलकर्त्यांची माहिती देण्यात आली असून त्यांची अन्य तक्रार/मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. देण्यात आली आहे. नियमावलीसारखी सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिका-यांच्याच कक्षेत असल्याचे मानता येणार नाही व त्यामुळे ती देणे जन माहिती अधिका-यांवर बंधनकारक नाही. तथापि सहकार्याचा भाग म्हणून अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास उपनियमांची प्रत योग्य ते शुल्क आकारुन जन माहिती अधिकारी यानी देणे योग्य ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अशोक रामचंद्र चव्हाण
नाझरे गल्ली, साई मंगल कार्यालयासमोर, अपीलकर्ता
शिराळा, ता. शिराळा, जि. सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
वाळवा विभाग, इस्लामपूर, जि. सांगली.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९९९/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
सांगली श्री. डी. एस. पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
वाळवा विभाग, इस्लामपूर, जि. सांगली श्रीमती स्नेहल रविंद्र बर्गे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या दोन मुलांच्या जात प्रमाणपत्रासाठी दाखल केलेल्या अर्जांनुसार दाखले का दिले नाहीत, याच्या कायदेशीर पुराव्यासह लेखी उत्तर अपीलकर्ता श्री. अशोक रामचंद्र चव्हाण यानी मागितले होते. जातीच्या दाखल्याबाबतची प्रक्रिया हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग असून संबंधित अभिलेख तहसील कार्यालयाकडे असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे पाठविला. टिप्पणी, शे-याची प्रत यासह उत्तर दिले. उपविभागीय अधिका-यांनी घेतलेल्या आक्षेपाबाबतचे आधारभूत शासन निर्णय/शासन परिपत्रक देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली श्री. डी. एस. पाटील यानी दिले. त्याचीही पूर्तता केली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वाळवा विभाग, इस्लामपूर, जि. सांगली श्रीमती स्नेहल रवींद्र बर्गे व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली श्री. डी. एस. पाटील यानी केले.

अपीलकर्त्यांची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही. तथापि जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वाळवा विभाग, इस्लामपूर, जि. सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली यांनी कार्यवाही केली असून ती योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुशांत सुभाष मोरे
४, केशर कॉम्प्लेक्स, ३४, पंताचा गोट, सातारा ४१५ ००१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, वर्ग- १
पंचायत समिती खटाव-वडूज, ता. खटाव, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत काळेवाडी-डिस्कळ, ता. खटाव, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१८५/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/३/२०११ |

**३. उपस्थित**

**विद्यमान अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, वर्ग- १
पंचायत समिती खटाव-वडूज, ता. खटाव, जि. सातारा श्रीमती इंदिरा विठ्ठल कोळी

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** श्री. बी. बी. भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत काळेवाडी-डिस्कळ, ता. खटाव, जि. सातारा श्री. एस.आर.सणस

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन २००७ मधील ग्रामपंचायत निवडणुकीच्या अनुषंगाने मागितलेली कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यानी दिली नाही व पत्रव्यवहारही केला नाही. अपिलीय प्राधिकारी तथा

गटविकास अधिकारी यानी आपल्याला सुनावणीला बोलावूनही सुनावणी वेळेत घेतली नाही व नंतर निर्णय दिला. त्यात त्यानी माहिती देण्याचे ओदश जन माहिती अधिकारी याना दिले. या बाबी गंभीर असून जन माहिती अधिका-यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. सुशांत सुभाष मोरे यानी राज्य माहिती आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात केली आहे.

श्री. मोरे यानी तीन अर्जांद्वारे माहिती मागितली होती. त्याना विहित मुदतीत उत्तरे दिली, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत काळेवाडी-डिस्कळ, ता. खटाव, जि. सातारा श्री. एस. आर. सणस यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत काळेवाडी-डिस्कळ, ता. खटाव, जि. सातारा श्री. एस. आर. सणस यानी मुदतीत कार्यवाही करुन माहिती दिली असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, वर्ग-१, पंचायत समिती खटाव-वडूज, ता. खटाव, जि. सातारा श्रीमती इंदिरा विठ्ठल कोळी यानी केले. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री. बी. बी. भोसले यानी जन माहिती अधिका-यांविरुध्द मारलेले शेरे व त्याना दिलेले पत्र हे योग्य नसल्याचे उपलब्ध कागदपत्रे व जन माहिती अधिकारी यानी दिलेले लेखी उत्तर लक्षात घेता दिसून येते, असे ही अपिलीय प्राधिकारी श्रीमती इंदिरा विठ्ठल कोळी यानी नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी दंडात्मक कारवाईस पात्र ठरत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाबासाहेब नानासाहेब निंबाळकर
राजे फत्तेसिंह चौक, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, अक्कलकोट, तहसील कार्यालय,
अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट,
तहसील कार्यालय, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५४५ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट, तहसील कार्यालय, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.बी.एस.दोड्डाळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

तहसील कार्यालयातील एका लिपिकाच्या रजेसंबंधीची माहिती अपीलकर्ता श्री.बाबासाहेब नानासाहेब निंबाळकर यानी मागितली होती. अपीलकर्ता हे शिक्षक असून ते व संबंधित लिपिक यांच्यात असलेल्या वादातून या प्रकारचे अर्ज केले जातात. लिपिकाच्या रजेची माहिती व्यक्तिगत असल्याच्या कारणावरून नाकारली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,

अक्कलकोट, तहसील कार्यालय, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.बी.एस.दोड्डाळे यानी केले.

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट, तहसील कार्यालय, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यानी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. परंतु शासकीय सेवकाच्या रजेच्या तारखांची माहिती ही व्यक्तिगत व गोपनीय मानता येणार नाही. रजेच्या कारणामध्ये व्यक्तिगत तपशील नमूद असण्याची शक्यता असल्यामुळे रजा मागणीच्या अर्जाच्या प्रती देऊ नयेत, हे योग्य आहे. परंतु अपीलकर्त्यांनी अशा प्रती मागितलेल्या नाहीत, तर विशिष्ट कालावधीतील रजेचे दिवस कोणते याची विचारणा केली आहे. ही माहिती, तसेच संबंधित लिपिकाला शासकीय कामासाठी अन्य कार्यालयात पाठविले असल्यास त्या तारखांचा तपशील देणे आवश्यक आहे. मात्र संबंधित काम कोणते याचा तपशील देणे-न देणे त्या त्या कामाच्या स्वरूपावर अवलंबून राहील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ ते ४ मधील तारखा, मुद्दा क्र.५ मधील प्रथम दोन प्रश्नांची उत्तरे ही माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट, तहसील कार्यालय, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यानी अपीलकर्त्यास द्यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.लालासाहेब नामदेव मोहिते
मु.पो.सो. शिरोली, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री महालक्ष्मी विकास सेवा संस्था मर्यादित,
शिरोली, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३३ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.लालासाहेब नामदेव मोहिते
मु.पो.सो. शिरोली, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री महालक्ष्मी विकास सेवा संस्था मर्यादित,
शिरोली, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोर झालेल्या सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : श्री महालक्ष्मी विकास सेवा संस्था मर्यादित, शिरोली, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर या संस्थेने माहितीसाठी रू.२००० शुल्क भरून घेऊनही परिपूर्ण माहिती दिली नाही. मी संस्थेचा संस्थापक सदस्य असून संस्थेला शासकीय भागभांडवल, अनुदान, जमीन, सवलती मिळालेल्या नाहीत व मिळत नाहीत.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी : संस्थेच्या दोन पंचवार्षिक योजना बिनविरोध झाल्या. त्यानंतरच्या निवडणुकीत अपीलकर्त्यांची अनामत रक्कम जप्त झाली. पराभवामुळे चिडून संस्थेला अडचणीत आणण्यासाठी अशा प्रकारचे अर्ज अपीलकर्ता हे करीत असतात. त्यांच्या दि.२.२.२०१०च्या अर्जाला दि.२४.२.२०१० च्या पत्रान्वये उत्तर देऊन शुल्क कळविले. दि४.३.२०१० रोजी त्यानी शुल्क भरले. मात्र व्यक्तिशः माहिती हवी असल्याचे नमूद करूनही ती नेण्यास ते आले नाहीत. माहिती तयार आहे. माहिती व शुल्क वजा जाता राहिलेली रक्कम त्यानी समक्ष घ्यावी.

जन माहिती अधिकारी यानी केलेले निवेदन योग्य आहे. माहिती मिळत नसल्याची तक्रार अपीलकर्ता यानी केल्यानंतर संस्थेला कळविले होते. त्यावरही संस्थेने वरीलप्रमाणे उत्तर दिले असून संस्था देय माहिती देण्यास तयार आहे. अपीलकर्त्यांनी प्रथम अपील केलेले नाही. संस्थेला शासकीय प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अर्थसहाय्य नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर श्री.आर.ए.चौगुले यानी त्यांच्या लेखी निवेदनात म्हटले आहे.

संस्थेला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष शासकीय अर्थसहाय्य नसल्याचे लक्षात घेता माहितीचा अधिकार

अधिनियम, २००५ मधील कलम २ (एच) मधील तरतुदीनुसार ही संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही. त्यामुळे संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होणार नाही. तरीही संस्थेने माहिती नाकारलेली नाही, हे उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रतापराव बाबूराव बागल
मु.पो.कातरखटाव, ता.खटाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खटाव, तहसील कार्यालय, खटाव,
ता.खटाव, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव,
तहसील कार्यालय, खटाव, ता.खटाव, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १११० / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रतापराव बाबूराव बागल
मु.पो.कातरखटाव, ता.खटाव, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खटाव, तहसील कार्यालय, खटाव,
ता.खटाव, जि. सातारा श्री.सुनिल नागनाथ शेरखाने

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव,
तहसील कार्यालय, खटाव, ता.खटाव, जि. सातारा
श्री.बाबुराव गेणू मोहिते,
सहा.जन माहिती अधिकारी-श्री.श्रीरंग सखाराम माळवे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोर झालेल्या सुनावणीत खालीप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : सन २००३-०४ सालातील जनावरांच्या छावण्यांसाठीच्या अनुदानाबाबतची माहिती मागितली होती. ती विलंबाने व अपुरी दिली. जन माहिती अधिकाऱ्यांनी ५५ दिवसांनी उत्तर पाठविले. नऊ छावण्यांचे अनुदान अदा केलेले नाही व त्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे हेतुतः सांगितले जात आहे. शासकीय निधीच्या वाटपाबाबतची सत्यस्थिती स्पष्ट होण्यासाठी ही माहिती दिली जाणे आवश्यक आहे.

<u>जन माहिती अधिकारी</u> : श्री.बागल यानी मागितलेली माहिती सात वर्षांपूर्वीची असून शोधण्यास वेळ लागेल, असे विहित मुदतीत कळविले. माहिती शोधून उपलब्ध होताच कळविलेले शुल्क त्यानी भरले नाही. अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी त्यानी केली व आवश्यक असलेल्या प्रती योग्य ते शुल्क भरून घेऊ, असे सांगितले. अभिलेख अवलोकनासाठी ते आले नाहीत. अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर उपलब्ध झालेल्या कागदपत्रांनुसार आणखी माहिती देऊ केली असता अपीलकर्त्यांनी ती घेतली नाही, म्हणून नोंदणीकृत टपालाने पाठविली.

<u>सहाय्यक जन माहिती अधिकारी</u> : त्यावेळी एकूण ५४ छावण्या होत्या. परंतु श्री.बागल यांच्या अर्जात छावण्यांची संख्या नेमकी किती छावण्यांची माहिती पाहिजे आदि तपशील नव्हता. जुने अभिलेख शोधून प्राप्त होईल तशी माहिती दिली. माहिती नाकारण्याचा अथवा दडविण्याचा उद्देश नव्हता.

<u>अपिलीय प्राधिकारी</u> : माहिती देण्याचीच भूमिका असून तसे आदेश दिले. महालेखापालांकडून लेखातपासणी होईपर्यंत जतन करण्याच्या वर्गवारीतील हे अभिलेख आहेत.

जतनाच्या कालावधीनुसार संबंधित कागदपत्रांचा पुन्हा शोध घ्यावा. तसेच जतनाची जबाबदारी असणाऱ्यांचे जबाब घेऊन कागदपत्र उपलब्ध होत नसल्यास संबंधितांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये फौजदारी कारवाई करावी. एक महिन्यात याबाबतची कार्यवाही पूर्ण करून जन माहिती अधिकारी यानी आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार, 'सन २००३-२००४ मधील अव्वर कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय, कराड श्री.अरूण कृष्णराव निकम याना नोटीस दिली. त्यानी स्वत: वडूज कार्यालयात हजर राहून कागदपत्रे कोठे आहेत हे असल्याचे सांगितल्यावरून सहाय्यक जन माहिती अधिकारी श्री.श्रीरंग सखाराम माळवे यानी

ती कागदपत्रे शोधून काढून अपीलकर्त्यास नकला नि:शुल्क दिल्या, असा अहवाल जन माहिती अधिकारी श्री.बाबूराव गेणू मोहिते यानी दि.७.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. त्यासोबत अपीलकर्त्याची माहिती मिळाल्याची पोहोच असलेल्या पत्राची प्रत त्यानी सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विलास आकाराम खोत
कर्मवरी नगर, पोलिस लाईनचे पाठीमागे, अपीलकर्ता
रा. इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं),
वाहवा पंचायत समिती, इस्लामपूर, जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, देवर्डे, ता. वाळवा, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२६/२००९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. विलास आकाराम खोत
कर्मवरी नगर, पोलिस लाईनचे पाठीमागे,
रा. इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं),
वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर, जि. सांगली श्री.सुनिल सदानंद लोहार

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, देवर्डे, ता. वाळवा, जि. सांगली श्री. भरत हरिभाऊ शिरसाठ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - ग्रामसेवक व शिपाई नियमितपणे हजर नसल्यामुळे ग्रामपंचायत बंद असते. असे मला आढळले. त्या अनुषंगाने सरपंचांकडे केलेल्या अर्जानुसार माहिती मिळाली नाही. माहिती मिळाल्याची पोहोच जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सादर केली असली तरी ती स्वाक्षरी माझी नाही .

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी- श्री. खोत यानी सरपंचांकडे केलेल्या तक्रार अर्जावरील माहिती मागणारा अर्ज त्यांच्याकडेच केला होता. तो ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झाला नाही. अपीलही योग्य त्या अपिलीय प्राधिका-यांकडे न करता पंचायत समितीच्या सभापतींच्या नावे केले आहे. तरीही अपिलाची सुनावणी घेतली. त्याला श्री. खोत हजर होते. अर्जातील त्यांची मागणी व प्रत्यक्षातील मागणी यात तफावत होती. चर्चा करुन मेळ घालून माहिती दिली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्ता सामाजिक कार्यकर्ते असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज व अपील कोणाकडे करावे याची त्याना माहिती असली पाहिजे व त्यानुसार योग्य ते जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडेच त्यानी अर्ज/अपील करणे आवश्यक आहे, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे. मात्र माहितीची पोहोच देणा-या स्वाक्षरीबाबत चौकशी करुन अपिलीय प्राधिकारी यानी आयोगाला ८ दिवसांत अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापि जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, देवर्डे, ता. वाळवा, जि. सांगली श्री. भरत हरिभाऊ शिरसाठ व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर, जि. सांगली श्री.सुनिल सदानंद लोहार यांनी विहित मुदतीत अहवाल सादर केला नाही, याबद्दल त्याना कडक ताकिद देण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, देवर्डे, ता. वाळवा, जि. सांगली श्री. भरत हरिभाऊ शिरसाठ यानी दि.२१.१.२०११ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला. ‘श्री. विलास खोत हे भ्रष्टाचार निर्मूलन जन आंदोलनाचे सचिव असून श्री. दिलीप माने सदर आंदोलनाचे अध्यक्ष होते. सदर माहिती देतेवेळी त्याना अध्यक्ष यांचेकडे माहिती देणेबाबत मला सांगितले होते. त्यानुसार मी अध्यक्ष श्री.

दिलीप सखाराम माने यांचेकडे माहिती दिलेली आहे व ती माहिती श्री. खोत यांना श्री. माने यानी दिली असलेबाबतचे पत्र श्री. माने यानी दिलेले आहे. माहिती मागणी केलेचा संदर्भ श्री. खोत यानी भ्रष्टाचार निर्मूलन समितीचा सचिव म्हणून केलेल्या पत्रास अनुसरुन आहे. व त्यांचे सांगणेवरुनच सदर माहिती श्री. माने, अध्यक्ष, भ्रष्टाचार निर्मूलन समिती यांचेकडे माहिती दिली आहे. माहिती मिळाली असता मात्र त्रास देणेचे हेतूने त्यानी अपील केले आहे', असे त्यात नमूद केले आहे. (श्री. अण्णा हजारे प्रणित) संस्थेचे श्री. माने यांचे तसे पत्र सोबत जोडले आहे. आपण माहिती स्वीकारुन श्री. खोत याना दिली असून जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, देवर्डे, ता. वाळवा, जि. सांगली श्री. भरत हरिभाऊ शिरसाठ यांच्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये, अशी विनंती श्री. माने यानी या पत्रात केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रविराज साहेबराव पाटील
मु.पा.सारोळा, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी, बार्शी,
ता.बार्शी, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी
कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३५७ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रविराज साहेबराव पाटील
मु.पा.सारोळा, ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी, बार्शी,
ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.व्ही.एन.भुजबळ

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय,
बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.रामदास गणपत पवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता : कृषी खात्यामार्फत वाटप केलेल्या विद्युत पंपांसंबंधीची चुकीची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली. जमीन नसलेल्या व्यक्तींच्या नावावर शेती दाखवून वीज जोडणी व विद्युत् पंप दिले आहेत. पात्र नसलेल्यांना अनुदान दिले आहे. त्यामुळे दिलेली माहिती नियमबाह्य कार्यवाहीची व म्हणून चुकीची आहे.

जन माहिती अधिकारी : संबंधित व्यक्तींनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे विद्युत पंपांचे वाटप केले जाते. त्यानुसार पंप खरेदीचे आदेश, पावत्या यासह अभिलेखात असलेली सर्व माहिती विहित मुदतीत दिली. अपीलकर्त्यांच्या तक्रारीनुसार वाटपाबाबतची तपासणी करता येईल.

अपीलकर्ता श्री.पाटील यानी केलेली तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नसली तरी गंभीर स्वरूपाची आहे. सार्वजनिक हिताची व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या गाभाभूत तत्त्वाशी निगडित अशी ही बाब आहे. त्यामुळे वाटपाच्या निकषानुसार पात्र व्यक्तींना वाटप झाले आहे किंवा नाही, हे नागरिकांना कळणे हा नागरिकांचा-अपीलकर्त्यांचा हक्क आहे. तपासणीनुसारच नेमकी माहिती उपलब्ध होणार असल्यामुळे तशी तपासणी करून वस्तुस्थितीची माहिती जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यानी अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर या कार्यालयामार्फत केलेल्या विद्युत् पंप वाटपाबाबतच्या, जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास दिलेल्या यादीतील आक्षेप असलेल्या नावांचा तपशील अपीलकर्ता श्री.रविराज साहेबराव पाटील यानी जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बार्शी, ता.बार्शी,

जि.सोलापूर याना सादर करावा व त्यानी त्यानुसार तपासणी करून वस्तुस्थितीनुसार माहिती अपीलकर्त्यास द्यावी. दि.९.४.२०११ पर्यंत ही कार्यवाही पूर्ण करून अनुपालन अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगाला सादर करावा. त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आबासाहेब गोपाळराव पाटील
मु.पो.खामगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी, बार्शी,
ता.बार्शी, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी
कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९९३ / २०१० / सोलापूर पाटील |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आबासाहेब गोपाळराव पाटील
मु.पो.खामगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी, बार्शी,
ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.व्ही.एन.भुजबळ

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय,
बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.रामदास गणपत पवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता : कृषी खात्याच्या पांगरी मंडलातील सर्व गावांमध्ये रोजगार हमी योजने अंतर्गत केलेल्या सर्व कामांची माहिती दि.११.२.२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. जन माहिती अधिकारी यानी ती दिली नाही. अनुदान प्राप्त होताच माहिती विनामूल्य द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी देऊनही जन माहिती अधिकाऱ्यांनी शुल्क कळविले. तीच माहिती अन्य व्यक्तीला मात्र निःशुल्क दिली.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : श्री.पाटील यानी एकाच दिवशी चार अर्जांद्वारे विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. त्यानी शुल्क भरले, त्या अर्जांमधील माहिती दिली. पांगरी मंडलातील कामाबाबतच्या अर्जातील माहिती विस्तृत स्वरूपाची आहे. तीस गावांमधील विविध कामांची सुमारे १२००० हून अधिक पृष्ठांची ही माहिती आहे. अभिलेख अवलोकनासाठी येण्याबाबत त्याना विहित मुदतीत कळविले होते. ते आले नाहीत. अनुदान उपलब्ध होताच माहिती विनामूल्य द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिलेले नाहीत, तर अपीलकर्त्यांची तशी मागणी असल्याचे नमूद केले आहे. अन्य अर्जदाराला माहिती निःशुल्क दिल्याचे श्री.पाटील यांचे म्हणणे रास्त आहे. परंतु ती माहिती एवढ्या विस्तृत स्वरूपातील नव्हती. सुमारे १००-१५० पानांची होती. श्री.पाटील यांच्या मागणीप्रमाणे माहिती तयार आहे. त्यानी शुल्क भरल्यास ती देता येईल.

सुमारे १२००० हून अधिक पृष्ठांची तयार असलेली माहिती जन माहिती अधिकारी व अपिलिय प्राधिकारी यानी सादर केली. उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास माहिती हवी असल्यास शुल्क भरून घ्यावी लागेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.व्ही.डी.घाटगे
द्वारा श्री.आर.के.पाटील, खणभाग, घर नं.८९१, भांडवले गल्ली, सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि
कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक, नगररचना,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५१+१०५३ / २००९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि
कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.विजय कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक, नगररचना,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.बी.एन.बनकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिका क्षेत्राच्या नवीन प्रस्तावित प्रारूप विकास आराखड्यातील रस्ता रुंदीकरण व त्या संदर्भातील महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव याबाबतची माहिती आपण दि.२८.४.२००९ च्या अर्जाद्वारे मागितली होती. राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्यानंतरही प्रदीर्घ काळपर्यंत माहिती मिळालेली नाही. त्यामुळे नियमानुसार योग्य ती कार्यवाही व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता ॲड.व्ही.डी.घाटगे यानी लेखी निवेदनाद्वारे केली.

अपीलकर्ता श्री.घाटगे यांची अपील क्र.१०५३ व अपील क्र.१०५१ या दोन्हीमधील मागणी एकच आहे. दि.२८.४.२००९ रोजी श्री.घाटगे यांचा प्रथम अर्ज प्राप्त झाला व दुसरा अर्ज दि.४.५.२००९ रोजी प्राप्त झाला. अन्य विभागांकडील माहिती असल्यामुळे दि.६.५.२००९ रोजी अर्ज त्या विभागांकडे वर्ग करून ॲड.घाडगे याना तसे कळविले. अपिलीय प्राधिकारी यानीही, 'अर्ज उपसंचालक, नगररचना, विकास योजना, विशेष घटक यांच्याकडे हस्तांतरित करून सात दिवसांत माहिती देण्याचे आदेश' दिले व संबंधित ठरावाची माहिती नगरसचिव कार्यालयाने द्यावी, असे ठरले. परंतु दोन कार्यालयांमध्ये योग्य समन्वय न झाल्यामुळे ॲड.घाटगे याना माहिती मिळाली नसल्याचे आढळून आल्यामुळे संबंधितांना पुन्हा स्मरण देण्यात आले. अशा अन्य स्वतंत्र विभागाकडील माहिती असल्याचे निष्पन्न झाल्यानुसार संबंधित विभागांशी समन्वय साधून दि.११.१०.२०१० च्या पत्रान्वये ॲड.घाटगे याना माहिती पुरविली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.बी.एन.बनकर व अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.विजय कुलकर्णी यानी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने पाहता अपीलकर्त्यांचा अर्ज विहित मुदतीत संबंधित विभागांकडे जन माहिती अधिकारी यानी वर्ग केल्याचे दिसते. मात्र या विभागांकडून माहितीची पूर्तता झाली नाही अथवा अपीलकर्त्यास काहीही कळविले गेले नाही. दि.२८.४.२००९ व दि.४.५.२००९

रोजीच्या अर्जानुसार दि.११.१०.२०१० रोजी-म्हणजे एक वर्ष पाच महिन्यांहून अधिक विलंबाने माहिती दिली गेली. महानगरपालिकेच्या विभागांमधील समन्वयाचा अभाव हे माहिती देण्यास लागलेल्या विलंबाचे कारण समर्थनीय ठरू शकत नाही. ॲड.घाटगे यानी एकाच अर्जावर अनेक अपिले केल्याचे दिसते. हे योग्य नसले तरी अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतरही अपीलकर्त्यास निर्णयातील मुदतीतही माहिती दिली गेलेली नाही. दरम्यान ॲड.घाटगे यानी दि.१०.१.२०११ रोजीच्या पत्राद्वारे आयोगाला लेखी निवेदन सादर केले असून 'प्रथम अपील मधील झालेल्या दि.१०.७.२००९ रोजीच्या आदेशानुसार दरम्यानच्या कालावधीमध्ये मला माहिती मिळाली आहे. त्यामुळे आपणाकडील द्वितीय अपील क्र.१०५२ / २००९/ सांगली हे निकाली काढण्यात यावे ही विनंती आहे.' असे त्यात म्हटले आहे. 'दरम्यानच्या कालावधीमध्ये' म्हणजे नेमके केव्हा, हे त्यात स्पष्ट केलेले नाही. तसेच माहिती देण्यास झालेला विलंब वर उल्लेख केलेल्या कागदपत्रांमध्ये स्पष्टपणे नमूद आहे. ही सर्व वस्तुस्थिती पाहता अपीलकर्त्याचे निवेदन विचारात घेऊनही विलंबाबद्दल कारवाई होणे आवश्यक आहे. मात्र विशिष्ट कर्मचारी /अधिकारी यांची ही जबाबदारी मानण्याऐवजी संबंधित विभाग त्याला जबाबदार ठरतात. म्हणून अशा विभागांना विलंबाबद्दल जबाबदार धरून शास्तीची कार्यवाही आवश्यक ठरते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले मान्य करण्यात येत आहेत.

(२) उपसंचालक, नगररचना, विकास योजना, विशेष घटक व नगरसचिव कार्यालय या दोन विभागांमधील समन्वयाच्या अभावामुळे अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती पुरविली नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यानी लेखी निवेदनात नमूद केले आहे. अपीलकर्त्यास माहिती देण्यास एक वर्ष पाच महिन्यांहून अधिक विलंब झाला आहे. या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी म्हणून एखाद्या विशिष्ट व्यक्तीला जबाबदार धरणे योग्य नाही. संबंधित विभाग त्याला जबाबदार ठरतात. हे लक्षात घेता या दोन विभागांना मिळून रूपये २५०००

शास्ती लावण्यात येत आहे. आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिका, सांगली यानी संबंधित विभागांमधील कर्मचारी/अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करून शास्तीची रक्कम वसूल करावी व '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १९ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हणमंत राजाराम पवार
पो. पाचवड, ता. वाई, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
वाई, उपविभाग, वाई जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
वाई जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७६/२०१०/सातारा<br>११७३/२०१०/सातारा<br>४०८/२०११/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/३/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री.हणमंत राजाराम पवार<br>पो. पाचवड, ता. वाई, जि. सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,<br>वाई उपविभाग, वाई, जि. सातारा यांचे प्रतिनिधी<br>सौ. वैशाली चव्हाण, तहसीलदार, वाई | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - टेनन्सी अव्वल कारकून यानी दि.२०.१२.१९८१ रोजी दिलेल्या निकालाची प्रत व त्या संदर्भातील जाबजबाबाच्या नकला मागितल्या असता, आढळून येत नसल्याचे अधिकारी कळवितात. या संदर्भातील संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्याचे आदेश आयोगाने याच विषयातील अपील क्र. ११९३/२००९/सातारा दि. ३०/१/२०१० मध्ये दिले होते. परंतु योग्य संचिका दाखविल्या गेल्या नाहीत व आपल्याला दाखविलेल्या संचिकांमध्ये हवी असलेली कागदपत्रे आढळत नाहीत. त्यामुळे, खरेदी केलेल्या जमिनीला ७/१२ सदरी आपल्या मागणीनुसार नोंद व्हावी.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - सन १९८१ मधील कागदपत्रे अपीलकर्ता यानी मागितली असून अशा प्रकरणातील जाबजबाब एक वर्षात ५ नष्ट केले जातात. तसेच संदर्भित प्रकरणी जाबजबाब घेतलेले दिसत नाहीत. आदेश ३० वर्षे जतन केले जातात. अपीलकर्ता वारंवार याच माहितीची मागणी करीत असून वेळोवेळी त्याना उत्तरे देण्यात आली आहेत व संचिकांचे अवलोकनही करु दिले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता याच मागणीसाठी अपीलकर्त्यांनी केलेल्या अपील क्र. ११९३/२००९/सातारा दि. ३०/१/२०१० मध्ये आयोगाने आदेश दिले आहेत. त्यानुसार तहसीलदार, वाई यानी संबंधितांचे जाबजबाब घेऊन दि. १७.६.२०१० च्या पत्रान्वये सादर केलेला अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यानी दि. २४.६.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला आहे. तत्कालीन तलाठी श्री. जे. बी. झांझुर्णे (वय ७१ वर्षे, सेवानिवृत्त) यानी संदर्भित प्रकरणात आपण जाबजबाब आपण नोंदविल्याचे तपशीलवार नमूद केले आहे. ते लक्षात घेता जाबजबाब झाले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांचे निवेदन निराधार ठरते. तसेच जमीन वहिवाट प्रकरणातील आदेश हे कायम स्वरुपी जतनाचे कागदपत्र आहेत. ते उपलब्ध होणे आवश्यक आहे. मात्र ७/१२ सदरी नाव नोंद करण्याची अपीलकर्त्यांची मागणी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपिले मान्य करण्यात येत आहेत.
२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वाई, जि. सातारा यानी संबंधित प्रकरणातील सर्व संचिका अपीलकर्त्यास अवलोकनासाठी उपलब्ध करुन देऊन त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती निःशुल्क पुरवाव्या.

३. उपविभागीय अधिकारी, वाई यांच्या कार्यालयाने संबंधित कागदपत्रांचा शोध घेऊन आयोगाला अहवाल सादर करणे आवश्यक आहे. संबंधित आदेशाची प्रत उपलब्ध होत नसल्यास अपीलकर्त्यांनी त्यांच्या मूळ मागणीसाठी अवलंबावयाच्या प्रक्रियेबाबत अपिलीय प्राधिकारी यानी लेखी स्वरुपात माहिती द्यावी.

४. उपरोक्त क्र. २ व ३ ची पूर्तता करुन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वाई, जि. सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वाई यानी दि. ५.४.२०११ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. महारुद्र कडाजी तिकुंडे
न्यू विकासनगर, संगमनगर, ता. व जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी वर्ग- १,
पंचायत समिती, सातारा ता. जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत खेड,
ता. जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१८३+२१८४+२२०६/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/३/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी वर्ग- १, पंचायत समिती, सातारा ता. जि. सातारा श्री. सी. एन. गाडे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत खेड, ता. जि. सातारा श्री. जी. बी. माने | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मौजे खेड ग्रामपंचायती मधील पाणी पुरवठा, भारत निर्माण योजना, विविध विकास कामे, सदस्यांच्या मतदार संघात केलेला खर्च इ. बाबतची माहिती आपण मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी यानी माहिती घेऊन जाण्याबाबत कळविल्यानुसार गेलो असता माहिती तयार नसल्याचे व काही बाबतीत देऊ केलेली माहिती अपूर्ण असल्याचे आढळले. ग्रामपंचायती मधील पाणी पुरवठा योजनेसंबंधात कागदपत्रे पाहून आवश्यक माहिती घेण्यास त्यानी सांगितले. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, वर्ग- १, पंचायत समिती, सातारा ता. जि. सातारा श्री. सी. एन. गाडे यानी कागदपत्रे दाखविण्याचे व दोन दिवसांत प्रती देण्याचे आदेश दिले. परंतु त्यानुसार माहिती मिळाली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. महारुद्र कडाजी तिकुंडे यानी सुनावणीला उपस्थित राहता येत नसल्याचे कळवून सादर केलेल्या लेखी निवेदनात केली आहे.

गेल्या सव्वादोन वर्षांच्या काळात अपीलकर्ता श्री. तिकुंडे यानी २५ अर्ज केले असून दारिद्रय रेषेखालील अन्य एका व्यक्तीने १६ अर्ज केले आहेत. ग्रामपंचायतीकडे माहिती-मागणीचे एकूण ८२ अर्ज असून त्यातील ४१ या दोन व्यक्तींचे आहेत. माहितीच्या नावाखाली आपल्याला त्रास दिला जात असल्याने मनस्तापामुळे दोन महिने रजेवर होतो. सुमारे ३००० पृष्ठांच्या प्रती आतापर्यंत दिल्या असून विस्तृत प्रमाणावरील माहिती संकलित करणे, तसेच दारिद्रय रेषेखालील व्यक्तीला ती निःशुल्क देणे ग्रामपंचायतीच्या मर्यादेमुळे शक्य होत नाही. तरीही वेळोवेळी माहितीबाबत कार्यवाही केली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत खेड, ता. जि. सातारा श्री. जी. बी. माने यानी केले. त्यांच्या प्रतिपादनाला अपिलीय प्राधिकारी यानी दुजोरा दिला. चालू असलेल्या कामांमध्ये अडथळा आणण्यासाठी असे प्रकार केले जात असून आर्थिक मागण्याही केल्या जातात, अशी तक्रार जन माहिती अधिकारी यानी केली.

अपीलकर्ता यानी मागितलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरुपाची असून त्यासाठी ग्रामपंचायतीला उपलब्ध साधन सामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम,

२००५ कलम ७ (९) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी माहिती नाकारु शकतात. परंतु तसे न करता अभिलेख अवलोकनाचा पर्याय त्यानी अपीलकर्त्यास कळविला आहे. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती आक्काताई मधुकर माने
रा. मु. पो. गणेशवाडी, ता. करवीर, अपीलकर्ता
जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी, करवीर विभाग,
विद्यापीठ हायस्कूल समोर, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६३/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/३/२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी, करवीर विभाग,
विद्यापीठ हायस्कूल समोर, कोल्हापूर श्री. बाळकृष्ण दामोदर ताटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पोलिस पाटलाविरुध्द उपविभागीय अधिकारी, करवीर विभाग यांच्याकडे केलेल्या २ तक्रार अर्जांवरील कारवाईची माहिती जन माहिती अधिकारी यानी दिली नाही व कारवाईही केली नाही. त्यामुळे पोलिस पाटील आपल्याला अद्यापही त्रास देत आहेत. माहिती मिळावी व ती जाणीवपूर्वक नाकारणारे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्त्या श्रीमती आक्काताई मधुकर माने यानी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या लेखी निवेदनात केली आहे.

श्रीमती माने यांच्या दि. २०.११.२००९ च्या अर्जाला दि. २४.११.२००९ रोजी उत्तर दिले. त्यांच्या तक्रारीबाबत तहसीलदार, करवीर व पोलिस निरीक्षक, करवीर यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला असून अहवाल प्राप्त होताच नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे त्याना कळविले होते. अपेक्षित अहवाल प्राप्त झाल्यावर तसेही श्रीमती माने याना कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी, करवीर विभाग, विद्यापीठ हायस्कूल समोर, कोल्हापूर श्री. बाळकृष्ण दामोदर ताटे यानी पूरक कागदपत्रांसह केले.

अपीलकर्त्यांची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. माहितीबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती मालन तुकाराम पिसाळ
हस्ते श्री.राजेंद्र तुकाराम पिसाळ **अपीलकर्ता**
मु.घोणशी, ता.कराड, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
पंचायत समिती कराड,
ता.कराड, जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,**
ग्रामपंचायत घोणशी,
ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२२३/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,**<br>ग्रामपंचायत घोणशी,<br>ता.कराड, जि.सातारा श्री.जे.एस.साळुंखे | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** घोणशी ग्रामपंचायत हद्दीतील अतिक्रमणात असणारे उकिरडे व शौचालय काढण्याबाबत, तसेच अतिक्रमित जागेच्या नोंदी न करण्याबाबत | |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती मालन तुकाराम पिसाळ यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१७.३.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार मला माहिती संदर्भातील कागदपत्रे व नस्ती पाहण्यास उपलब्ध करुन दिल्या असून काही माहितीच्या छायाप्रती दिल्या आहेत. माझ्या अर्जावर उचित कार्यवाही झाल्याने माझा माहिती-अर्ज व अपील निकाली काढण्यास हरकत नाही', असे अपीलकर्त्या श्रीमती मालन तुकाराम पिसाळ हस्ते श्री.राजेंद्र तुकाराम पिसाळ यांचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा श्री.आर.एस.दळवी यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १८ मार्च २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गणेश पानसरे
१४७ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
श्रीगोंदा तहसील कार्यालय,
ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
श्रीगोंदा तहसील कार्यालय,
ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७३/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/२/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. गणेश पानसरे<br>१४७ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,<br>श्रीगोंदा तहसील कार्यालय,<br>ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर श्री.राजेंद्र एकनाथ वाघ<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>श्रीगोंदा तहसील कार्यालय,<br>ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर श्री. पोपटराव गणपतराव कोल्हे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

फेरफार प्रकरणातील कागदपत्रांच्या प्रती आढळ होत नसल्याचे गावकामगार तलाठयांनी लेखी दिले. कुळकायदा अव्वल कारकून श्री. जे.बी. भैसडे यानी हेतु:पुरस्सर माहिती मिळू दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. गणेश पानसरे यानी केली.

दोन फेरफारासंबंधात श्री. पानसरे यानी माहिती मागितली होती. त्यातील एकाची माहिती दिली व दुसरा आढळ होत नसल्याचे कळविले. सन १९९१-९२ मधील हे अभिलेख असून कायमस्वरुपी जतनाचे आहेत . शोधूनही सापडले नव्हते. आता ते सापडले असून सोबत आणले आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, श्रीगोंदा तहसील कार्यालय, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर श्री. पोपटराव गणपतराव कोल्हे यानी केले.

कुळकायदा अव्वल कारकून श्री. जे.बी. भैसडे यांच्या कपाटात हे अभिलेख मिळाले. त्यांच्यावर कारवाई करीत आहोत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, श्रीगोंदा तहसील कार्यालय, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर श्री.राजेंद्र एकनाथ वाघ यानी केले. जमीनविषयक दस्तऐवजांच्या जतनाबाबत अनेक तालुक्यांमध्ये अशीच परिस्थिती असल्याचे त्यानी नमूद केले.

दस्तऐवज उपलब्ध न होण्यास जबाबदार असणा-या महसूल कुळकायदा अव्वल कारकून श्री. जे. बी. भैसडे यांचा खुलासा घेऊन पुढील कारवाई करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. श्री. जे. बी. भैसडे यांचा खुलासा अपिलीय प्राधिकारी यानी दि. ४.३.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला आहे. अपीलकर्त्यांनी आपल्यावर केलेला आरोप खोटा असल्याचे श्री. भैसडे यानी खुलाशात म्हटले आहे. मात्र मूळ विषयाबाबतचे त्यांचे स्पष्टीकरण समाधानकारक नाही. हे लक्षात घेता अपिलीय प्राधिकारी यानी आयोगापुढील सुनावणीत नमूद केल्याप्रमाणे चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे.

दरम्यान 'आपल्याला हव्या असलेल्या नकला मिळाल्या असून काहीही तक्रार नाही', असे लेखी निवेदन श्री. पानसरे यानी सुनावणीच्या दिवशीच दि. १७.२.२०११ रोजी आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. कुळकायदा अव्वल कारकून श्री. जे.बी. भैसडे यांच्यावर केलेल्या कारवाईबाबतचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, श्रीगोंदा तहसील कार्यालय, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर श्री.राजेंद्र एकनाथ वाघ यानी दि. ५.४.२०११ पर्यंत आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मारुती धोंडीबा ढोबळे
मु. पो. निरगुडसर, ता. आंबेगाव, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग,
विधान भवन समोर, पुणे - १

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे - १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२०५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. मारुती धोंडीबा ढोबळे
मु. पो. निरगुडसर, ता. आंबेगाव, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग,
विधान भवन समोर, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. इजात अहमद

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. एम. एस. घुले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

तत्कालीन सरपंच व तत्कालीन ग्रामसेवक यांनी मौजे निरगुडसर, ता. आंबेगाव येथील गायरान जमिनीमध्ये रस्त्याकडील जागेत विनापरवाना बांधकामाने केलेल्या अतिक्रमणाबाबत आपण केलेल्या तक्रारीनुसार अवर सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यानी विभागीय आयुक्त, पुणे याना पाठविलेल्या पत्रानुसार सादर केलेल्या अहवालाबाबतची माहिती मागितली होती. ती मिळाली नाही व अतिक्रमणही हटवले गेले नाही. गटविकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे या संदर्भात आतापर्यंत ११ अर्ज केले आहेत, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. मारुती धोंडीबा ढोबळे यानी केले.

सन २००४ च्या दरम्यानचा हा विषय असून अपीलकर्त्यांस यापूर्वी झालेल्या चौकशीविषयीची सर्व माहिती देण्यात आली. त्यांच्या प्रत्येक अर्जाला विहित मुदतीत उत्तर पाठविले आहे. श्री. ढोबळे यांचा सार्वजनिक रस्त्यालगतचा ४ फूट रुंदीचा ओटा २००४ मध्ये रस्तारुंदीच्या कारणास्तव काढण्यात आला. तेव्हापासून ते विविध पातळ्यांवर अशा स्वरुपाचे अर्ज करीत आहेत. 'माझ्या मालकीच्या स.नं. २/५ क + ६ क या जमिनीमध्ये यापुढे अतिक्रमण केले जाणार नाही, असे सहीशिक्क्याचे प्रमाणपत्र मला दिल्यास मी केलेली तक्रार मागे घेण्यास तयार आहे', असे लेखी निवेदनात श्री. ढोबळे यानी म्हटले आहे. मात्र असे प्रमाणपत्र देता येणार नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. एम. एस. घुले यानी केले.

मूळ मागणीतील पत्रानुसार विभागीय आयुक्तांना अहवाल सादर करण्यात आला नसल्याचे सुनावणीदरम्यान स्पष्ट झाले. तीन दिवसांत असा अहवाल सादर करण्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. एम. एस. घुले व अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, विधान भवन समोर, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. इजात अहमद यांनी मान्य केले. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

पुणे यांचे प्रतिनिधी श्री. एम.एस.घुले यानी दि. ३.३.२०११ रोजी विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे याना अहवाल सादर करुन त्याची प्रत त्यानी आयोगाला सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री नथुसाहेब बापूराव माने
मु.डबेवाडी, पो.जकातवाडी,
ता. जि. सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
पुनर्वसन अधिकारी,
पुनर्वसन कार्यालय,
सातारा, जि. सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा,**
पुनर्वसन अधिकारी,
पुनर्वसन कार्यालय,
सातारा, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२१५/२०१०/सातारा |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१.सन १.१.१९९९ ते आजअखेर स्लॅब केलेल्या फाईलची (नस्तीची), दप्तरी असलेल्या सर्व दस्तऐवजाच्या सत्यप्रती.<br>२.सर्व्हे नं.६०/२ अ व ६०/२ ब बाबत कार्यालयातील सर्व माहितीच्या सत्यप्रती<br>३.भूसंपादनाबाबत असलेल्या शासनाच्या सर्व आदेशाच्या सत्यप्रती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.नथुसाहेब बाबूराव माने यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१७.३.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'आमच्या तक्रारीचे निवारण होत

असल्याची माझी खात्री झालेली आहे. तरी मा. राज्य माहिती आयोग,पुणे खंडपीठ पुणे यांचेकडे दाखल केलेले अपील मला यापुढे चालविणेचे नाही. तरी माझे अपील काढून टाकण्यात यावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.माने यानी दि.७.३.२०११ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 22 MAR 2011

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विलास दत्तात्रय बारवकर
रा. चाकण, ता. खेड, जि. पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर पोलिस अधीक्षक,
पुणे ग्रामीण पोलिस यांचे कार्यालय,
चव्हाणनगर, पाषाण, पुणे ४११ ००८

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलिस अधिकारी,
खेड विभाग, राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

<table>
<tr><td>१</td><td>अपील क्रमांक</td><td>१४११/२००९/पुणे</td></tr>
<tr><td>२</td><td>सुनावणीची तारीख</td><td>दि. १०/२/२०११</td></tr>
<tr><td colspan="3">३. उपस्थित<br><br>अपीलकर्ता श्री. विलास दत्तात्रय बारवकर<br>रा. चाकण, ता. खेड, जि. पुणे<br><br>अपिलीय प्राधिकारी तथा अपर पोलिस अधीक्षक,<br>पुणे ग्रामीण पोलिस यांचे कार्यालय,<br>चव्हाणनगर, पाषाण, पुणे श्री.रामनाथ पोकळे<br><br>जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी,<br>खेड विभाग, राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.एस.पुजारी</td></tr>
<tr><td>४</td><td colspan="2">माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.</td></tr>
</table>

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - दि. २८ मे १९९९ रोजी काढण्यात आलेल्या लकी ड्रॉ सोडतीबाबतची माहिती मागितली असता दि. १८ मे १९९९ च्या सोडतीसंबंधातील माहिती देण्यात आली. काही मुद्दयांची माहिती दिली नाही.

अपिलीय प्राधिकारी - दि. २८ मे १९९९ च्या पत्राच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती दिली. मुद्दा क्र २ ते ६ बाबत गुन्हा तपासावर असल्याचे उत्तर दिले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता याच एका मुद्दयाबाबत अपीलकर्ता वारंवार अर्ज व अपिले करीत असल्याचे दिसून येते. त्याबाबत अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे. अपीलकर्त्यांच्या म्हणण्याप्रमाणे महाराष्ट्र शासन, गृह विभाग विशेष मंत्रालय, मुंबई यानी जिल्हाधिकारी, पुणे याना पाठविलेल्या दि. २८ मे १९९९ च्या पत्राबाबतच्या कार्यवाहीचा तपशील पुन्हा शोध घेऊन अपीलकर्त्यास तीन दिवसांत कळवावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार शोध घेतला असता संबंधित पत्राची प्रत जन माहिती अधिकारी तथा पोलिस उप अधीक्षक (मु) पुणे ग्रामीण यांच्या कार्यालयाला प्राप्त झालेली नसल्याचे जन माहिती अधिकारी श्री. शंकरराव जाधव यानी दि. २१.२.२०११ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याचे आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र राघु निंबाळकर
बोतरवाडी, पो.उरवडे, ता.मुळशी, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, मुळशी(पौड), ता.मुळशी, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, मुळशी(पौड), ता.मुळशी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९७ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामचंद्र राघु निंबाळकर
बोतरवाडी, पो.उरवडे, ता.मुळशी, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, मुळशी(पौड), ता.मुळशी, जि.पुणे
विद्यमान-श्री.सतीश विष्णुपंत गाढवे, तत्कालीन-श्री.डी.बी.घुगे

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : आमच्या जागेतील अतिक्रमण काढण्याबाबत अर्ज केला होता. त्यावरील कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी योग्य प्रकारे दिली नाही.

तत्कालीन अपिलीय प्राधिकारी : श्री.निंबाळकर वारंवार या विषयासंदर्भात अर्ज व तक्रारी करीत असतात. वेळोवेळी त्याना माहिती दिली आहे. तसेच त्यांच्या खाजगी मालकीच्या वाड्यामध्ये अतिक्रमण झाल्याची त्यांची तक्रार आहे. माहिती देण्याबरोबरच आपण स्वतः विस्तार अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करून जबाब घेतले आहेत. श्री.निंबाळकर यांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या खाजगी विषयात कार्यवाही करणे शक्य नाही. तसेच आपले समाधान झाले असून सर्व अर्ज निकाली काढावेत, असे पूर्वी त्यानी लेखी दिले आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी : आपण वेळोवेळी केलेल्या मागणीनुसार १ ते ३९ मुद्दयांची माहिती मिळाली असल्याचा जबाब श्री.निंबाळकर यानी दिला आहे.

विद्यमान अपिलीय प्राधिकारी : श्री.निंबाळकर यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहिती-अधिकारातील विषय नाही.

वरील निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांची मूळ मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही व माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
21 MAR 2011

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बळीराम वामनराव पाटणकर
मु.धोम पुनर्वसन, पो.ओझर्डे, ता.वाई, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वाई,
ता.वाई, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत धोम, ता.वाई, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६०८ / २०१० / सातारा पाटणकर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.२.२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.बळीराम वामनराव पाटणकर<br>मु.धोम पुनर्वसन, पो.ओझर्डे, ता.वाई, जि.सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वाई,<br>ता.वाई, जि.सातारा श्री.सुनिल सिताराम जगताप<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत धोम,<br>ता.वाई, जि.सातारा श्री.संजय वामन वर्णेकर | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोर झालेल्या सुनावणीत खालीप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : जमिनीच्या ८-अ उताऱ्यावरून कोणत्या अर्जाच्या अथवा ठरावाच्या आधारे नाव कमी केले, अशी माहिती मागितली असता उताऱ्याच्या प्रती दिल्या. परंतु मूळ माहिती दिली नाही. याबाबत चौकशी होऊन वारस नोंद व्हावी.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : संबंधित नावाची नोंद सन १९७२-७३ पासून सन १९८८-८९ अखेर आहे. मात्र सन १९९२-९३ मध्ये यातील एक नाव वगळले गेल्याचे दिसून येते. नमुना नं.८ च्या उताऱ्यातील शेरे सदरी अशा बदलाबाबत ग्रामपंचायत ठराव झाल्याची नोंद नाही. त्यामुळे ठरावाची प्रत देता आली नाही. फेरआकारणी करताना चूक झाली आहे काय, हे तपासावे लागेल.

कागदपत्रातील मूळ नोंदीमध्ये केलेल्या बदलाला पूरक अशी कोणतीही कागदपत्रे नसतील तर ते माहितीच्या मूळ स्त्रोताचे विकृतीकरण ठरते व असे विकृतीकरण करणे कारवाईस पात्र ठरते. फेरआकारणी करताना चूक झाली असल्यास तसे स्पष्ट व लेखी स्वरूपात जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यानी दि.२३.२.२०११ रोजी अपीलकर्त्यास तसे पत्र दिल्याचे आयोगास अवगत केले. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रणजितसिंह विनायकराव दुधे
मु.पो.कडेगांव, ता.वाई, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, उपविभाग वाई, ता.वाई, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, उपविभाग वाई, ता.वाई, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८९ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रणजितसिंह विनायकराव दुधे
मु.पो.कडेगांव, ता.वाई, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, उपविभाग वाई, ता.वाई, जि.सातारा श्री.ए.डी.कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, उपविभाग वाई, ता.वाई, जि.सातारा श्री.पी.डी.कदम

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोर झालेल्या सुनावणीत खालीप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असल्याच्या कारणावरून जन माहिती अधिकाऱ्यांनी नाकारली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी निर्णय दिला नाही. अभिलेख अवलोकनासाठी गेलो असता अधिकारी उपस्थित नसल्यामुळे कागदपत्रे दाखविली गेली नाहीत.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यांच्या दि.२.३.२०१० च्या अर्जाला दि.३०.३.२०१० रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले. अत्यंत व्यापक स्वरूपाची, सरसकट पध्दतीने व अनेक कार्यालयांशी संबंधित अशी माहिती अपीलकर्त्यांनी मागितली आहे. ती संकलित करून देणे शक्य नाही. अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून दिले जात नसल्याचे त्यांचे म्हणणे योग्य नाही. आवश्यक तर अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कादगपत्रांच्या प्रतींची मागणी त्यानी केल्यास योग्य ते शुल्क आकारून त्या देता येतील.

उभय बाजूंची निवेदने पाहता जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांची माहितीची मागणी अतिव्याप्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महिबूब बाशा सगरी
घ.नं.२४२, शनिवार पेठ, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, नगरपालिका प्राथमिक
शाळा शिक्षण मंडळ, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा लिपिक, नगरपालिका प्राथमिक
शाळा शिक्षण मंडळ, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५४८ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.महिबूब बाशा सगरी<br>घ.नं.२४२, शनिवार पेठ, सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा लिपिक, नगरपालिका प्राथमिक शाळा शिक्षण मंडळ,<br>अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.र.भ.चव्हाण | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

निवृत्ती वेतनातील अंशराशीकरण व उपदानाची थकबाकी एकरकमी अदा न करता पाच हप्त्यात दिली जात आहे. हे योग्य नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.महिबूब बाशा सगरी यानी केली.

शासन निर्णयानुसार ही रक्कम पाच हप्त्यात देण्याची तरतूद असल्यानुसार कार्यवाही केली व तशी माहिती अपीलकर्त्यास दिली, असे जन माहिती अधिकारी तथा लिपिक, नगरपालिका प्राथमिक शाळा शिक्षण मंडळ, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.र.भ.चव्हाण यानी सांगितले. मात्र हा आधीचा शासन निर्णय असून ऑक्टोबर २००९ मधील शासन निर्णयानुसार थकबाकी एकरकमी देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सगरी यानी केले.

अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तथापि योग्य त्या शासन निर्णयानुसार कार्यवाही झाली की नाही, याची नेमकी माहिती नागरिकांना मिळणे हा त्यांचा हक्क आहे, याची जाणीव जन माहिती अधिकारी तथा लिपिक, नगरपालिका प्राथमिक शाळा शिक्षण मंडळ, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.र.भ.चव्हाण व अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, नगरपालिका प्राथमिक शाळा शिक्षण मंडळ, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.नरेंद्र जंगले यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महादेव सायबू कांबळे
मु.पो.ता.माळशिरस (सिध्दार्थनगर), जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५०८ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.महादेव सायबू कांबळे<br>मु.पो.ता.माळशिरस (सिध्दार्थनगर), जि.सोलापूर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सेतू कार्यालयाशी संबंधीत माहिती मागितली होती, ती मिळाली नाही. शेती नसलेल्यांना (मजूर) उत्पन्न दाखल्यासाठी विनाकारण भुर्दंड सहन करावा लागत आहे. विविध प्रकारच्या दाखल्यांसाठी मनमानी शुल्क घेतले जाते. ते नेमके किती आहे, याचा फलक सेतू कार्यालयात लावावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.महादेव सायबू कांबळे यानी केली.

शुल्क आकारणीबाबतची अपीलकर्त्यांची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही. तसेच खुलासा, स्पष्टीकरण या स्वरुपाची मागणी या अधिनियमांतर्गत

करता येत नाही. मात्र अपीलकर्त्यांच्या विचारणेच्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती विहित मुदतीत दिली जाणे, तसेच त्या संदर्भात दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होण्याची दक्षता अपिलीय प्राधिकारी यानी घेणे आवश्यक आहे, असे दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते. विविध प्रकारच्या दाखल्यांसाठी नियमानुसार ठरलेली शुल्क आकारणी नागरिकांच्या माहितीसाठी सेतू / शासकीय कार्यालयात ठळकपणे जाहीर केली पाहिजे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ चाच तो एक भाग आहे. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर यानी त्यानुसार कार्यवाही करणे तसेच, जन माहिती अधिकाऱ्यांच्या विचारणेनुसार माहितीबाबत विहित मुदतीत कार्यवाही न करणा-या संबंधित सेतू लिपिकांना लेखी स्वरुपात ताकिद देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) विविध दाखल्यांसाठी आकारावयाच्या शुल्काबाबतचा तपशील सेतू/शासकीय कार्यालयात जाहीर करणे, सेतू कार्यालयातील संबंधित लिपिकास माहितीबाबतच्या कार्यवाहीविषयी ताकिद देणे व अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित अभिलेखांचे अवलोकन करु देऊन मागणी केल्यास कागदपत्रांच्या प्रती पुरविणे अशी कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर यानी करावी व अनुपालन अहवाल दि.५.४.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ. सौ. आशा किरण जोशी
टेस्टी फुड प्रॉडक्टस् , अपीलकर्ता
एम- १६/४, ॲडी. एम.आय.डी.सी.
कोडोली, सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.
प्रशासकीय इमारत, कृष्णानगर, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.
विभागीय कार्यालय, कृष्णानगर, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०८/सातारा |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** डॉ. सौ. आशा किरण जोशी
टेस्टी फुड प्रॉडक्टस् , एम- १६/४, ॲडी. एम.आय.डी.सी. कोडोली, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.
प्रशासकीय इमारत, कृष्णानगर, सातारा श्री. सुभाष काशिनाथ पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.

| | |
|---|---|
| | विभागीय कार्यालय, कृष्णानगर, सातारा श्री. शिरीष दत्तात्रय सुमंत |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्त्या डॉ. सौ. आशा किरण जोशी यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि. १८.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

वीज मंडळाने दिलेली बेकायदेशीर विद्युत् जोडणी कायम स्वरुपी बंद करुन आपली आधीची वीज जोडणी पूर्ववत् करुन देण्याची मागणी सातत्याने करुनही पूर्ण झालेली नाही. सिंगल फेजची जोडणी नऊ दिवसांनंतर पुन्हा केली गेली. या नऊ दिवसांत झालेल्या नुकसानीची जबाबदारी कोणाची व त्याची भरपाई मिळावी. तसेच मूळ क्षमतेची वीज जोडणी (५ एच.पी.) पूर्ववत् करुन मिळावी व प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलीय प्राधिकाऱ्यांनी कबूल केल्याप्रमाणे संबंधित अधिका-यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्त्या डॉ. सौ. आशा किरण जोशी यानी केली. आपला कारखाना असून विद्युत् प्रवाह चालू असताना पूर्व सूचना न देता मिटर काढून नेले. बेकायदेशीर वीजजोडणी तोडण्याचा निर्णय लांबणीवर टाकला. या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती समाधानकारकरीत्या दिली नाही, अशी तक्रारही त्यानी केली.

डॉ. सौ. जोशी यांच्या दि. २९.८.२००८ च्या अर्जाला दि. ११.९.२००८ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधित कागदपत्रांसह माहिती दिली. प्रशासकीय व कायदेशीर कार्यवाहीबाबतचे मुद्दे सौ.जोशी यानी उपस्थित केले आहेत. मात्र या संदर्भातील सर्व तक्रारी मागे घेत असल्याचे मूळ वीज ग्राहक असलेले श्री. किरण प्रभाकर जोशी यानी ग्राहक न्यायालयातील तडजोडीनुसार लेखी दिले आहे. त्यानुसार ५ एच.पी. वीज जोडणीची प्रक्रिया वीजमंडळाने सुरु केली आहे. तसेच शाखा अभियंता यांच्यावर नियमानुसार कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या. विभागीय कार्यालय, कृष्णानगर, सातारा श्री. शिरीष दत्तात्रय सुमंत व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या. प्रशासकीय इमारत, कृष्णानगर, सातारा श्री. सुभाष काशिनाथ पाटील यानी केले.

तक्रार आपण केली असून श्री. जोशी यानी ग्राहक न्यायालयात केलेल्या तडजोडीत लिहून दिलेले आपल्यावर बंधनकारक नाही, असा प्रतिवाद सौ. जोशी यानी केला. परंतु या स्थितीत संबंधित कारखान्याचे मालक श्री. किरण जोशी हे असून त्यांच्या वीज पुरवठयाबाबत प्रशासकीय व कायदेशीर तक्रारी त्या कशा करु शकतात, असा प्रश्न जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या. विभागीय कार्यालय, कृष्णानगर, सातारा श्री. शिरीष दत्तात्रय सुमंत व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या. प्रशासकीय इमारत, कृष्णानगर, सातारा श्री. सुभाष काशिनाथ पाटील यांनी उपस्थित केला.

अपीलकर्त्या यानी दि. १८.३.२००९ च्या सुनावणीत केलेले प्रतिपादन व वेळोवेळी त्यानी सादर केलेली लेखी निवेदने पाहता त्यांच्या तक्रारी व मागण्या प्रशासकीय कार्यवाहीबाबतच्या आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी त्याना दिलेली उत्तरे व अनुषंगिक कागदपत्रेही प्रशासकीय कार्यवाहीबाबतचीच आहेत. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. सुनावणीनंतरही उभय बाजूंनी या संदर्भात पत्रव्यवहार केला असून या प्रकरणातील सद्यस्थितीबाबतचा अहवाल जन माहिती अधिकारी श्री. शिरीष दत्तात्रय सुमंत व अपिलीय प्राधिकारी श्री. सुभाष काशिनाथ पाटील यांनी दि. ३०.१२.२०१० रोजीच्या (प्राप्त दि. ३.१.२०११ ) पत्रान्वये सादर केला आहे. त्यातही प्रशासकीय कार्यवाहीच्या पूर्ततेचा तपशीलच नमूद केला आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२ मार्च २०११**

125

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अविनाश तात्यासाहेब शिंदे
आरोग्य व व्यवसाय प्रशिक्षण संस्था,
पिताश्री कॉम्प्लेक्स, वंटमुरे कॉर्नर,
सांगली रोड, मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड
शहर महानगरपालिका, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मालमत्ता व्यवस्थापक, सांगली, मिरज
आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८२ / २०१० / सागली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड
शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.विजय कुलकर्णी

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा मालमत्ता व्यवस्थापक, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.दिलीप भोसले | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री.अविनाश तात्यासाहेब शिंदे यानी मागितलेल्या माहितीची कागदपत्रे अवलोकन करण्यासाठी बोलाविण्यात आले होते. त्यांच्या दि.३०.११.२००९(प्राप्त २.१२.२००९)च्या अर्जाला दि.२.२.२०१० रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली यानी उत्तर दिले. आपण नंतरच्या काळात पदभार घेतला आहे, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.दिलीप भोसले यानी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यांच्या अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी मालमत्ता व्यवस्थापक, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.जे.व्ही.नाईक यानी विहित मुदतीत उत्तर दिलेले नाही. अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर दि.२.२.२०१० रोजी माहिती दिली आहे. म्हणजेच माहिती देण्यास ३८ दिवस (मुदतीचे ३० दिवस सोडून) विलंब झाला आहे. विलंबाचे कोणतेही समर्थनीय कारण तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.जे.व्ही.नाईक यानी दिलेले नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २० मधील तरतुदीनुसार ते शास्तीस पात्र ठरतात. तथापि त्याबाबतचे त्यांचे म्हणणे जाणून घेणे आवश्यक असल्यामुळे त्यांच्या खुलाशानंतर याबाबतचा अंतिम निर्णय घेणे उचित ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.जे.व्ही.नाईक यानी माहिती देण्यास झालेला विलंब व शास्ती याबाबतचे म्हणणे दि.५.४.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावे, शास्तीबाबतचा निर्णय त्यानंतर घेण्यात येईल.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
23 MAR 2011

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मनिष एच.मिलानी
द्वारा-श्री गजानन डेव्हलपर्स, ९, शांग्रीला गार्डन, बंडगार्डन रोड,
आय.सी.आय.सी.आय.बँकेजवळ, पुणे-१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली,
शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल अधिकारी, जय गणेश विश्व,
विश्रांतवाडी, ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२६८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मनिष एच.मिलानी
द्वारा-श्री गजानन डेव्हलपर्स, ९, शांग्रीला गार्डन, बंडगार्डन रोड,
आय.सी.आय.सी.आय.बँकेजवळ, पुणे-१

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली,
शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल अधिकारी, जय गणेश विश्व,
विश्रांतवाडी, ता.हवेली, जि.पुणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगापुढील सुनावणीमध्ये खालीलप्रमाणे निवेदन केले :

जन माहिती अधिकारी : मौजे लोहगांव, ता.हवेली येथील स.नं.२३३/अ व २३३/ब मधील फेरफार क्र.२६०८ बाबत क्र.आरटीएस/अपील/२६५/२००९, दि.२१.१.२०१० मध्ये खरेदीखताच्या क्रमवारीप्रमाणे मालकांची नावे लावण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे यानी दिले असून, त्यानुसार कार्यवाही करण्याची मागणी अपीलकर्ता श्री.मनिष एच.मिलानी यानी केली होती. त्या संदर्भातील त्यानी मागितलेली माहिती दिली. अपीलकर्ता यानी नमूद केलेल्यातील काही जमीन सध्या लष्कराच्या ताब्यात असून या जमीन प्रकरणी सी.बी.आय.तर्फे चौकशी चालू आहे व अपीलही दाखल आहे.

अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी : याच विषयासंदर्भात श्री.मिलानी यानी विविध कार्यालयांकडे सुमारे १२ ते १५ अर्ज केले आहेत. उपविभागीय अधिकाऱ्यांच्या आदेशाप्रमाणे नोंद घेण्याची कार्यवाही का झाली नाही, अशी त्यांची विचारणा असून त्याबाबतचे उत्तर दिले आहे.

मूळ मागणीच्या अनुषंगाने विविध मुद्दयांवरील स्पष्टीकरणात्मक विचारणा अपीलकर्ता यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे. मूळ अर्जाव्यतिरिक्तचे व स्प्ष्टीकरण, खुलासा आदि मागणी करणारे मुद्दे अपिलात विचारात घेता येणार नाहीत. तथापि नोंदीच्या संदर्भातील वस्तुस्थिती स्पष्ट करणारा अहवाल अपिलीय प्राधिकारी यानी तीन दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे यानी अहवाल सादर केला. 'सदर प्रकरणी मौजे लोहगांव येथील स.नं.२३३/अ व २३३/ब बाबत केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (सी.बी.आय.),आकुर्डी, पुणे यांच्यामार्फत चौकशी चालू आहे. तसेच डिफेन्स इस्टेट ऑफिसर, पुणे सर्कल, पुणे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर फेरफार क्र.२६०४८ बाबत उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे यांच्या कार्यालयाकडे अपील दाखल झालेले आहे. सदर अपिलावर अंतिम निर्णय झाल्यानंतर व केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग

(सी.बी.आय.), आकुर्डी, पुणे यांच्याकडून चौकशी पूर्ण झाल्यानंतर अपील अर्जदार यांचे अपील अर्जावर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल,' असे अहवालात नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अविनाश तात्यासाहेब शिंदे
आरोग्य व व्यवसाय प्रशिक्षण संस्था,
पिताश्री कॉम्प्लेक्स, वंटमुरे कॉर्नर,
सांगली रोड, मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड
शहर महानगरपालिका, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मालमत्ता व्यवस्थापक, सांगली, मिरज
आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८१ / २०१० / सागली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड
शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.विजय कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा मालमत्ता व्यवस्थापक, सांगली, मिरज
आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.दिलीप भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.अविनाश तात्यासाहेब शिंदे यानी मागितलेल्या माहितीची कागदपत्रे अवलोकन करण्यासाठी बोलाविण्यात आले होते. त्यांच्या दि.२७.८.२००९ च्या अर्जाला दि.४.२.२०१० रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी उत्तर दिले. आपण नंतरच्या काळात पदभार घेतला आहे, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.दिलीप भोसले यानी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यांच्या अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.जे.व्ही.नाईक यानी विहित मुदतीत उत्तर दिलेले नाही. अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली यांच्या आदेशानंतर दि.४.२.२०१० रोजी माहिती दिली आहे. म्हणजेच माहिती देण्यास १२७ दिवस (३० दिवस माहितीचे वजा करून) विलंब झाला आहे. विलंबाचे कोणतेही समर्थनीय कारण जन माहिती अधिकारी यानी दिलेले नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २० मधील तरतुदीनुसार ते शास्तीस पात्र ठरतात. तथापि त्याबाबतचे त्यांचे म्हणणे जाणून घेणे आवश्यक असल्यामुळे त्यांच्या खुलाशानंतर याबाबतचा अंतिम निर्णय घेणे उचित ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.जे.व्ही.नाईक यानी माहिती देण्यास झालेला विलंब व

शास्ती याबाबतचे म्हणणे दि.५.४.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावे, शास्तीबाबतचा निर्णय त्यानंतर घेण्यात येईल.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजीव विनायक गडकरी
क्र.३, भक्तीमाधव सहकारी गृहरचना, ४०१/४०२, यशवंतनगर,
तळेगाव, पुणे-७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, खंडाळा,
ता.खंडाळा, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, खंडाळा,
ता.खंडाळा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०६ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजीव विनायक गडकरी
क्र.३, भक्तीमाधव सहकारी गृहरचना,
४०१/४०२, यशवंतनगर, तळेगाव, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, खंडाळा,
ता.खंडाळा, जि.सातारा श्री.बापु आंबुजी खुंटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

श्रीमती मंगला मल्हार वाघ यानी पतीच्या मालमत्तेला आपण एकमेव वारस असल्याचे खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले. त्याबद्दल त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याची मागणी आपण केली होती. ती झाली नाही व योग्य वारसांची नोंद केली नाही. मात्र त्याबाबतच्या सर्व कागदपत्रांच्या प्रती मिळाल्या, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.संजीव विनायक गडकरी यानी केले.

अपीलकर्ता यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. संबंधित वारसांनी फेरफाराची नोंद पुनर्विलोकनासाठी घेण्याबाबत अर्ज करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. याच विषयासंदर्भात अपील क्र.६०६ मध्ये आयोगाने आदेश दिले आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा श्री.बापु आंबुजी खुंटे यानी केले.

अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तथापि फेरफार नोंद पुनर्विलोकनासाठी संबंधित वारसांनी अर्ज केला असल्यास त्याबाबतची सद्यस्थिती जन माहिती अधिकारी यानी स्पष्ट करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार संबंधित अर्ज उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई, ता.वाई, जि.सातारा यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर केला आहे, असे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा श्री.बापु आंबुजी खुंटे यानी दि.२५.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. राजीव प्यारेलाल नंदा
६९२, ताबुत स्ट्रीट, पुणे ४११ ००१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस उप आयुक्त,
पोलिस आयुक्त कार्यालय, साधु वासवाणी रोड, पुणे ४११ ००१.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहा. पोलिस आयुक्त,
पोलिस आयुक्त कार्यालय, साधु वासवाणी रोड, पुणे ४११ ००१.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९९/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. राजीव प्यारेलाल नंदा
६९२, ताबुत स्ट्रीट, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहा. पोलिस आयुक्त,
पोलिस आयुक्त कार्यालय, साधु वासवाणी रोड,
पुणे यांचे प्रतिनिधी श्री. के. बी. हांडोरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

स्वीकारलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने दि. ७.८.२००८ पर्यंत किती प्रकरणात एफ.आय.आर. दाखल झाले नाहीत. याबाबतचा तपशील सादर करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्याबाबतची सर्वोच्च न्यायालयाला अथवा महाराष्ट्र राज्य, पोलिस महासंचालक कार्यालयाला पाठविलेल्या तपशिलाची

माहिती आपण जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. परंतु माहिती मागणीचा अर्ज व त्यानंतर केलेले प्रथम अपील हे दोन्ही प्राप्त झाले नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे कोणतीही माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. राजीव प्यारेलाल नंदा यानी केले.

अपीलकर्त्यांच्या अर्ज व अपिलाची आवक बारनिशीत नोंद नाही. मूळ अर्जाची प्रत त्यानी दिल्यास माहिती देता येईल, असे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. के.बी. हांडोरे यानी सांगितले.

अपीलकर्ता यानी अर्जाची प्रत द्यावी व त्यानुसार जन माहिती अधिकारी यानी एक आठवडयात माहिती पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. मात्र नव्याने अर्ज करण्याची विनंती जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलिस आयुक्त, पोलिस आयुक्त कार्यालय, साधु वासवाणी रोड, पुणे श्री. प्रभाकर पाटील यानी आपल्याला केली. त्यानुसार दि. १४.२.२०११ रोजी आपण पुन्हा अर्ज केला. परंतु अशा प्रकारची माहिती अभिलेखात उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी श्री. प्रभाकर पाटील यानी दि. ७.३.२०११ च्या पत्रान्वये कळविले, असे निवेदन अपीलकर्ता श्री. राजीव प्यारेलाल नंदा यानी दि. २१.३.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अहवाल पाठविला की नाही, हे जन माहिती अधिका-यांच्या उत्तरातून स्पष्ट होत नाही. ते स्पष्ट होणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतच्या वस्तुस्थितीची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलिस आयुक्त, पोलिस आयुक्त कार्यालय, साधु वासवाणी रोड, पुणे श्री. प्रभाकर पाटील यानी दि. १०.४.२०११ पर्यंत अपीलकर्त्यास द्यावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा. यानुसार पूर्तता न झाल्यास ते शास्तीस पात्र ठरतील

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गुणवंत रामचंद्र कदम
रा. दापोडी (भांगोबाचा माळ), अपीलकर्ता
ता. दौंड, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१२/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. प्रशांत शेळके

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती शुभांगी सं. फुले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबतची लोकशाहीदिनात केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती व यादी अपीलकर्ता श्री. गुणवंत रामचंद्र कदम यानी दि. १.२.२०१० च्या पत्रान्वये मागितली होती. तहसीलदार, दौंड यांच्या कक्षेतील ही माहिती असल्यामुळे अर्ज वर्ग करुन अपीलकर्त्यास तसे कळविले. माहिती दिली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती शुभांगी सं. फुले व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. प्रशांत शेळके यांनी केले.

सोळा पृष्ठांची माहिती असून सात पृष्ठांच्याच प्रती मिळाल्या, असे अपीलकर्त्याचे म्हणणे असून ऊर्वरित पृष्ठांच्या प्रती मिळाव्यात, अशी त्यांची मागणी आहे. तहसीलदार, दौंड यांच्या पत्रात १६ पृष्ठांच्या प्रती दिल्याचे म्हटले आहे. तथापि पुन्हा या प्रती पुरविण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती शुभांगी सं. फुले यानी दि. २३.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. अहवाल सादर करण्यास लागलेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी श्रीमती शुभांगी सं. फुले याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड. किशोर देविदास काळे
५४८, श्री. चिंतामणी नारायण्येश्वर हौसिंग सोसायटी, अपीलकर्ता
शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय, मुळशी (पौड), जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय, मुळशी (पौड), जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय, मुळशी (पौड), जि. पुणे श्री. भाऊसाहेब जाधव

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय, मुळशी (पौड), जि. पुणे श्री. किश

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता ॲड. किशोर देविदास काळे यानी मागणी केलेल्या कागदपत्रांची संचिका सखोल शोध घेऊनही प्राप्त झाली नाही. सन २००३ मधील तत्कालीन तहसीलदार, मुळशी तालुका, मुळशी जि. पुणे यानी पारित केलेले सर्व आदेश अपिलकामी/रिव्हिजनकामी घेतले असल्याने संपूर्ण तपासणी करुनच अपीलकर्त्यास त्याबाबत कळविले. कायमस्वरुपी जतनाची ही कागदपत्रे आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसीलदार कार्यालय, मुळशी (पौड), जि. पुणे श्रीमती तृप्ती उमेश कोलते-पाटील यानी केले.

संपूर्ण संचिका आढळली नाही, तरी संदर्भित प्रकरणी तत्कालीन तहसीलदार, मुळशी श्री. संजय कुंडेटकर यानी पारित केलेल्या आदेशाची प्रत प्राप्त झाली. ती अपीलकर्त्यास पाठविली, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसीलदार कार्यालय,मुळशी (पौड) श्री. भाऊसाहेब जाधव यानी नमूद केले.

कायमस्वरुपी जतनाची कागदपत्रे उपलब्ध होत नसल्यास, जतनाची जबाबदारी असणा-या संबंधितावर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये कारवाई होणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यांनी मागणी केलेली कागदपत्रे कायमस्वरुपी जतनाची असून ती उपलब्ध होत नसल्यास संबंधित कर्मचारी/अधिकारी यांचा खुलासा घेऊन महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदविण्यासह योग्य ती कारवाई अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसीलदार कार्यालय, मुळशी (पौड) श्री. भाऊसाहेब जाधव यानी करावी व दि. ५.५.२०११ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रविंद्र रामचंद्र शिर्के
पसायदान सोसायटी,
४५-४६ शनिवार पेठ, पुणे - ३०. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे शहर, पुणे - २
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे शहर, पुणे - २

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१६/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/११/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.रविंद्र रामचंद्र शिर्के
पसायदान सोसायटी, ४५-४६ शनिवार पेठ, पुणे - ३०.

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे शहर
पुणे श्रीमती गितांजली सुपाते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - बनावट दस्तऐवजांची नोंदणी होऊन जवळ जवळ अर्धा एकर जास्त क्षेत्र दाखविले गेले. त्याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरुन मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी - श्री. शिर्के यांचा अर्ज गाव कामगार तलाठी, पुणे शहर यांच्याकडे वर्ग केला. तलाठ्याकडून माहिती घेण्यास त्याना कळविले होते.

तत्कालीन गावकामगार तलाठी यानी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा आठ दिवसांत सादर करावा. तसेच संबंधित ७/१२ उतारे व त्यावरील फेरफार याच्या प्रती अपीलकर्त्यास निःशुल्क द्याव्यात. अपीलकर्त्यांना आवश्यक असल्यास जन माहिती अधिकारी यानी संबंधित गाव-कामगार तलाठ्यांमार्फत अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावेत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी यानी तत्कालीन मंडल अधिकारी, पुणे शहर श्री. श्रीकांत हिरवे व तत्कालीन गाव कामगार तलाठी, पुणे शहर श्री. राठोड यांना दि. १६.११.२०१० रोजीच्या पत्रान्वये आयोगाचे आदेश कळविले. 'देऊ केलेली माहिती स्वीकारणेस अपीलकर्त्यास कळवूनही ते न आल्यामुळे गावकामगार तलाठी यानी रजिस्टर्ड टपालाने दि. ३०.११.२०१० रोजी माहिती पाठविली',असा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसीलदार कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे शहर, पुणे श्रीमती सुरेखा माने यानी दि. ३१.१.२०११ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. अहवाल सादर करण्यास विलंब झाल्याबाबत अपिलीय प्राधिकारी श्रीमती सुरेखा माने याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाळासाहेब नामदेव पाटील
शिरढोण, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
कवठेमहांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
कवठेमहांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६४८ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाळासाहेब नामदेव पाटील
शिरढोण, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
कवठेमहांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली श्री.आर.जी.बोंबले

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
कवठेमहांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली श्री.पी.एल.माने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीमध्ये खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : हॉटेलचा परवाना रद्द करण्यासाठी आम्ही अर्ज केलेला असतानाही थकबाकीवसुलीची नोटीस तहसीलदार कार्यालयाने दिली. परवाना रद्द करण्यासाठी आम्ही केलेला अर्ज व सोबतची कागदपत्रे परत मिळाली नाहीत. अर्ज मिळाला नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी म्हणतात. त्या कालावधीतील आवक-जावक बारनिशीची प्रत द्यावी.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : आमच्या कार्यालयाकडील आवक-जावक बारनिशीतील नोंदी पाहता हॉटेल परवाना रद्द करण्याबाबतचा अपीलकर्त्यांचा अर्ज आलेला नाही, असे दिसते. मात्र त्याबाबतच्या माहिती-मागणी अर्जानुसार मुद्देनिहाय माहिती विहित मुदतीत दिली.

अपीलकर्त्यांच्या दि.१४.१२.२००९ च्या अर्जाला जन माहिती अधिकारी यानी दि.१९.१२.२००९ रोजी मुद्देनिहाय उत्तर दिले आहे. आवक-जावक बारनिशीच्या प्रतीची त्यांची मागणी मूळ अर्जाव्यतिरिक्तची आहे. तथापि जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेल्या निवेदनाच्या पुष्ट्यर्थ अशी प्रत अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सूर्यकांत लक्ष्मण क्षिरसागर
ब्लॉक नं.७/४८४, स्वारगेट पोलीस लाईन, **अपीलकर्ता**
पुणे-४११ ०४२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता (मुळशी विभाग),**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
रास्ता पेठ, पुणे-४११ ०११

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उरुळीकांचन, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३७२/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्रीमती द्वारकाबाई जाधव रा.लोणी काळभोर यांच्या शेतीपंपाचे कनेक्शनच्या (ग्राहक मीटर क्र.१७०२५०००५२२१-७ ए.जी १६५२) थकीत रकमेची माहिती | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री.सूर्यकांत लक्ष्मण क्षिरसागर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.६.४.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'आम्हाला आवश्यक त्या थकित लाईट-बिलाची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी

मर्यादित, उरुळीकांचन, पुणे यांच्या कार्यालयातून मिळाली आहे. तरी आमचा अपील अर्ज रद्द करण्यात यावा', असे निवेदन अपीलकर्ता श्री.क्षिरसागर दि.२१.३.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :- २४ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुनिल सिताराम सुबंध
मु.पो.वडगांव निंबाळकर, **अपीलकर्ता**
ता.बारामती, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,**
कृषि अधिकारी कार्यालय बारामती,
मार्केट यार्ड, ता.बारामती, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,**
कृषि अधिकारी कार्यालय बारामती,
मार्केट यार्ड, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३५९/२०१०/पुणे<br>२३६१/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेच्या संदर्भातील कामाचे ठिकाण, काम सुरु व पूर्ण केल्याचा दिनांक, साप्ताहिक सूट्टीचा वार, उपस्थित मजूर, मस्टरच्या नकला, सुपरवायझरचे नाव, कामाचे अंदाजपत्रक, कामोच स्वरुप व कामगारांचा पगार इ.मुद्दयांबाबतची विस्तृत स्वरुपाची माहिती | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री.सुनिल सिताराम सुबंध यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या दोन्ही अपिलांवर दि.६.४.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. ‘वरील दोन्ही अपिलांशी संबंधित माहिती मला

मिळाली असल्याने दोन्ही अपिले निकाली काढावी', असे अपीलकर्ता श्री.सुबंध यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, कृषि अधिकारी कार्यालय बारामती, मार्केट यार्ड, ता.बारामती, जि.पुणे यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे.**
**दि :- २९ मार्च २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनिल शिवाजी भोळे
मु.पो.आष्टा(साईनगर, बागणी रोड), ता.वाळवा, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वाळवा, तहसील कार्यालय, वाळवा,
इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा महसूल नायब तहसीलदार, वाळवा,
तहसील कार्यालय, वाळवा, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६६० / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनिल शिवाजी भोळे
मु.पो.आष्टा(साईनगर, बागणी रोड), ता.वाळवा, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वाळवा, तहसील कार्यालय, वाळवा,
इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली श्री.विवेक जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा महसूल नायब तहसीलदार, वाळवा,
तहसील कार्यालय, वाळवा, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली श्री.जी.एस.कांबळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : आष्टा नगरपरिषदेच्या हद्दीतील गुंठेवारी नियमितीकरण व बिगरशेती जमिनीच्या संदर्भातील माहिती विशिष्ट नमुन्यात मागितली होती. तशा स्वरूपात देता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी यानी कळविले. तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आदेश देऊनही सहाय्यक जन माहिती अधिकाऱ्यांनी केवळ परिपत्रकाच्या स्वरूपातील माहिती वगळता इतर माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्ता यानी विशिष्ट स्वरूपाचा तक्ता देऊन त्यानुसार माहिती संकलित करून देण्याची मागणी केली होती. अशा नमुन्यात माहिती अभिलेखात ठेवली जात नसल्यामुळे अपीलकर्त्यास तसे कळविले व अभिलेखानुसार उपलब्ध असलेली माहिती दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार संबंधित परिपत्रकांच्या प्रतीही दिल्या.

अपिलीय प्राधिकारी : सन १९३३ मध्ये एका व्यक्तीला मंजूर केलेल्या जमिनीतील भूखंडांची विक्री नियमबाह्य पध्दतीने केली जात असून त्या नोंदी पुनर्विलोकनात आणण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्या संदर्भातील हा विषय आहे. संबंधित बांधकामे चालू बाजारभावानुसार रक्कम भरून नियमित करता येतील. परंतु नियमानुसार त्यासाठी आवश्यक रक्कम भरली पाहिजे. हा विषय प्रशासकीय कार्यवाहीचा असून अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास फेरफाराच्या अगर अन्य कागदपत्रांच्या प्रती देता येतील.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता अपीलकर्त्यांनी उपस्थित केलेला मुद्दा महत्त्वाचा असला तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. विशिष्ट नमुन्यात माहिती संकलित करून देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. या स्थितीत अपीलकर्त्यांना अभिलेख अवलोकनाचा मार्ग उपलब्ध आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यांच्या मागणीशी संबंधित अभिलेखांचे अवलोकन जन माहिती अधिकारी तथा महसूल नायब तहसीलदार, वाळवा, तहसील कार्यालय, वाळवा, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली यानी अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास करू द्यावे व त्यातील कागदपत्रांच्या लेखी मागणीनुसार हव्या असलेल्या प्रती योग्य ते शुल्क आकारून पुरवाव्यात.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २५ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विकास भालचंद्र कोल्हटकर
खाडीलकर गल्ली, बालगंधर्व नाट्यगृहासमोर, मिरज, ता.मिरज, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मिरज, तहसील कार्यालय, मिरज,
ता.मिरज, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पुरवठा अव्वल कारकून,
तहसील कार्यालय, मिरज, ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६७ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विकास भालचंद्र कोल्हटकर
खाडीलकर गल्ली, बालगंधर्व नाट्यगृहासमोर, मिरज, ता.मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मिरज, तहसील कार्यालय, मिरज,
ता.मिरज, जि.सांगली श्री.दिपक शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा पुरवठा अव्वल कारकून,
तहसील कार्यालय, मिरज, ता.मिरज, जि.सांगली श्री.एन.पी.भांबुरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : एपीएल, बीपीएल, अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना दुकानदारांनी केलेल्या साखर वाटपाबाबतची माहिती मागितली होती. ती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : शासन दुकानदारांना संबंधित परवाने देते व दुकानदारांमार्फत शिधापत्रिकाधारकांना वाटप केले जाते. त्यांच्याकडील पावत्या हा आमच्या कार्यालयाच्या अभिलेखाचा भाग नाही. तसेच तालुक्यातील सर्व दुकानदारांकडून अशा प्रकारची माहिती संकलित करून देणे शक्य नाही. विशिष्ट दुकानदाराकडील वाटपाबाबतची माहिती मागितल्यास दुकानदाराकडून कागदपत्रे मागवून उपलब्ध करून देता येईल.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिपादन रास्त आहे. मात्र जन माहिती अधिकारी यानी मूळ अर्जाला दिलेल्या उत्तरात अपीलकर्त्याने कार्यवाही, मार्गदर्शन, मतप्रदर्शन इत्यादीची विचारणा केल्याचे नमूद केले आहे. ते चुकीचे आहे. संपूर्ण तालुक्याची सरसकट स्वरूपात माहिती अपीलकर्त्यांनी मागितली असून ते योग्य नाही. नेमकेपणाने विशिष्ट दुकानदारांकडील माहिती त्यानी मागितल्यास दुकानदारांकडून कागदपत्रे मागवून घेऊन देण्याची तयारी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी दर्शविली, हे योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २५ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुनिल धोंडीबा शेजाळ
वरिष्ठ लिपिक आस्थापना-६ (क.क), **अपीलकर्ता**
कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,
पुणे-४११ ००१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक,**
हत्तीरोग व जलजन्यरोग, महाराष्ट्र राज्य,
मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,**
सह संचालक, आरोग्य सेवा, हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग,
पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१/२००७/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** लिपिक पदाच्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती | |

**विवेचन**

तक्रारदार श्री.सुनिल धोंडीबा शेजाळ यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या तक्रारीवर दि.२४.२.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'मी मागणी केलेली माहिती मला दि.२८.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये मिळाली असून सदर प्रकरणी माझी कोणतीही तक्रार नाही', अशा निवेदनाची प्रत अपीलकर्ता श्री.शेजाळ यानी आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २५ मार्च २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मोहंमद इकबाल एस. शेख
बी-१६, कुमार प्रिमियर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
७४५, भवानी पेठ, पुणे-२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(२),
पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(२),
पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५९७+१५९८ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(२), पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे प्रतिनिधी श्री.विजय गवळी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(२), पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.एम.पी.साबळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

अपीलकर्ता श्री.मोहंमद इकबाल एस.शेख यानी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भात नियमावलीची माहिती मागितली होती व तक्रारही केली होती. या कार्यालयाकडील माहिती दिली. अपिलात त्यानी मागितलेली संस्था स्तरावरील माहिती संस्थेकडून घेऊन दिली. तसेच त्यांच्या तक्रारीची दखल घेऊन संस्थेची तपासणी घेऊन प्रशासकाची नियुक्ती केलेली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(२), पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.एम.पी.साबळे यानी केले. माहितीबाबत त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २४ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनिल वामनराव देसाई
स.नं.१४/१, जयजवाननगर, श्रीकृष्ण मंदिराजवळ, येरवडा, पुणे-६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जोग सेंटर, दुसरा मजला, वाकडेवाडी, पुणे-३ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा भूसर्वेक्षण अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जोग सेंटर, दुसरा मजला, वाकडेवाडी, पुणे-३

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९८५ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जोग सेंटर, दुसरा मजला, वाकडेवाडी, पुणे श्री.निलेश गटणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा भूसर्वेक्षण अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जोग सेंटर, दुसरा मजला, वाकडेवाडी, पुणे श्री.विश्वास निवृत्ती कुटे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.अनिल वामनराव देसाई यानी मौजे हिंजवडी येथील भूसंपादनाबाबत विविध कार्यालयांशी संबंधित असलेल्या विविध प्रकारच्या कागदपत्रांची मागणी केली होती. कागदपत्रांचा शोध घेऊन त्याना कळविलेले शुल्क त्यानी भरल्यानंतर नकाशाच्या व उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या नकला देण्यात आल्या. ऊर्वरित माहिती ही राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान औद्योगिक क्षेत्रामध्ये भूखंडधारकांनी केलेल्या बांधकामाचे क्षेत्रफळ, मोकळ्या जागेचे क्षेत्रफळ इ. स्वरूपाची प्रत्यक्ष पाहणी करून सर्वेक्षण

करून द्यावी लागणार होती. अशी माहिती संकलित स्वरूपात उपलब्ध नाही. त्यामुळे उपलब्ध माहितीच्या प्रती देऊन शुल्काची राहिलेली रक्कम अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार अपीलकर्त्यास परत केली, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जोग सेंटर, दुसरा मजला, वाकडेवाडी, पुणे श्री.निलेश गटणे यानी केले.

अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे स्वरूप पाहता जन माहिती अधिकारी तथा भूसर्वेक्षण अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जोग सेंटर, दुसरा मजला, वाकडेवाडी, पुणे यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास आणखी माहिती हवी असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन प्राप्त करून घेता येईल. तसे अपीलकर्त्यास कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपीलकर्त्यास कळविल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जोग सेंटर, दुसरा मजला, वाकडेवाडी, पुणे यानी आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २५ मार्च २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाहुबली कबाडगे
प्लॉट नं.८, शिवाजी कॉलनी, नेमीनाथनगर, सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६०४ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी सांगली श्रीमती मनिषा आ.कुंभार

**जन माहिती अधिकारी** तथा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी सांगली श्री.बाळकू भरमा वड्डु

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.बाहुबली कबाडगे यानी दि.३१.३.२०१० च्या अर्जान्वये मागितलेली माहिती दि.३०.४.२०१० च्या पत्रान्वये दिली. मुद्दा क्र.१ व २ ची माहिती संकेतस्थळावर असल्याचे मुदतीत कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा पुनर्वसन अधिकारी, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी सांगली श्री.बाळकू भरमा वड्ड व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी सांगली श्रीमती मनिषा आ.कुंभार यानी पूरक कागदपत्रांसह केले.

माहितीबाबत जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत व योग्य उत्तर दिले आहे. तथापि संकेतस्थळावरील माहितीची मुद्रित प्रत अपीलकर्त्यास हवी असल्यास योग्य ते शुल्क आकारून जन माहिती अधिकारी यानी पुरविणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या मुलभूत तत्त्वाशी सुसंगत ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २४ मार्च २०११**